कृषीवल

रायगड, रविवार, दि. २४ मे २०२६

किंमत ४ ₹

## पुणे नीट घोटाळ्याचे केंद्रबिंदू

**पुणे** : नीटच्या पेपर फुटीची व्याप्ती वाढत चालली आहे. सीबीआयकडून या प्रकरणाचा तपास देशातील विविध शहरांमध्ये होत असला तरी या घोटाळ्याचा केंद्रबिंदू पुणे असल्याचे स्पष्ट झाले आहे. कारण एनटीएमध्ये नियुक्त असलेले तीन विषयांचे तीन शिक्षक पुण्यातून अटक झाल्याचे चित्र आहे. मनिषा मांढरे या बायोलॉजीचा पेपर सेट करण्यासाठी, मनिषा हवालदार या फिजिक्सचा पेपर सेट करण्यासाठी, तर पी.व्ही. कुलकर्णी हा केमिस्ट्रीच्या पेपरचे भाषांतर करण्यासाठी एनटीएमधे काम करत होता. विशेष म्हणजे हे तीन शिक्षक पुण्यातील शिवाजीनगर, डेक्कन आणि बुधवार पेठ या दोन ते तीन किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या शिक्षण संस्थेत किंवा क्लासमध्ये शिकवत होते.

## २४ नायजेरियन नागरिक ताब्यात

**डोंबिवली** : खोणी–पलावा परिसरात डोंबिवली मानपाडा पोलीस आणि नवी मुंबई पोलिसांनी संयुक्तपणे राबवलेल्या मोठ्या कोंबिंग ऑपरेशनमध्ये २४ नायजेरियन नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईमुळे पलावा परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी पलावा येथील डाऊनटाऊन आणि क्राऊन पलावा या इमारतींमध्ये अचानक छापेमारी करत कागदपत्र तपासणी मोहीम राबवली. या विशेष मोहिमेत सुमारे १५० पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. ताब्यात घेण्यात आलेल्या नायजेरियन नागरिकांमध्ये १४ पुरुष, ६ महिला आणि ४ अल्पवयीन मुलांचा समावेश असल्याची माहिती कल्याण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

## जासईकरांना दिलासा, उच्च न्यायालयाचा निर्णय

# भूसंपादन बेकायदेशीर

### चार आठवड्यांमध्ये बेकायदेशीर नोंदी हटविण्याचे आदेश



। उरण । प्रतिनिधी ।

**नवी मुंबई परिसरातील भूसंपादन प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे उरण तालुक्यातील जासई गावातील शेकडो ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने सिडकोकडून करण्यात आलेली भूसंपादन प्रक्रिया सुरुवातीपासूनच बेकायदेशीर आणि शून्य ठरवत महसुली नोंदीतील फेरफार रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे तब्बल ४०० हून अधिक कुटुंबांच्या मालकी हक्कांचे संरक्षण झाले असून, बेकायदेशीर नोंदींच्या आधारे सुरू असलेल्या पाडकाम कारवायांनाही मोठा धक्का बसला आहे.**

या लढ्याचे नेतृत्व अ‍ॅड. संकेत ठाकूर यांनी करत सिडकोच्या कारभाराला न्यायालयात जोरदार आव्हान दिले. योग्य भूसंपादन प्रक्रिया पूर्ण न करता, नुकसानभरपाई न देता आणि ग्रामस्थांना विश्वासात न घेता सिडकोने जासई गावातील जमिनी स्वतःच्या नावावर महसुली नोंदीत दाखल केल्याचा गंभीर आरोप याचिकेत करण्यात आला होता. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या बेकायदेशीर फेरफार नोंदींचा आधार घेत नागरिकांवर ''२२.५ टक्के योजना'' स्वीकारण्यासाठी दबाव टाकण्यात येत होता. त्यामुळे जमीनमालकांना नवीन भूसंपादन कायद्यानुसार मिळणाऱ्या बाजारभावाच्या चारपट नुकसानभरपाईसह २० टक्के विकसित जमिनीच्या हक्कांपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही करण्यात आला.

> अनेक वर्षांच्या संघर्षानंतर मिळालेला हा न्याय जासई ग्रामस्थांसाठी केवळ कायदेशीर विजय नसून त्यांच्या सन्मान, सुरक्षितता आणि मालकी हक्कांची ऐतिहासिक पुनर्स्थापना मानली जात आहे. सिडकोच्या मनमानी आणि बेकायदेशीर भूसंपादनाविरोधातील हा केवळ पहिला विजय आहे. ग्रामस्थांवर दबाव टाकून जमीन हस्तगत करण्याच्या प्रत्येक प्रयत्नाविरोधात लढा सुरूच राहील. – अ‍ॅड. संकेत ठाकूर

**पाडकाम कारवाईला ब्रेक**

मुंबई उच्च न्ययालयाने जासई गावातील सिडकोचे भूसंपादन बेकायदेशीर ठरवत फेरफार नोंदी रद्द करण्याचे आदेश दिल्याने ४००हून अधिक कुटुंबांना मोठा दिलासा दिला आहे. या निर्णयामुळे बेकायदेशीर नोंदींच्या आधारे सुरु असलेल्या पाडकाम कारवायांनाही ब्रेक लागला असून, ग्रामस्थांच्या मालकी हक्कांचे संरक्षण झाले आहे.

दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजी उच्च न्यायालयाने भूसंपादन प्रक्रिया लॅप्स झाल्याचे जाहीर करत सिडकोच्या नावावर झालेल्या फेरफार नोंदी रद्द करण्याचे आदेश दिले. मात्र, आदेशानंतरही महसुली अभिलेखांमध्ये बदल न झाल्याने अ‍ॅड. संकेत ठाकूर यांनी अवमान याचिका दाखल केली. त्यानंतर दि.८ मे रोजी न्यायालयाने राज्य प्रशासन आणि सिडकोवर तीव्र नाराजी व्यक्त करत चार आठवड्यांत बेकायदेशीर नोंदी हटविण्याचे आदेश दिले. आदेश न पाळल्यास जिल्हाधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या न्यायालयात हजर राहण्याचा इशाराही देण्यात आला.

या निर्णयामुळे आता जासई गावातील घरांवर टांगती तलवार बनलेल्या पाडकाम कारवायांनाही मोठा ब्रेक लागणार आहे. कारण, सिडकोच्या बहुतांश कारवाया या वादग्रस्त महसुली नोंदींवर आधारित असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर महसुली अभिलेखांमध्ये दुरुस्तीची प्रक्रिया सुरू झाली असून, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या संघर्षानंतर ग्रामस्थांच्या मालकी हक्कांना अधिकृत मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा निर्णय केवळ जासईपुरता मर्यादित नसून, नवी मुंबईतील इतर अधिसूचित गावांसाठीही मोठा कायदेशीर आधार ठरणार असल्याचे मत कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

## वेधक

### बनावट दागिन्यांनी लाखोंची फसवणूक



**म्हसळा** : शहरातील नामांकित व्यापाऱ्याला दि.१५ मे रोजी बनावट सोन्याचे दागिने खरे असल्याचे भासवून तब्बल १५ लाख रुपयांचा गंडा घातला होता. दरम्यान, फसवणूक करणाऱ्या या आंतरराज्यीय टोळीला रायगड पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे तालुक्यात खळबळ उडाली असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. या आरोपींमध्ये केसाराम सावजी बागरी (४७), मोहनलाल गंगाराम परमार (४२), राजू शिलाराम राठोड (२७),

•> पान २ वर

### भरधाव टँकरची कारला धडक

**रसायनी** : भरधाव टँकरने कारला धडक दिल्याने अपघात घडल्याची घटना नवीन पनवेल या ठिकाणी घडली. या अपघातात कारचे नुकसान झाले असुन, टँकर चालक अवधेश कुमार रामसंबध मिश्रा याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाडिवली रसायनी येथील कृष्णा वाघे हे आपल्या कारने नवीन पनवेल येथील डी मार्ट या ठिकाणी जात होते. यावेळी भरधाव टँकर चालकाने मद्य प्राशन करून कृष्णा वाघे यांच्या कारला पाठीमागून उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. यावेळी कारच्या उजव्या बाजूच्या पाठीमागील दार चेपले गेले. तसेच, पाठीमागील उजव्या बाजूचे

•> पान २ वर

### म्हसळा दिघी नाक्यावर भीषण आग



**म्हसळा** : म्हसळा दिघी नाक्यावरील पोलीस चौकीच्या मागील बाजूस पाटबंधारे विभाग कार्यालयाच्या आवारात शनिवारी (दि.२३) सकाळच्या सुमारास भीषण आग लागण्याची घटना घडली. सुदैवाने आगीचे डोंब भडकले नाही. वेळीच नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विठ्ठल राठोड आणि विद्यमान नगरसेवक संजय कर्णिक यांनी अग्निशमन दलाला पाचारण करून आग त्वरित विझविण्यात यश मिळविले. आगीचे नक्की कारण जरी समजले

•> पान २ वर




## डिझेल माफिया पोलिसांच्या कचाट्यात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

बेकायदेशीररित्या डिझेलची तस्करी करणाऱ्या माफियांविरोधात ठाणे गून्हे शाखा घटक एक विभागाने कारवाई केली. त्यांच्याकडून सुमारे २५ हजार रुपयांच्या डिझेलसह ४६ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. डिझेल वाहतूकीला बंदी असतानाही स्वतःच्या आर्थिंक स्वार्थासाठी हा गोरखधंदा चालविणाऱ्या राजू पंडितसह आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे डिझेल माफिया पुन्हा पोलिसांच्या कचाट्यात सापडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बेकायदेशरित्या डिझेलची वाहतूक होत असल्याची

•> पान २ वर

**अशी करीत होता डिझेलची वाहतूक**

विरार येथील खाडी किनारी टँकरचे मालक रितेश सिंग, राजू पंडित, अभय सिंग, रोशन शिरोडकर, नितीन कोळी, दिपक पवार ही मंडळी भेटली. त्यांनी बोटीच्या टँकमध्ये भरून आणलेले डिझेल आपल्या टँकरमध्ये टाकले. त्यानंतर चालक धर्मेंद्रकुमार पटेल याला डिझेलने भरलेला टँकर नाशिककडे घेऊन जाण्यास सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार टँकर नाशिकच्या दिशेने निघाला. त्याच्या सोबत डिझेलबाबत कोणतेही बील अथवा कागद दिले नाही. तो डिझेलने भरलेला टँकर घेऊन नाशिकच्या दिशेने जात होता. दरम्यान, खारगांव टोलनाका येथे पोलिसांनी टँकर थांबविला. यावेळी टँकर चालकाला ताब्यात घेऊन आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## मच्छिमार भत्ता देण्याची मागणी

। उरण । प्रतिनिधी ।

मच्छिमार कुटूंबियांना जुन व जुलै या दोन महिन्यांचा उदरनिर्वाह भत्ता देण्यात यावा, अशी मागणी कोकण किनारा मच्छिमार संघटनेच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना व संबंधित विभागांना करण्यात आली आहे. सरकारी आदेशानुसार कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारी दि.१ जुन ते ३१ जुलै

•> पान २ वर

## तुंबलेल्या गटारांमुळे गंभीर धोका

### पाच वर्षांच्या दुर्लक्षामुळे संतापाची लाट

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव शहरातील मोरबा रोड परिसरात तुंबलेल्या गटारांचा प्रश्न गंभीर बनत आहे. त्यामुळे येत्या पावसाळ्यात खांदाड, सिद्धी नगर आणि बामणोली रोड परिसरातील शेकडो घरांमध्ये पाणी शिरण्याची भीती निर्माण झाली आहे.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नगरपंचायत यांच्यातील तांत्रिक वादामुळे तब्बल पाच वर्षांपासून या गटारांची स्वच्छता आणि देखभाल रखडली असून, नागरिकांच्या जीवित आणि

•> पान २ वर

**ग्रामीण रंगभूमी हीच समाजजागृतीची खरी शाळा** | **कैलास पिंगळे यांनी व्यक्त केले मनोगत**

## ‘नाट्यप्रभा’मुळे सांस्कृतिक विश्वात नवचैतन्य

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पी.एन.पी. कला विकास मंडळाच्या अंतर्गत ग्रामीण रंगभूमी आयोजित ‘नाट्यप्रभा ग्रामीण नाट्य महोत्सवा’ने अलिबागच्या सांस्कृतिक विश्वात नवचैतन्य फुलवले आहे. दि.१८ मे रोजी माजी आमदार जयंत पाटील यांच्या प्रेरणेने आणि चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या महोत्सवाने ग्रामीण रंगभूमीच्या परंपरेला नवा उजाळा दिला आहे. खेडोपाड्यातील कलावंतांच्या जिद्दीने आणि कलाप्रेमाने महाराष्ट्राची ग्रामीण रंगभूमी वर्षानुवर्षे फुलत आली असून, त्याच परंपरेचा हा प्रेरणादायी वारसा असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक कैलास पिंगळे यांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील सामान्य माणसांनीच रंगभूमी सजवली, रुजवली आणि विकसित केली. गावागावांतून उभी राहिलेली ही नाट्यचळवळ आता नव्या दमाने बहरत असून, नाट्यचळवळ आता बाळसे धरल्याशिवाय राहणार नाही, ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. अलिबाग तालुक्याची नाट्यपरंपरा अतिशय समृद्ध असल्याचे सांगताना त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्येष्ठ नाटककार भ.ल. पाटील यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला.

**ग्रामीण रंगभूमीने समाजाला जोडले**

ग्रामीण रंगभूमी ही भारतीय संस्कृतीचा पाया आहे. समाजाला जोडण्याचे आणि जागृत ठेवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे रंगभूमी. नव्या लेखकांनी मामा वरेरकर, अण्णासाहेब किर्लोस्कर, गो.ब. देवल, खाडिलकर, गडकरी, कोल्हटकर आणि शिरवाडकर यांच्या नाटकांचा अभ्यास करून प्रभावी नाट्यलेखन करावे, असे आवाहन कैलास पिंगळे यांनी केले आहे.

पूर्वी अलिबाग, महाड, पेण कोकणसिंह नारायण नागू पाटील यांचे सहकारी असलेल्या भ.ल. पाटील यांनी चौदा नाटकांचे लेखन करून ग्रामीण रंगभूमीवरून समाजप्रबोधन घडवून आणले. चरी शेतकरी संपाच्या काळात त्यांनी नाटकातून शेतकरी वर्गासाठी एल्गार पुकारला होता, हे विसरून चालणार नाही, असे पिंगळे म्हणाले.

पूर्वी अलिबाग, महाड, पेण आणि पनवेल परिसरात अनेक नाटक कंपन्या कार्यरत होत्या. दत्ता खानविलकर यांच्यासारखे राजकीय नेते हे उत्कृष्ट अभिनेते म्हणूनही प्रसिद्ध होते. प्रकाश गुर्जर, शरद कोरडे, प्रकाश जोशी यांसारख्या कलाकारांनी अलिबागच्या मातीतूनच रंगभूमीवर ठसा उमटवला. सांबरी कुर्डूसपासून रेवसच्या टोकापर्यंत

•> पान २ वर

PNP CYRUS POONAWALLA SCHOOL

NAGAON CBSE CURRICULUM (SINCE 2017)

LEARNING, GROWING, THRIVING, TOGETHER,

ADMISSION OPEN NURSERY TO X

Located in a non-industrial, nature-friendly setting, the school provides a calm and healthy atmosphere that supports focused learning and overall well-being.




HOLISTIC DEVELOPMENT

The institution places clear emphasis on the holistic development of students, ensuring equal importance to academics, physical fitness, and life skills.





SWIMMING FOR ALL

A major highlight is the half Olympic-length swimming pool, where free swimming classes are provided to all students, promoting fitness and confidence from an early age.

Best Sports Facilities in Alibag

In addition, the school boasts extensive sports facilities, including a basketball court, tennis court, and a football ground, giving students opportunities to actively engage in sports and develop teamwork, discipline, and leadership.



9822771540/9272594803/9168137591

pnpedusoc@gmail.com www.cyruspoonawallaschool.com

Opp. Hiranandani Sands, Near Mahendra Colony, Nagaon Khari Rd, Nagaon Village, Taluka, Alibaug, District. Raigad - 402204.

# विष टाकून कांदळवन संपवण्याचा कट?

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील साळाव गावाजवळील शासकीय बंधारा परिसरात कांदळवन (मँग्रोव्ह) नष्ट करण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, स्थानिक नागरिकांनी प्रशासन, कंपनी आणि राजकीय संरक्षणावर थेट आरोप केले आहेत. समुद्राच्या नैसर्गिक भरती-ओहोटीचा मार्ग अवैधरित्या बंद करून गेल्या दोन वर्षांपासून कांदळवन नष्ट करण्याचे काम सुरू असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, मागील तीन महिन्यांत हा प्रकार अधिक तीव्र झाल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

स्थानिक रहिवासी नौशाद हुसेन गोरमे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शासकीय बंधाऱ्यावरील दरवाजे दगड टाकून बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे समुद्राचे पाणी कांदळवनापर्यंत पोहोचत नसून, झाडे कोरडी पडून



### जिल्हा प्रशासनाकडून कारवाई नाहीच

महाराष्ट्र शासनाचे कांदळवन सरंक्षण धोरण २०१८, वन संरक्षण कायदा १९८० आणि सीआरझेड अधिसूचना २०१९ अंतर्गत हा प्रकार गंभीर गुन्हा असतानाही प्रशासन कारवाई करत नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे लेखी तक्रार देऊनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

- साळावमध्ये पर्यावरण हत्येचा गंभीर आरोप
- राजकीय संरक्षणामुळे कारवाईला ब्रेक?

मृत होत आहेत. जवळपास चार किलोमीटर परिसरातील नैसर्गिक जलप्रवाह रोखण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कांदळवन हे केवळ पर्यावरणाचे संरक्षण करणारे जंगल नसून किनारपट्टीवरील हजारो नागरिकांच्या उपजीविकेचा आधार आहे. पावसाळ्यात मासेमारी बंद असताना खेकडे, शिंपले आणि समुद्री जैवसंपत्तीवर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. मात्र, कांदळवन नष्ट झाल्यास संपूर्ण सागरी परिसंस्थेवर विनाशकारी परिणाम होणार असल्याची भीती स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. याहून धक्कादायक म्हणजे, काही लोकांकडून कांदळवनावर विषारी रसायने टाकली जात असल्याचा गंभीर आरोपही स्थानिकांनी केला आहे. एका कंपनीची बोलेरो गाडी वारंवार परिसरात येत असून, त्यातील व्यक्ती झाडांवर विष फवारणी करत

> “शासनाचे कायदे असतानाही सरकारी बंधाऱ्यावरच पर्यावरणाची हत्या सुरू आहे. आज आवाज उठवला नाही तर पुढील पिढ्यांसाठी किनारपट्टी आणि समुद्री जीवन दोन्ही संपुष्टात येईल. प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास न्यायालयापर्यंत लढा देण्यात येईल.”
> – नौशाद गोरमे, स्थानिक नागरिक

असल्याचे फोटो व व्हिडिओ स्थानिकांकडे असल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे मासे आणि जलचरांच्या प्रजनन प्रक्रियेलाही धोका निर्माण झाला असून, मुरुड खाडीच्या जैवविविधतेवर संकट ओढवले आहे.

स्थानिकांनी कोकण कांदळवन कक्ष, वनविभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांवर दबावाखाली काम करण्याचा आरोप केला आहे. काही ठिकाणी कांदळवन तोडून अवैध बांधकामांना मोकळीक दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी तातडीने स्वतंत्र चौकशी करून बंधाऱ्यातील दगड हटवून भरती-ओहोटीचा नैसर्गिक मार्ग पूर्ववत करण्याची मागणी केली आहे. तसेच, विषारी रसायनांचा वापर करणाऱ्यांविरोधात अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# आंबे काढणीसाठी कामगारांचा तुटवडा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गेल्या अनेक दिवसांपासून आंबा काढणीला सुरुवात झाली आहे. मात्र, स्थानिक कामगार मिळत नसल्याने आंबा काढणीला बिलंब होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे परराज्यातून विशेष करून कर्नाटक राज्यातून कामगारांना बोलविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये १७ हजारहून अधिक आंबा उत्पादनक्षम क्षेत्र असून, आंबा लागवडीवर अनेक शेतकरी भर देऊ लागले आहेत. तरुण वर्गदेखील आंबा लागवडीकडे वळू लागला आहे. यंदा आंब्याला मोहर चांगला आला होता. मात्र ढगाळ वातावरण, अवकाळी पावसाचा परिणाम मोहरावर झाला. त्यामुळे आंबा उत्पादनात प्रचंड घट झाली. जिल्ह्यातील हापूस आंबा आता बाजारात दाखल होऊ लागला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून आंबा काढणीला सुरुवात झाली आहे. मात्र, स्थानिक कामगार मिळत नसल्याची गंभीर समस्या काही आंबा उत्पादक शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी आंबे काढण्यासाठी कुटूंबाची मदत घेतली जात आहे. तर, काही ठिकाणी परराज्यातून कामगारांना बोलावण्यात आले आहे. अलिबागसह अनेक भागांत ६० हून अधिक कामगार परराज्यातून दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे कर्नाटकमधून कामगार आले आहेत. मे अखेरपर्यंत जिल्ह्यात आंब्यांचा हंगाम राहणार असून या कामातून परराज्यातील कामगारांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे. पाचशे ते सहाशे रुपये रोजंदारीवर हे कामगार काम करीत आहेत. त्यांची राहण्याची व्यवस्थादेखील करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

# मार्गदर्शन शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील डिफेन्स ॲकेडमी येथे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराध्ये दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हा स्तुत्य उपक्रम सकल मराठा समाज्योन्नती सामाजिक संस्था व सक्षम एज्युकेशन सोसायटी मार्फत राबविण्यात आला.

सकल मराठा समाजाचे युवा अध्यक्ष समरेश शेळके व सक्षम एज्युकेशनचे अध्यक्ष शार्दुल काठे यांच्या अध्यक्षतेखाली दहावी व बारावीच्या पुढील वाटचालीच्या दृष्टीने हे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले होते. शिबिराचे



मुख्य मार्गदर्शक म्हणून सुशील घरत यांनी त्यांच्या शैलीमध्ये विद्यार्थ्यांना संबोधित केले. इच्छा गुणांचा योग्य समन्वय साधून कशाप्रकारे पुढील जीवनात यशस्वी कामगिरी करता येईल. नियोजनशील पद्धतीने आपल्या ध्येयांची आखणी केल्यास कसे यश मिळते, याबद्दलही मार्गदर्शन केले. यावेळी शार्दूल काठे, सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकारी संतोष तावडे यांनीदेखील मोलाचे मार्गदर्शन केले. दरम्यान, विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्या विविध प्रश्नांचे निरसनही करण्यात आले.

## प्रमोद शेवाळे अपर पोलीस आयुक्त

**पनवेल :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात खांदेपालट झाली असून, पोलीस उपायुक्त विजय खरात यांच्यावर परिमंडळ-१ची, तर पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्यावर परिमंडळ-३ची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांच्याकडे वाहतूक विभाग, पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांच्याकडे मुख्यालय, तर पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांच्याकडे विशेष शाखेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच, प्रमोद शेवाळे यांची दहशतवाद विरोधी पथकातून (एटीएस) थेट नवी मुंबईचे नवे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

# गावागावात सांस्कृतिक कार्यक्रमांचा क्रेझ

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सध्या उन्हाळी सुट्टी पडली असून, गावागावांत वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून वेगवेगळे मनोरंजानाचे कार्यक्रम घेतले जात आहे. पडद्यावरील चित्रपट बघण्याची परंपरा कायम असताना आता सांस्कृतिक कार्यक्रमांची क्रेझ वाढत आहे. त्यामुळे गावातील कलाकारांना यातून व्यासपिठ मिळण्याची संधी प्राप्त होत आहे. नामवंत कलाकारांमार्फत होणारे कार्यक्रम आता गावांमध्ये भरविले जात आहेत. त्यामुळे आता गावे, वाड्यांमध्येदेखील टिव्हीवरील कार्यक्रमांचा आनंद ऑर्केस्ट्राद्वारे घेता येत आहे.

पुर्वी गावांमध्ये धार्मिक, सामाजिक कार्यक्रम आयोजित केल्यावर त्याठिकाणी मनोरंजन म्हणून पडद्यावर चित्रपट लावले जात होते. त्यानंतर हळुहळू बदल केला. गावांतील लहान मोठ्या कलांकारांसह हौशी मंडळींना हक्काचे व्यासपिठ मिळवून देण्याचा प्रयत्न सांस्कृतिक अर्थात गॅदरींगद्वारे करण्यात आला. गावातील मुले, मुली, मोठी मंडळी एकत्र येऊन एखादे नाटक बसवणे, एखाद्या बॉलिवुडमधील गाण्यांद्वारे नृत्यांचे सादरीकरण करणे, तसेच गावातील एखाद्या कलाकाराचा चांगला आवाज असल्यास त्यामार्फत गाण्याचे सादरीकरण करणे असे अनेक कार्यक्रम मनोरंजनासाठी चालत होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गावांतील एकोपा अधिक वृंध्दीगत होण्यास मदत होऊ लागली. वेगवेगळ्या चॅनलमार्फत होणारे गाण्यांचे, नृत्यांचे सादरीकरण लहान मोठ्या शहरांपुरता मर्यादीत होते. परंतु, बदलत्या काळानुसार ग्रामीण भागातदेखील कलेबाबत प्रचंड आवड निर्माण झाली आहे. रिॲलिटी शो सारखे कार्यक्रम करण्यावर भर दिला जात आहे. गावे, वाड्यांमध्ये सुध्दा आता भव्यदिव्य असे ऑर्केस्ट्रा होऊ लागले आहेत. याचा क्रेझ गावांमध्येदेखील दिसून येत आहे. टीव्हीवरील वेगवेगळ्या चॅनलमार्फत होणाऱ्या कार्यक्रमांचा आनंद ऑर्केस्ट्रातून पहावयाची संधी गावांतील मंडळींना मिळू लागली आहे. लावणी, देशभक्तीपर गीत, इतर हिंदी, मराठी गाण्यांचे सादरीकरण, वेगवेगळ्या गाण्यांवर नृत्यांचे सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले जात आहे.

> “आजची पिढी शिक्षण घेत असताना संगीत क्षेत्राकडेदेखील वळू लागली आहे. वेगवेगळ्या नृत्य, संगीत ॲकेडमीच्या माध्यमातून धडे घेण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे लाईव्ह कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यास मुले तयार झाली आहेत. या क्षेत्राचे ज्ञान वाढले आहे. तसेच कराओकेसह सोशल मिडीयाचा आधारदेखील मुलांना मिळत आहे. त्यामुळे या क्षेत्राबाबत असलेली ग्रामीण व शहरी भागातील दरी कमी झाली आहे.”
> – विनायक भोनकर, कला प्रेमी



## मुरूड शहरात पावसाला सुरुवात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मे महिन्यातच मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली असून, पूर्व पावसाच्या रिमझिम सरींमुळे उकाड्यातून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, मुरूड शहरासह पंचक्रोशी भागात अनेक ठिकाणी रिमझिम पाऊस बरसला. मुरूडमध्ये शनिवारी (दि.२३) सकाळपासून ढगाळ वातावरण होते. त्यामुळे अधूनमधून हलक्या पावसाच्या सरी कोसळत होत्या. या रिमझिम पावसामुळे तापमानात घट झाली असून, वातावरण आल्हाददायक झाले आहे. शेतकऱ्यांमध्येही समाधानाचे वातावरण असून, खरीप हंगामाच्या तयारीची सुरुवात झाली आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. अंदाजानुसार यंदा मान्सून महाराष्ट्रात नेहमीपेक्षा थोडा लवकर पोहोचण्याची शक्यता आहे.

# खारपाडा टोल नाक्यावर कोकणकरांचा आक्रोश

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

कोकणची जीवनवाहिनी असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम वर्षानुवर्षे रखडलेले असतानाही खारपाडा येथे सुरू करण्यात आलेल्या टोल वसुलीविरोधात आता जनतेचा संयम सुटला आहे. मुंबई-गोवा महामार्ग जनआक्रोश समितीच्यावतीने सोमवारी (दि.२५) खारपाडा टोल नाक्यावर तीव्र ठिय्या आंदोलन पुकारण्यात येणार आहे. जोपर्यंत महामार्गाचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल वसूल करू नये, असे स्पष्ट संकेत न्यायालयाने दिले आहेत. असे असतानाही पळस्पे ते इंदापूर या पहिल्या टप्प्यातील, काम पूर्ण नसताना खारपाडा टोल नाका सुरू कसा झाला? असा संतप्त सवाल प्रवाशांमधून विचारला जात




आहे. ही वसुली म्हणजे सामान्य माणसाच्या खिशावर मारलेला दरोडाच आहे, अशी भावना आता संपूर्ण कोकण पट्ट्यात निर्माण झाली आहे.

गेल्या काही वर्षांत या महामार्गावरील खड्डे, अपूर्ण उड्डाणपूल, अरुंद रस्ते आणि निकृष्ट दर्जामुळे झालेल्या अपघातांत हजारो निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. हा रस्ते नसून मृत्यूचे सापळे बनला आहे. रस्त्याची दुरवस्था कायम असताना, प्रवाशांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकावे लागत असताना टोल मात्र वसूल केला जात असल्यामुळे जनतेमध्ये प्रशासनाविरोधात प्रचंड चीड निर्माण झाली आहे. प्रत्येक पावसाळ्यात महामार्ग खिळखिळा होतो आणि वर्षभर टोल मात्र वसूल केला जातो, हे आता खपवून घेतले जाणार नाही. हा लढा फक्त टोल पुरता मर्यादित नसून, हा आपल्या हक्काचा, आपल्या माणसांच्या जीवाचा आणि कोकणच्या अस्मितेचा लढा आहे. असे कोकणचा शिलेदार, मिशन कोकण साम्राज्य यांनी सांगितले. या अन्यायाविरोधात आता शांत न बसता सोमवारी (दि.२५) सकाळी १०.०० वाजता खारपाडा टोल नाक्यावर होणाऱ्या ठिय्या आंदोलनात संपूर्ण कोकणकरांनी, वाहनचालकांनी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अजय यादव मिशन कोकण साम्राज्य आणि जनआक्रोश समितीच्यावतीने करण्यात आले आहे.



## कामगार कायद्यांची होणार जनजागृती

**। महाड । प्रतिनिधी ।**

व्हायब्रंट प्रोफेशनल्स असो. पुणे यांच्या ‘‘महाराष्ट्र दौरा’’ या उपक्रमाची सुरुवात महाड येथून करण्यात आली. महाड मॅन्युफॅक्चरर्स असो. एचआर फर्म यांच्या सहकार्याने शुक्रवारी (दि.२२) महाड येथे ‘‘कामगार संहिता आणि उद्योगाची सज्जता’’ या विषयावर मेगा लर्निंग सेशन यशस्वीरीत्या संपन्न झाले. व्हायब्रंट प्रोफेशनल्स असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष शंकर साळुंखे यांच्या संकल्पनेतून ‘‘व्हायब्रंट महाराष्ट्र दौरा २०२६’’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध औद्योगिक शहरांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी दौऱ्यात नवीन कामगार संहिता, अनुपालन सज्जता, औद्योगिक संबंध, वेतन करार, कामगार संघटना वाटाघाटी, कंत्राटी कामगार, माथाडी कामगार, पोश, कर्मचारी कल्याण, एआय इन एचआर, डिजिटल परिवर्तन, गिग कार्यबल तसेच भविष्यातील रोजगार या विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व सखोल चर्चा करण्यात येणार आहे.

## पान १ वरून

### बनावट दागिन्यांनी लाखोंची फसवणूक

अनिल हरिराम परमार (२६) आणि जितेंद्रकुमार मोहनलाल परमार (२७) यांचा समावेश असून, हे सर्व मूळचे राजस्थान राज्यातील जालोर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. या आरोपींना पोलिसांनी शुक्रवारी (दि.२३) रात्रीच्या सुमारास रोहा तालुक्यातील किल्ला येथून ताब्यात घेतले. म्हसळा पोलिसांनी या प्रकरणी शिताफीने तपास करून जाआड केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### भरधाव टँकरची कारला धडक

टायर देखील फुटला आणि मडगार्ड तुटून नुकसान झाले. त्यामुळे कृष्णा वाघे यांच्या कारचे प्रचंड प्रमाणात नुकसाना झाले असून, टँकर चालकाविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### म्हसळा दिघी नाक्यावर भीषण आग

नसले तरी पाटबंधारे कार्यालयाच्या आवारात घाण आणि प्रचंड अडगल साचलेली आहे. त्याच प्रमाणे या आवारातील गेली अनेक वर्षे बंद अवस्थेत असलेल्या बांधकाम विभागाच्या इमारतीच्या पायऱ्यांवर दिवसभर सिगारेट वगैरे ओढण्याचे प्रकार सुरु असतात. जळते सिगारेट टाकल्यानेच ही आग लागल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, आग आटोक्यात आल्यानंतर त्वरित नगरसेवक संजय कर्णिक आणि मुख्याधिकारी विठ्ठल राठोड यांनी या कार्यालयाच्या आवाराची स्वच्छता नगरपंचायतीच्या स्वच्छता कामगारांकडून करून घेतली. आग विझविण्यासाठी स्थानिक नागरिकांनीही मदत केली.

### मच्छिमार भत्ता देण्याची मागणी

कालावधीकरीता बंद करण्यात येणार आहे. तशा प्रकारचा आदेश सहा. मत्स्यव्यवसाय विभागाने जाहीर केलेला आहे. या दोन महिन्यांत माश्यांचा प्रजनन काळ असल्यामुळे तसेच जोरदार पाऊस व वादळाचा धोका यामुळे मच्छिमारी बंद ठेवणे योग्यच आहे. परंतु, कोकण किनारपट्टीवरील मच्छिमाऱ्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह संपुर्ण मच्छिमारीवर चालतो. पुढील २ महिन्यांमध्ये त्यांना कुठलेही उत्पन्न नसल्यामुळे त्यांच्या कुटूंबियांचा उपजिविकेचा प्रश्न निर्माण होत असतो व आताही झालेला आहे. त्यांना या २ महिन्यांकरीता उदरनिर्वाह भत्ता अथवा आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे.

नुकताच आंध्र प्रदेश सरकारने त्या राज्यातील मच्छिमारांच्या कुटूंबियांना दोन महिन्यांसाठी प्रतिमहिना २० हजार रूपये देण्याचे मान्य केले आहे व त्याचे वाटप सुद्धा चालु आहे. महाराष्ट्र राज्य हे मच्छिमारी व्यवसायातुन मोठ्या प्रमाणात महसुल गोळा करते. तरी या सारख्या आर्थिक सधन राष्ट्राने गरजु मच्छिमारांसाठी आर्थिक मदत देणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मच्छिमारांच्या प्रत्येक कुटूंबाला प्रतिमहिना २५ हजार प्रमाणे दोन महिन्यांचे ५० हजार रूपये आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी कोकण किनारा मच्छिमार संघटनेच्यावतीने प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या संदर्भात कामगार नेते तथा संघटनेचे मार्गदर्शक सल्लागार कॉ. भूषण पाटील व त्यांच्या शिष्टमंडळाने उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांची भेट घेऊन या संदर्भात त्यांना निवेदन दिले व मागण्या पूर्ण करण्याची मागणी केली. यावेळी तहसीलदार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

### ‘नाट्यप्रभा’मुळे सांस्कृतिक विश्वात नवचैतन्य

गावोगावी हौशी नाटकांची परंपरा फुलली होती. त्या काळात एक स्त्री पात्र असलेली, कौटुंबिक आशयाची नाटकं गावोगावी रंगत असत. मनोरंजनासोबतच समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून ग्रामीण नाटकांकडे पाहिले जात होते. मराठी रंगभूमीच्या इतिहासाचा आढावा घेताना कैलास पिंगळे यांनी विष्णू अमृत भावे यांच्या ‘सीता स्वयंवर’पासून सुरू झालेल्या प्रवासाचा उल्लेख केला. त्यानंतर ‘वस्त्रहरण’, ‘सौभद्र’, राम गणेश गडकरी यांचे ‘एकच प्याला’, वि.वा. शिरवाडकर यांचे ‘नटसम्राट’, आचार्य अत्रे यांचे ‘तो मी नव्हेच’, तसेच ‘घाशीराम कोतवाल’ आणि ‘सखाराम बाईंडर’ यांसारख्या नाटकांनी मराठी रंगभूमीला वैचारिक समृद्धी दिल्याचे त्यांनी सांगितले.

पूर्वीच्या काळात मनोरंजनाची साधने मर्यादित होती, त्यामुळे गावात एक तरी नाटक व्हायचेच. ध्वनी आणि प्रकाशयोजना नसतानाही अभिनयाच्या जोरावर नाट्यप्रयोग गाजायचे. त्या काळातील अनेक कलाकारांनी ग्रामीण रंगभूमी समृद्ध केली. कुर्डूसमधील रामचंद्र कमळ पाटील, नथुराम धर्मा पिंगळे, प्र.शं. पिंगळे, नटसम्राट म्हणून प्रसिद्ध असलेले बंडोपंत पिंगळे, मेढेखारचे सखाराम पाटील, ज.का. ठाकूर, पिटकिरीचे सदाशिव पाटील, गजानन पाटील, पेझारीचे राजन पांचाळ, बांधणचे प्रमोद पाटील, माणकुळेचे जितेंद्र कडवे, थळचे रणजीत घरत, नांगरवाडीचे सुनील धुमाळ, खिडकीचे गंभीर पाटील, पेझारीचे प्रकाश पाटील, हाशिवरेचे प्रणित म्हात्रे, हेमनगरचे पां.शि. पाटील, आर.के. पाटील, काचळीचे जना मास्तर, कुसुंबळेचे भास्कर पाटील, नेहुलीखंडाळाचे बबन पाटील, शहापूरचे राजाराम भगत तसेच नव्या पिढीतील प्रकल्प वाणी, संगीतकार विक्रांत वार्डे, उमाजीदादा, संकल्प केळकर, प्रतीक पानकर, सागर नार्वेकर, देवेंद्र केळुसकर, जितेंद्र पाटील, विजय म्हात्रे आणि काळोशी-खंडाळेगावच्या विजयाताई कुडव यांनी ग्रामीण रंगभूमीसाठी दिलेले योगदान मोठे असल्याचे त्यांनी गौरवाने नमूद केले.

विक्रांत वार्डे आणि राजन पांचाळ यांनी पी.एन.पी. नाट्यगृहातील महोत्सव यशस्वी करण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली. प्रतीक पानकर, अमोल मिठाग्री, दिनेश पाटील, अनिष मिठाग्री, संकल्प केळकर, देवेंद्र केळुस्कर, जितेंद्र पाटील, दीपक काळेल, यज्ञेश पाटील, प्रमोद पाटील, अंश म्हात्रे, यश बनसोडे, ऋषीं पडवळ, नितेश पाटील आणि सहकाऱ्यांनीही या उपक्रमात मोलाची साथ दिली.

### डिझेल माफिया पोलिसांच्या कचाट्यात

खबर ठाणे येथील गुन्हे शाखा घटक एक या विभागाला मिळाली. हा टँकर घेऊन चालक ठाणेकडून नाशिकडे जाणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर या पथकाने गुरुवारी(दि.२१) सकाळी ठाणे येथील खारेगाव टोल नाका येथे सापळा रचला. दिर्घ प्रतिक्षेनंतर एक टँकर असल्याचे दिसून आला. दुपारी सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास पथकाने टँकर थांबवला. टँकर चालकाची तपासणी करून टँकरमधील मालाची पडताळणी केली. त्यावेळी लाखो लिटरचा डिझेलचा साठा दिसून आला.चालक धर्मेंद्रकुमार पटेल याला ताब्यात घेण्यात आले. टँकरसह ४६ लाख ५० हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. त्यामध्ये पाच हजार प्रमाणे २५ हजार लिटरचा डिझेलचा समावेश आहे. याप्रकरणी चालक धर्मेंद्रकुमार पटेल, टँकरचे मालक रितेश सिंग, डिझेल माफिया राजू पंडित, सागर पाटील, रोशन शिरोडकर, नितीन कोळी, अनिल सुरत यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संगनमतांनी स्वतःच्या आर्थिक हितसंबंधासाठी डिझेलची बेकायदेशीर वाहतूक केल्याचा ठपका ठेवण्यात आला असून याप्रकरणी शिधावाटप अधिकारी सुभाष डुंबरे यांनी तक्रार दाखल केली आहे.

### तुंबलेल्या गटारांमुळे गंभीर धोका

मालमत्तेवर मोठे संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. २०२१ साली दिघी, माणगाव व पुणे हा सुमारे १६० किलोमीटरचा महामार्ग तब्बल २७० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आला होता. महामार्ग उभारल्यानंतर परिसराचा विकास होईल, वाहतूक सुलभ होईल आणि नागरिकांना सुविधा मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात रस्त्यालगत बांधण्यात आलेल्या गटारांची योग्य रचना आणि निचऱ्याची व्यवस्था नसल्याने हा विकासच आता स्थानिकांसाठी संकट ठरत आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही मोरबा रोडच्या दुतर्फा बांधण्यात आलेली गटारे आजही चिखल, प्लास्टिक, गवत आणि साचलेल्या घाणीने पूर्णपणे तुंबलेली आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी थेट रस्त्यावरून घरांकडे व शेतांकडे वळत आहे. गेल्या काही वर्षांपासून नागरिकांनी हा त्रास सहन केला असून प्रत्येक पावसाळ्यात घरात घुसणारे पाणी, दुर्गंधी आणि शेतीचे नुकसान यामुळे स्थानिक नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

महामार्ग बांधून पाच वर्षे उलटून गेली तरी गटारांची जबाबदारी नेमकी कोणाची, यावरून संबंधित विभागांमध्ये वाद सुरू असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नगरसेवक प्रशांत साबळे यांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने ठोस कारवाई केलेली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना तीव्र होत आहे. येत्या मुसळधार पावसापूर्वी प्रशासनाने तातडीने मोरबा रोडवरील गटारे स्वच्छ करून पाण्याचा योग्य निचरा करण्याची व्यवस्था करावी, अन्यथा खांदाड, सिद्धी नगर आणि बामणोली रोड परिसरातील ग्रामस्थ तीव्र आंदोलन छेडतील, असा कडक इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे खानांव, ता. खालापुर, जि. रायगड येथिल खालील परिशिष्ठात वर्णन केलेली अदिवासी खातेदार असलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| भाऊ राघो कातकरी वाघमारे, गुलाब लक्ष्मण वाघमारे, दत्ता वामन कातकरी, सुरेश वामन कातकरी | १४५/२ | १.०२.२० | ८.८६ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत दयावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड.मो.नं. ७७९८४३३८८८

सही /-
**ॲड. कैलास अनंत बासरे**

## निवडक



### माथेरानमध्ये पावसाची हजेरी

**माथेरान :** माथेरानमध्ये शुक्रवारी (दि.२२) मे रोजी सायंकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे व्यावसायिकांची तारांबळ उडाली असली तरी आलेल्या पर्यटकांना मात्र पावसाने दिलासा दिला असून गर्मीने वाढलेले तापमान पावसामुळे बदलले आहे. शनिवारी सकाळपासून येथील वातावरणामध्ये कमालीची गर्मी जाणवत होती. त्यामुळे पाऊस हजेरी लावणार हे नक्की होते परंतु माथेरानच्या आजूबाजूला मागील काही दिवसापासून अवकाळी पाऊस पडत असताना माथेरान मात्र, त्यापासून वंचित होते त्यामुळे पावसाबाबत शाश्वती नसताना अचानक आलेल्या पावसाने व्यवसायिकांची तारांबळ उडाली थोडा वेळच पडलेल्या पावसाने एमएससीबीने पुन्हा एकदा आपला रंग दाखविला पाऊस सुरू होताच वीज गायब झाली होती परंतु या सर्व घडामोडी मध्ये येथे आलेला पर्यटक राजा मात्र कमालीचा आनंदी झालेला दिसला यावेळी अनेक पर्यटकांनी पावसामध्ये भिजण्याचा आनंद घेतला पावसाबरोबर जोरदार धुके ही असल्याने सेल्फी काढताना अनेक पर्यटक दिसत होते.



### मान्सूनपूर्व घरांच्या शाकारणीला सुरुवात

**तळा :** तालुक्यात सध्या ग्रामीण भागात घरांच्या शाकारणीच्या कामांना नागरिकांनी सुरूवात केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. नेहमीच होणारा वातावरणीय बदल व मे पासून तर अनेकवेळा ढगाळ वातावरण व अनेक ठिकाणी पडणारा पाऊस यामुळे नागरिकांनी आता घरांच्या शाकारणीच्या कामांना जोरात सुरूवात केली आहे. तसेच मान्सून लवकर येईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवल्याने प्रत्येकाची कामे सुरू असल्याने मजूरीने माणसेही मिळेनाशी झाली आहेत. कोठे कौले फुटतुट, तर कोठे कौलारू घरांच्या रिपा कुजल्याने, तर काही घरांचे पत्रे तुटल्याने त्यात्या ठिकाणी नवीन कौले आणून टाकली जात आहेत. मात्र, ग्रामीण भागात आजही अधिक प्रमाणात कौलारू घरे असल्याने फुटतुट झालेल्या कौलांच्या ठिकाणी कौलांचाही तुटवडा पडत आहे. कौले बाजारात मिळताना कठिण होऊन बसले आहे.मात्र तरीही कौले उपलब्ध करून नागरिक आणत आहेत व घरांची शाकहारणी पावसाळ्या पूर्वी करण्यात नागरिकांची लगबग सुरू आहे.

# माणगाव तालुक्याची जैवविविधता धोक्यात

## ● वृक्षतोड, जलप्रदूषणांनी निसर्गाचा श्वास गुदमरला; पर्यावरणप्रेमींमधून तीव्र चिंता व्यक्त

**| माणगाव | प्रतिनिधी |**

एकेकाळी हिरव्यागार डोंगररांगा, स्वच्छ जलस्त्रोत, दाट जंगलं आणि समृद्ध जैवविविधतेसाठी ओळखला जाणारा माणगाव तालुका आज पर्यावरणीय संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. तालुक्यात सुरू असलेल्या बेकायदेशीर माती उत्खनन, बेसुमार भराव, जलप्रदूषण, अतिक्रमणे, नैसर्गिक जलस्त्रोत बंद करणे, बेछूट वृक्षतोड आणि वारंवार लागणारे वणवे यामुळे निसर्गाचे संतुलन ढासळत चालले असून पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.



तालुक्यातील अनेक भागांमध्ये दिवसाढवळ्या आणि रात्रंदिवस डोंगर पोखरण्याचे प्रकार सुरु असून, मोठ्या प्रमाणावर मातीचे उत्खनन करून नैसर्गिक रचना उध्वस्त केली जात आहे. यामुळे पावसाचे पाणी अडवणारे नैसर्गिक मार्ग नष्ट होत आहेत. परिणामी भूजल पातळी घटत असून नद्या, तलाव, विहिरी, ओढे आणि झरे उन्हाळ्यात कोरडे पडू लागले आहेत. अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होत चालली आहे. याशिवाय काही ठिकाणी नद्यांमध्ये आणि जलस्त्रोतांमध्ये बेकायदेशीर भराव टाकून त्यांचे प्रवाह रोखले जात असल्याचे चित्र आहे. माणगाव तालुक्याची जीवनवाहिनी काळ नदीच्या पात्रात मुंबई गोवा महामार्गाचे बायपास रस्ता करण्यासाठी आणि मोठे पुल उभारण्यासाठी मातीचे भराव टाकून कच्चे रस्ते तयार केले आहेत. काळ आणि गोद नदीच्या पाण्यावर माणगाव, निजामपूर, गोरेगाव आणि मोर्बा सहीत सुमारे १०० गावे अवलंबून आहेत. औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक प्रदूषणामुळे पाणी दूषित होत असून जलचर जीवसृष्टीवर गंभीर परिणाम होत आहेत. मासे, बेडूक, पक्षी आणि इतर अनेक जीवांच्या अधिवासावर याचा थेट परिणाम होत असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे. तालुक्यात वाढत चाललेल्या अतिक्रमणामुळे जंगल क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने पक्ष्यांचे निवासस्थान नष्ट होत आहे. उन्हाळ्यात वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे हजारो झाडे, औषधी वनस्पती आणि वन्यजीव भस्मसात होत आहेत. जंगलातील जैवविविधतेला हा मोठा धोका निर्माण झाला आहे. माणगाव तालुक्यातील निजामपूर, गांगवली परीसर हरीत पट्टा जाहीर केला असला तरी बेकायदेशीरपणे राजरोस अवैध मार्गाने अवैध मातीचे उत्खनन सुरू आहे. त्यामुळे जमिनीची मोठ्या प्रमाणात धुप होत असल्याने माणगाव शहराला दरवर्षी महापुराचा सामना करावा लागतो. तसेच अनेक गावांचा संपर्क तुटतो. पर्यावरणातील या बदलांचा फटका सामान्य नागरिकांनाही बसू लागला आहे. मागील काही वर्षांत माणगाव तालुक्यात तापमानात लक्षणीय वाढ झाली असून उष्णतेची तीव्रता असह्य होत चालली आहे. हवामानातील बदलामुळे शेती उत्पादनावर परिणाम होत असून शेतकरी चिंतेत आहेत. पावसाचे अनियमित प्रमाण, वाढते उकाडे आणि पाण्याचा तुटवडा यामुळे ग्रामीण जीवन विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक संघटनांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अनेक ठिकाणी कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. पर्यावरण वाचवण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. बेकायदेशीर उत्खनन आणि वृक्षतोड रोखणे, जलस्त्रोतांचे संरक्षण करणे, वणवे रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे तसेच पर्यावरणीय नियमांची कठोर अंमलबजावणी करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### निसर्ग वाचवा

आज निसर्ग वाचवला नाही, तर उद्या माणसाचे अस्तित्वच धोक्यात येईल, अशी भावना आता सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत असून माणगाव तालुक्याची पर्यावरणीय ओळख टिकवण्यासाठी लोकसहभागातून व्यापक जनआंदोलन उभे करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## नभ दाटून आले...



● मुरुडमध्ये उन्हाचा पारा प्रचंड वाढला असून शनिवारी सकाळी दाटून आलेल्या ढगांमुळे मुरूडकरांना काही प्रमाणात दिलासा मिळाला.
(छायाचित्र : सुधीर नाझरे)



### मुरूड समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

उन्हाळी सुट्टीतील शेवटच्या आठवड्यात समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे आणि धार्मिक ठिकाणांना भेट देण्यासाठी आज सकाळपासून मुंबई, पुणे, सातारा, नाशिक या जिल्ह्यातुन पनवेल याठिकाणावरुन आपल्या वाहनातून पर्यटक मुरूड राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला व मुरूड शहरातील समुद्रकिनारा पाहण्यासाठी गर्दी केली होती. काही पर्यटकांनी स्वच्छ सुंदर आणि निळसर समुद्रात पोहण्याचा आनंद घेतला तर काही जणांनी लहान मुलांसह समुद्राच्या वाळुवर चित्र रेखाटताना आनंद घेत होते. पर्यटकांची गर्दी वाढत असल्याने लॉजिंग, हॉटेल तसेच खानावळ व्यावसायिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत होते. पर्यटकांसाठी स्वच्छता, सुरक्षितता आणि उत्तम सुविधा उपलब्ध असल्याने पर्यटकांकडूनही समाधान व्यक्त केले जात आहे. आगामी काळातही पर्यटन हंगाम कायम राहिल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सत्यमेव जयते | महाराष्ट्र शासन | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

देशाचे जबाबदार नागरिक बनूया, घनकचरा व्यवस्थापनाचे नियम पाळूया.

महाराष्ट्रात १ एप्रिल २०२६ पासून 'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६' ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत

'बल्क वेस्ट जनरेटर (बीडब्ल्यूजी)' म्हणजे काय?

- दररोज सरासरी १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या इमारती/आस्थापना
- दररोज ४० हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या इमारती
- २० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या इमारती

'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' करावयाच्या गोष्टी

- राज्यातील सर्व 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' तात्काळ आपल्या आस्थापनेची ऑनलाइन पोर्टलद्वारे नोंदणी करणे अनिवार्य.
- 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी व विशेष काळजी योग्य कचरा अशा चार प्रकारांत आपल्या परिसरातच कचऱ्याचे विलगीकरण व प्रक्रिया करणे गरजेचे.
- इमारतीच्या परिसरात सध्या अस्तित्वात असलेल्या 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' प्रक्रिया न करता येणाऱ्या ओल्या कचऱ्याच्या विल्हेवाट व व्यवस्थापनेसाठी प्रक्रिया करणाऱ्या संबंधित आस्थापना/महानगरपालिका/नगरपालिका यांच्याकडून प्रमाणपत्र मिळवावे.
- 'बल्क वेस्ट जनरेटरनी (बीडब्ल्यूजी)' जैव-वैद्यकीय कचरा अधिकृत संस्थेकडे द्यावा.

महापालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि अधिसूचित क्षेत्रांना लागू
ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजी योग्य असे चार प्रकारात कचऱ्याचे वर्गीकरण आवश्यक
घर व आस्थापनांमधून कचरा संकलन अनिवार्य
मोठ्या कचरा उत्पादकांनी स्वतःच्या कचऱ्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक
कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक
कंपोस्टिंग आणि बायोमिथनेशनला प्रोत्साहन दिले जाणार
सुका कचरा पुनर्वापरासाठी पाठवणे आवश्यक
फक्त नॉन-रिसायकल आणि निष्क्रिय कचऱ्याचीच लँडफिलमध्ये विल्हेवाट लावली जाणार
उघड्यावर कचरा टाकण्यास बंदी
कचरा वाहतुकीसाठी बंद वाहने वापरणे आवश्यक
मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (MRF) उभारणे आवश्यक
Reduce-Reuse-Recycle केंद्रांना प्रोत्साहन दिले जाणार
सिंगल यूज प्लास्टिकविरोधात कडक कारवाई केली जाणार
नियम मोडल्यास दंड व वापर शुल्क आकारले जाणार




एक पाऊल प्रदूषणमुक्त महाराष्ट्रासाठी!

संपूर्ण तपशीलासाठी https://mpcb.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

@mpcb_official @MPCBOfficial

VENTURES

## निवडक


● (छायाचित्र : संजय गायकवाड)

### विद्यार्थ्यांच्या दाखल्यांसाठी उपोषण

**कर्जत** : कर्जत तहसील कार्यालयातील सर्व्हरचा व्यवस्थित चालत नसल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांना सर्व प्रकारचे दाखले वेळेत मिळत नसल्याने या गंभीर समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पोलीस मित्र संघटनेचे रमेश कदम यांनी प्रशासकीय कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरु केले आहे. रमेश कदम यांनी साखळी उपोषण सुरु केले. तालुक्यातील हजारो विद्यार्थी व नागरिकांना सर्व्हर व्यवस्थित चालत नसल्यामुळे सर्व प्रकारचे दाखले वेळेत मिळत नाहीत, त्यामुळे शासनाने व प्रशासनाने सर्व प्रकारचे दाखले ऑफलाईन देण्याची व्यवस्था करावी. सर्व्हर चालत नसल्यामुळे वेळेत दाखले मिळत नाही त्यामुळे उत्पन्न दाखले दाखल केलेल्या पावतीवर सर्व विद्यालयांत विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन उत्पन्नाचे दाखले दाखल करण्यास दोन महिन्यांचा कालावधी देण्यात यावा. अशा त्यांच्या मागण्या आहेत. बेमुदत साखळी उपोषणाची दखल घेऊन मागण्या पूर्ण न केल्यास कोणत्याही क्षणी बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. उपोषण स्थळी ॲड. कैलास मोरे, उबाठा शिवसेनेचे तालुका प्रमुख बाजीराव दळवी, मनसेचे माजी नगरसेवक प्रविण गांगल, शेकापचे विलास थोरवे, बाळू गुरव, दशरथ मुने, तानाजी ओबंले, सदाशिव कदम, रोहिदास घारे, परशुराम मोरे, मनोज सुर्वे दिनेश कालेकर आदींनी भेट देऊन पाठिंबा दिला. निवासी नायब तहसीलदार यांनी रमेश कदम यांची उपोषणस्थळी जाऊन भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर कदम यांनी ऑनलाईन प्रवेशाची मुदत वाढवावी. यासाठी पंचायत समिती शिक्षण विभागाच्या विरोधात येथेच सोमवारपासून साखळी उपोषण सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. आजपर्यंत दिवसाला शंभर दाखले नोंद होत होते. ते आता तीनशेच्या वर होऊ लागल्याने विद्यार्थी व पालकांना दिलासा मिळणार आहे, असे रमेश कदम यांनी सांगितले.



### पाली येथे गुरव समाजाची संवाद बैठक

**खरोशी** : सुधागड तालुक्यातील पाली येथे गुरव समाज रायगड-ठाणे-मुंबई संस्थेच्या वतीने महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०१६ संदर्भात संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष बंडू विरेश्वर खंडागळे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नवीन कायद्यामुळे गुरव पुजारी, व्यवस्थापक व वहिवाटदार यांना होणारे फायदे-तोटे यावर चर्चा करण्यात आली. बल्लाळेश्वर मंदिर तसेच धोंडसे येथील सुधागड किल्ल्यावरील भोराई देवी मंदिरातील पुजारी, व्यवस्थापक व वहिवाटदार यांनी बैठकीत सहभाग घेतला. राज्य सरकारने कायद्याबाबत सूचना व हरकती ५ जूनपर्यंत मागवल्या असून, त्या संदर्भात समाज बांधवांच्या उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले. तसेच सुधागड तहसीलदार यांनाही निवेदन देण्यात आले. लवकरच कोकण विभागीय आयुक्त यांनादेखील रायगड-ठाणे-मुंबई संस्थेंतर्गत पुजारी वर्गाकडून प्राप्त सूचना व हरकती सादर करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. बैठकीस मोठ्या संख्येने पुजारी, समाज बांधव व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



### वाहतूक शाखेच्या पोलिसांचा सन्मान

**चिरनेर** : उरण वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या अविरत मेहनतीची दखल घेऊन आयएसए लॉजिस्टिक्स प्रा.लि.तर्फे एका विशेष कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात आयएसए लॉजिस्टिकचे चेअरपर्सन संतोष शेट्टी, एचआर अभय वायकर व सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये आयएसए लॉजिस्टिकचे चेअरपर्सन संतोष शेट्टी यांनी उरण वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी अंमलदार अविरतपणे मेहनत घेऊन वाहतूक नियमन करून वाहतूक सुरळीत ठेवत असल्याचा उल्लेख करून, सर्व पोलीस अधिकारी अंमलदारांबद्दल गौरवोद्गार काढले. उरण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी आयएसए लॉजिस्टिक्स प्रा.लि.तर्फे दिलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्वांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या कार्याला सलाम केला. पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी समाजासाठी दिलेल्या निःस्वार्थ सेवेला सलाम करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा केंद्रांवर एआय कॅमेऱ्याची नजर

**खरोशी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मुक्त विद्यापीठाच्या राज्यभर असलेल्या अभ्यास केंद्रावरील विविध शिक्षणक्रमांच्या परीक्षांच्या निरीक्षणासाठी राज्यभरातील ५३८ परीक्षा केंद्रांवर एआय तंत्रज्ञानाने समृद्ध असलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित व गैरप्रकारमुक्त वातावरणात होण्यासाठी मा. प्र, कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार विद्यापीठ प्रशासनाने हे प्रगतीशील पाऊल उचलले आहे. या परीक्षा दिनांक २१ मेपासून सुरू झाली असून, तसेच पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या मुख्य परीक्षा या २७ मेपासून सुरू होत आहे. विद्यापीठाच्या आठही विभागीय केंद्रांतर्गत असणाऱ्या परीक्षा केंद्रांवर आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध असलेले सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. नाशिक येथील विद्यापीठ मुख्यालयातील नियंत्रण कक्षातून राज्यभरातील सर्व परीक्षाकेंद्रांवरील प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यापासून ते उत्तरपुस्तिका सीलबंद होईपर्यंतच्या सर्व हालचाली मॉनिटर करण्यात येणार आहे. तसेच परीक्षा कालावधीतील सीसीटिव्ही छायाचित्रणदेखील उपलब्ध असेल असे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव व वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे आणि मा. परीक्षा नियंत्रक श्री भटप्रसाद पाटील यांनी सांगितले.

# एमआयडीसीच्या सांडपाण्याने हजारो मासे मृत

## ● रोह्यातील शेडसई गावातील धक्कादायक प्रकार ● शेतकऱ्याचे लाखोंचे आर्थिक नुकसान

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील शेडसई गावात एमआयडीसी परिसरातून सोडण्यात आलेल्या रासायनिक सांडपाण्यामुळे एका प्रगतशील शेतकऱ्याच्या शेततळ्यातील हजारो मासे मृत झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरातील शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दोषींवर कठोर कारवाई करून तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.



शेडसई येथील गट क्रमांक ५८ मधील जमिनीवर प्रगतशील शेतकरी विलास सीताराम म्हात्रे यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०११-१२ मध्ये शेततळे तयार केले होते. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून त्यांनी या तळ्यात मत्स्यपालन सुरू केले होते. चितळा, बोईट, कट्टा आणि इतर विविध जातींच्या माशांचे त्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने संगोपन केले होते. गेल्या काही वर्षांपासून हा व्यवसाय चांगल्या पद्धतीने सुरू होता.

मात्र, आलेल्या भरतीच्या पाण्यासोबत एमआयडीसी परिसरातील रासायनिक केमिकलयुक्त सांडपाणी या भागात सोडण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. हे प्रदूषित पाणी थेट म्हात्रे यांच्या बंदिस्त शेततळ्यात शिरल्याने तळ्यातील असंख्य मासे तडफडून मृत झाले. मृत माशांचा दुर्गंध परिसरात पसरला असून, पर्यावरणीय धोक्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

या घटनेनंतर विलास म्हात्रे यांनी महसूल व कृषी विभागाकडे धाव घेतली असून, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी अधिकारी आणि कृषी सहाय्यक यांना लेखी निवेदन देत तात्काळ पंचनामा करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रदूषित पाणी सोडणाऱ्या संबंधित एमआयडीसी कंपनीचा शोध घेऊन त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, ''उद्योगांच्या निष्काळजीपणामुळे शेती, मत्स्यव्यवसाय आणि पर्यावरण धोक्यात आले आहे,'' अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने चौकशी करावी, संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी आणि पीडित शेतकऱ्याला योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आता संपूर्ण रोहा तालुक्यातून जोर धरू लागली आहे. त्यामुळे संबंधित प्रशासन काय कारवाई करतेय, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# नाते खिंडीतील नव्या रस्त्याला तडे

## ● संपूर्ण रायगड रोडच्या स्ट्रक्चरल ऑडिटची मागणी

**। महाड । प्रतिनिधी ।**

किल्ले रायगडकडे जाणाऱ्या मुख्य महामार्गावरील नाते खिंड परिसरात अवघ्या आठ दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या रस्त्याला तडे गेल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिक, वाहनचालक तसेच शिवप्रेमींमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित काम करणाऱ्या अक्षय कॉन्स्ट्रक्शन कंपनीच्या कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.



नाते खिंड ही रायगड किल्ल्याकडे जाणारी अत्यंत महत्त्वाची वाहतूक कडी मानली जाते. आगामी शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढणार आहे. अशा वेळी नुकतेच तयार करण्यात आलेल्या रस्त्यावर तडे गेल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अनेक वाहनचालकांनी रस्त्याच्या दर्जाबाबत नाराजी व्यक्त करत संबंधित कामात निकृष्ट साहित्याचा वापर झाल्याचा आरोप केला आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काम पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांतच रस्त्याची अवस्था खराब होऊ लागली. काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला खच दिसून येत असून, पावसाळा सुरू झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कोट्यवधी रुपयांची कामे होत असताना दर्जेदार काम अपेक्षित होते, मात्र प्रत्यक्षात निष्काळजीपणा दिसत आहे, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

दरम्यान, या घटनेनंतर संपूर्ण रायगड रोडचे स्वतंत्र तज्ज्ञ समितीकडून स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशीही मागणी पुढे येत आहे. प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग विभाग याबाबत काय भूमिका घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गेलच्या उरण-उसर प्रोपेन पाइपलाईन प्रकल्पाला वेग

**। पेण । प्रतिनिधी ।**

गेल इंडिया लिमिटेड यांच्या उरण-उसर प्रोपेन पाइपलाईन प्रकल्पाचे काम रायगड जिल्ह्यात वेगाने सुरू असून, उरण, पनवेल, पेण आणि अलिबाग तालुक्यातील एकूण ३५ गावांमधून ही पाइपलाईन टाकण्यात येत आहे. ही माहिती उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी (महाराष्ट्र राज्य), सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

प्रकल्पामध्ये उरण तालुक्यातील ७, पनवेल तालुक्यातील २, पेण तालुक्यातील १३ आणि अलिबाग तालुक्यातील १३ गावांचा समावेश आहे. हाती आलेल्या माहितीनुसार, उरण, पनवेल आणि अलिबाग

**रायगडातील ३५ गावांत काम प्रगतीपथावर**

तालुक्यांमध्ये १०० टक्के पंचनामा प्रक्रिया पूर्ण झाली असून, नुकसान भरपाई वाटपाचे काम सुरू आहे. संबंधित शेतकरी नुकसान भरपाईची रक्कम स्वीकारत असून, या तीन तालुक्यांमध्ये पाइपलाईन टाकण्याचे सुमारे ८० टक्के काम पूर्णत्वाकडे पोहोचले आहे. दरम्यान, पेण तालुक्यातील १३ गावांपैकी ७ गावांमध्ये पंचनामा प्रक्रिया पूर्ण झाली असून, त्या ठिकाणी नुकसान भरपाई वाटपाबरोबरच पाइपलाईन टाकण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे.

# डॉ. जयपाल पाटील यांना ‘समाजभूषण’ पुरस्कार जाहीर

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

शेतकरी व शेतकरी संघटनांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती तसेच आपत्ती सुरक्षा विषयक मार्गदर्शन करणारे अलिबाग येथील प्रगतीशील शेतकरी व प्राध्यापक डॉ. जयपाल पाटील यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्रराज्याचा ‘समाज भूषण राज्यस्तरीय सन्मान २०२६’ पुरस्कार जाहीर झाला आहे. स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे नेते बाबासाहेब पावसे पाटील यांनी ही घोषणा केली. समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.



हा पुरस्कार सोहळा रविवार, ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता माऊली संकुल सभागृह, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. खासदार भाऊसाहेब वाकचौरे, ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाकणे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, बबनराव पावसे पाटील व आ. रोहित पवार प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

# सेलिब्रेशन रिसॉर्ट कुंटणखाना प्रकरणाला दोन महिने पूर्ण

■ मुख्य आरोपी अद्याप पोलिसांपासून दूर
■ जामिनांवरून न्यायालयीन घडामोडींना वेग

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील बोरगाव हद्दीतील सेलिब्रेशन रिसॉर्टवर २३ मार्च रोजी पेण पोलीसांनी टाकलेल्या धाडीत उघडकीस आलेल्या कुंटणखाना प्रकरणाला आता दोन महिने पूर्ण झाले असून, अद्यापही या प्रकरणातील न्यायालयीन आणि पोलिसीय कारवाई सुरूच आहे. या कारवाईत तीन महिलांची सुटका करण्यात आली होती, तर घटनास्थळावरून चार जणांना ताब्यात घेण्यात आले होते. या चार जणांजवळून पोलीसांना मिळालेल्या माहिती नुसार या प्रकरणात सुनील मेहता, गणेश अण्णा, राजू मंडल आणि गणेश गायकर या चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आरोपींकडून जामिनासाठी विविध न्यायालयांत प्रयत्न सुरू झाले.




यामध्ये गणेश अण्णा, राजू मंडल आणि गणेश गायकर यांनी अलिबाग जिल्हा न्यायालय येथे जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांचे अर्ज फेटाळून लावले. त्यानंतर राजू मंडल आणि गणेश गायकर यांनी मुंबई उच्च न्यायालय येथे धाव घेतली. उच्च न्यायालयाने राजू मंडल यांचा जामीन अर्ज नाकारला, तर गणेश गायकर यांना काही अटी व शर्तींसह जामीन मंजूर करण्यात आला.

गणेश गायकर यांना मंजूर करण्यात आलेल्या जामिनातील महत्त्वाची अट म्हणजे संबंधित कुंटणखाना प्रकरणात असलेल्या आरोपी व्यक्तींशी सेलिब्रेशन रिसॉर्ट चालवयला देण्याच्या प्रत १२ मेपूर्वी पोलीस ठाण्यात जमा करणे आवश्यक होते. मात्र, आजपर्यंत संबंधित कागदपत्रे जमा करण्यात आलेली नसल्याने पेण पोलिसांनी गणेश गायकर यांचा जामीन रद्द करण्याची मागणी न्यायालयाकडे केल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपी मानला जाणारा सुनील मेहता हा उत्तर प्रदेशात असल्याची माहिती असून, तो अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. इतर आरोपींकडूनही न्यायालयीन दिलासा मिळवण्यासाठी हालचाली सुरू असल्याचे समजते. मात्र गणेश अण्णा आणि राजू मंडल यांना केव्हाही अटक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकावर मॉक ड्रील

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

मेट्रो स्थानकाचा ताबा घेणे, बॉम्ब ठेवल्याची धमकी आणि सुरक्षाविषयक आपत्कालीन प्रसंगांना तोंड देण्यासाठी नवी मुंबई मेट्रो मार्ग क्रमांक १ वरील सेंट्रल पार्क मेट्रो स्टेशन येथे व्यापक मॉक ड्रील आयोजित करण्यात आली. २० मे रोजी पार पडलेल्या या विशेष सुरक्षा सरावामध्ये नवी मुंबई पोलिसांचे शीघ्र प्रतिसाद दल, स्थानिक पोलीस अधिकारी, सिडको आणि महा मेट्रो प्रशासनाने संयुक्त सहभाग घेतला.

सिडको आणि महा मेट्रो यांच्या समन्वयातून घेण्यात आलेल्या या मॉक ड्रीलचा मुख्य उद्देश म्हणजे मेट्रो स्थानकांवरील सुरक्षाव्यवस्थेची तयारी, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा, प्रवासी निर्वासन प्रक्रिया, दळणवळण व्यवस्था आणि विविध यंत्रणांमधील समन्वयाची कार्यक्षमता तपासणे हा होता.

मॉक ड्रीलदरम्यान स्थानकावर अनधिकृतरीत्या ताबा घेण्याचा प्रयत्न आणि स्फोटक वस्तू ठेवल्याचा संशय अशा गंभीर परिस्थितीचे वास्तवदर्शी सादरीकरण करण्यात आले. आपत्कालीन परिस्थिती जाहीर होताच प्रशिक्षित जवानांनी तत्काळ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढणे, स्थानक विलगीकरण करणे, संशयित वस्तूंची तपासणी, गर्दी नियंत्रण आणि समन्वित सुरक्षा कारवाई सुरू केली.

या ड्रीलमध्ये पोलीस कर्मचारी, मेट्रो कर्मचारी आणि क्यूआरटी टीमने जलद हालचाल, अचूक समन्वय आणि तत्पर प्रतिसादाचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले. यामध्ये आपत्कालीन दळणवळण प्रणाली सक्रिय करणे, प्रवेश नियंत्रण उपाययोजना राबविणे तसेच वैद्यकीय आणि आपत्कालीन प्रतिसाद पथकांशी समन्वय साधण्याचाही समावेश होता.

याप्रसंगी उपस्थित वरिष्ठ पोलीस अधिकारी, क्यूआरटी टीमचे सदस्य, सिडको आणि महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सहभागी पथकांच्या व्यावसायिक कौशल्याचे आणि तात्काळ प्रतिसाद क्षमतेचे कौतुक केले. या मॉक ड्रीलमुळे सुरक्षाविषयक कार्यकारी सिद्धतेची चाचणी घेण्याबरोबरच भविष्यातील आपत्कालीन परिस्थितींमध्ये प्रवासी आणि पायाभूत सुविधांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना अधिक सक्षम करण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

# आज स्व. हिराजी कांडणेकरांची शोकसभा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील महाळुंगे (महादेवखार) येथील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते स्व. हिराजी कांडणेकर यांची शोकसभा आयोजित करण्यात आली आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. २४) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ही सभा होणार आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने आयोजितकरण्यातआलेलीशोकसभा ग्रामपंचायत महाळुंगे येथील मैदानात होणार आहे. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप ज्येष्ठ कार्यकर्ते तसेच खरेदी विक्री केंद्राचे चेअरमन शंकरराव म्हसकर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक गणेश मढवी, तालुका चिटणीस शिवराम महाबळे, रायगड जिल्हा मजूर फेडरेशनचे अध्यक्ष हेमंत ठाकूर उपस्थित राहणार आहेत. रोहा तालुका शेकाप पदाधिकारी, वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी या शोकसभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**स्थलांतरास ग्रामस्थांचा तीव्र विरोध | सुप्रीम पेट्रोकेम कंपनीला जागेसाठी पत्र**

# आरोग्य केंद्र भाड्याच्या जागेत हलविण्याचा घाट

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वांगणी आमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेम कंपनीच्या इमारतीत स्थलांतरित करण्याच्या हालचालींमुळे नागोठण्यात संतापाची लाट उसळली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही नसताना आरोग्य केंद्र भाड्याच्या जागेत हलविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



● (छायाचित्र : महेश पवार)

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून यासंदर्भातील पत्र वैद्यकीय अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले असून, रोहा तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सुप्रीम पेट्रोकेम कंपनीकडे जागा उपलब्ध करून देण्याबाबत पत्रव्यवहार केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शासन स्तरावर स्थलांतरासाठी हालचाली सुरू झाल्याची चर्चा आहे.

दरम्यान, आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीसाठी निधी नाही, मात्र भाड्यासाठी पैसे आहेत का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणात आर्थिक साटेलोट्याचीही चर्चा नागोठण्यात रंगू लागली आहे.

नागोठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रियाताई महाडिक व उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे यांनी या निर्णयाला कडाडून विरोध दर्शवित आरोग्य विभागाशी पत्रव्यवहार सुरू केला आहे.

शुक्रवारी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या बैठकीत त्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता नाईक यांच्यासमोर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य संतोष नागोठणेकर, शबाना मुल्ला, ज्योती राऊत यांच्यासह ग्रामस्थ व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीला विश्वासात न घेता स्थलांतराचा निर्णय घेणे चुकीचे आहे. नागोठणे हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने आजूबाजूच्या गावांतील, आदिवासी वाड्यांतील रुग्ण, गरोदर माता व बालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल. तसेच खासगी वाहनांचा खर्चही नागरिकांवर पडणार आहे.

दरम्यान, वाढता विरोध लक्षात घेता रोहा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियांका साळुंके यांनी नागोठणे ग्रामपंचायतीत भेट देऊन सरपंच सुप्रिया महाडिक व उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे यांच्यासोबत पर्यायी जागेबाबत चर्चा केली. नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतराचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. संबंधित प्रशासन याबाबत काय निर्णय घेतेय, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ मे

१) श्री. (डॉ) अशोक रामचंद्र माने
अलिबाग, २४-५-१९५०

२) श्री. विजय देवराम गाजरे
अलिबाग, २४-५-१९५६

३) श्री. शैलेश रामकृष्ण म्हात्रे
अलिबाग, २४-५-१९५६

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५

(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

# शेतकऱ्यांना डिझेल कॅड-डब्यात द्या

## • बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे शेकापची मागणी • भाई मोहन गुंड यांचा प्रशासनाला थेट इशारा

**| बीड | जिल्हा प्रतिनिधी |**

बीड जिल्ह्यात डिझेलची खुल्या स्वरूपातील विक्री बंद करण्याच्या आदेशामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, शेतीची कामे खोळंबण्याची वेळ आली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना डिझेल कॅड किंवा डब्यात देण्यास तातडीने परवानगी द्यावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तीव्र



आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी जारी केलेल्या आदेशानुसार सार्वजनिक सुरक्षेच्या कारणास्तव डिझेलची खुल्या स्वरूपात विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा निर्णय सुरक्षेच्या दृष्टीने योग्य असला तरी त्याचा थेट फटका जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पेरणी आणि आंतर मशागतीची कामे सुरू झाली आहेत. ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पंपसेट, जनरेटर, थ्रेशर यांसारखी शेती अवजारे थेट शेतातच वापरली जात असल्याने त्यामध्ये डिझेल भरण्यासाठी शेतकऱ्यांना कॅड किंवा डब्याचा वापर करण्याशिवाय पर्याय राहत नाही. प्रत्येक वेळी ट्रॅक्टर किंवा अवजारे पेट्रोल पंपावर नेणे शक्य नसते, कारण अनेक गावांमधून पंपांचे अंतर १० ते १५ किलोमीटरपर्यंत आहे.

डिझेल उपलब्ध न झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे अर्धवट सोडून द्यावी लागत आहेत. काही ठिकाणी डिझेल मिळत नसल्याने शेतकरी दुप्पट-तिप्पट दराने डिझेल विकत घेण्यास मजबूर होत असल्याची गंभीर बाबही निवेदनात मांडण्यात आली आहे.

भाई मोहन गुंड यांनी प्रशासनाला इशारा देताना म्हटले आहे की, देशात युद्धजन्य परिस्थिती असल्याचे आम्हालाही मान्य आहे. मात्र, अन्नदाता शेतकरी जगला तरच देश जगेल. शेतीच बंद पडली तर ते युद्धापेक्षाही मोठे संकट ठरेल. त्यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय तातडीने घ्यावा.

शेतकऱ्यांच्या अडचणींचे गांभीर्य लक्षात घेऊन डिझेल कॅड किंवा डब्यात देण्यास तातडीने परवानगी द्यावी, अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# अध्यक्षपदी ॲड. किशोर ठाकूर

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुका बार असोसिएशनच्या सन २०२६ ते २०२८ या कार्यकाळासाठी झालेल्या निवडणुकीत वकिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण १९९ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांसाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत अखेर ॲड. किशोर ठाकूर, ॲड. प्राची पाटील आणि ॲड. योगेश म्हात्रे यांनी विजय मिळवला.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत किशोर ठाकूर यांनी ११४ मते मिळवत विजय संपादन केला. त्यांच्या विरोधात उभे असलेल्या निनाद नाईक यांना ८३ मते मिळाली. तर दत्तात्रेय नवाळे यांना १ मत मिळाले. ॲड. नवाळे यांनी निवडणुकीतून माघार घेतली होती, मात्र त्यांचे नाव मतपत्रिकेत कायम असल्याने त्यांना एक मत मिळाले.

महिला उपाध्यक्षपदासाठी प्राची निग्रेश पाटील ऊर्फ ॲड. प्राची जोशी, भारती भोईर आणि अपक्ष उमेदवार वृषाली नवनीत पाटील यांच्यात तिरंगी लढत झाली. मात्र, ॲड. प्राची पाटील यांनी १०३ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला. ॲड. भारती भोईर यांना ७४ मते, तर ॲड. वृषाली पाटील यांना १५ मते मिळाली.पुरुष उपाध्यक्षपदासाठीही चुरशीची लढत पाहायला मिळाली. माजी न्यायाधीश चंद्रहास म्हात्रे यांचे शिष्य योगेश म्हात्रे आणि अमर पाटील यांच्यात अटीतटीची लढत झाली. त्यात ॲड. योगेश म्हात्रे यांनी १०४ मते मिळवत विजय मिळवला, तर ॲड. अमर पाटील यांना ९४ मते मिळाली.

# मालमत्ता कर विभागाची दखल

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

पालिकेच्या मालमत्ता कर विभागात राबविण्यात येणाऱ्या आधुनिक व डिजिटल कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या पथकाने पनवेल महानगरपालिकेस भेट दिली. या अभ्यास भेटीदरम्यान दोन्ही महानगरपालिकांमध्ये प्रशासकीय अनुभव व कार्यप्रणालीची देवाणघेवाण करण्यात आली. यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना मालमत्ता कर विभागातील विविध प्रक्रिया, कर आकारणी पद्धती, पुनर्मूल्यांकन तसेच डिजिटल उपक्रमांविषयी माहिती दिली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागात सुरू असलेल्या सुधारित कार्यप्रणालीचे सादरीकरणही करण्यात आले.

# उरण पालिकेचा भोंगळ कारभार

## सहीशिवाय जनगणना कागदपत्रांनी शिक्षक अडचणीत

**| उरण | प्रतिनिधी |**

देशभर ऑनलाईन फसवणुकीचे जाळे दिवसेंदिवस वाढत असताना शासनाने सुरू केलेल्या भारताची जनगणना २०२७ मोहिमेत उरण नगरपालिकेचा धक्कादायक आणि बेफिकीर कारभार समोर आला आहे. जनगणनेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना देण्यात आलेली नियुक्तीपत्रे आणि ओळखपत्रे ही अधिकृत सहीशिवायच वाटण्यात आल्याने संतापाची लाट उसळली आहे.

प्रगणक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना 'जनगणना अधिनियम १९४८' अंतर्गत कायदेशीर जबाबदाऱ्या सांगणारे नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यावर उरण नगरपरिषदेचा शिक्का झळकतो; मात्र ज्या मुख्याधिकाऱ्यांची सही असणे बंधनकारक आहे, ती सहीच गायब! त्यामुळे हे पत्र खरे की बनावट? असा प्रश्न जनतेसमोर उभा ठाकला आहे.

विशेष म्हणजे मुख्याधिकारी समीर जाधव रजेवर असल्याची




माहिती असून, प्रभारी अधिकाऱ्यांचा कारभार ''येतील तेव्हा'' अशा पद्धतीने सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. नगरपालिकेचे प्रभारी घाडगे यांच्याकडे विचारणा केली असता ''असाच अनुभव आम्हालाही येत आहे,'' अशी कबुली त्यांनी दिल्याचे समोर आले आहे. याचा सर्वाधिक फटका शिक्षक वर्गाला बसत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत कुटुंबापासून दूर राहून जनगणनेचे काम करणाऱ्या शिक्षकांना आता नागरिकांच्या संशयाचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी ''हे आयकार्ड खरे आहे का?'' असा सवाल करत शिक्षकांना दारातूनच हाकलले जात असल्याचे चित्र आहे. महिला शिक्षिकांनाही अपमानास्पद वागणूक मिळत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

एका बाजूला शासन ''जनगणनेद्वारे सार्वजनिक कल्याण''चा नारा देत आहे, तर दुसऱ्या बाजूला अधिकृत सहीशिवाय कागदपत्रे देऊन शिक्षकांना संशयाच्या भोवऱ्यात ढकलले जात आहे. हा निष्काळजीपणा की प्रशासनाचा भोंगळपणा? असा सवाल आता उरणकर विचारू लागले आहेत.

जनतेचा विश्वास मिळवायचा असेल तर शासनाने तात्काळ दखल घेऊन अधिकृत सहीसह वैध नियुक्तीपत्रे आणि ओळखपत्रे देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा जनगणनाऐवजी ''जनतेचा संताप'' मोजण्याची वेळ प्रशासनावर येईल, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# 'इथापे, गवस यांचे नगरसेवक पद रद्द करा'

**नवी मुंबई :** प्रभागातील टेंडरवरुन महापालिका मुख्यालयातील दुसऱ्या मजल्यावर जाहिररित्या वाद घालणारे भाजपचे नगरसेवक रविंद्र इथापे आणि नगरसेवक प्रदीप गवस यांचे पद रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष व कामगार नेते रविंद्र सावंत यांनी महापालिका आयुक्त कैलास शिंदे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी निवेदनातून केली आहे.

नवी मुंबई महापालिकेतील भाजपचे नगरसेवक रविंद्र इथापे आणि नगरसेवक प्रदीप गवस हे महापालिकेतील टेंडर प्रक्रिया व ठेकेदारावरुन सभागृहात जाहिररित्या वाद घालत असल्याने नियम व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी त्यांचे नगरसेवक पद रद्द करावे, असे रविंद्र सावंत यांनी म्हटले महापालिका कार्यक्षेत्रात कोणती विकासकामे करावीत, त्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया मागवावी, टेंडरसाठी निविदा मागवाव्यात ही सर्व प्रशासकीय प्रक्रिया आहे.

# विमानतळ प्रकल्पग्रस्त युवकांची फसवणूक?

## • 'बोल्ड विंग' संस्थेविरोधात संताप

**| उरण | प्रतिनिधी |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्त युवकांची नोकरीच्या आमिषाने फसवणूक होत असल्याच्या प्रकरणाची गंभीर दखल आ. रोहित पवार यांनी घेत सिडको प्रशासनाकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे. एअरपोर्ट ट्रेनिंग, जॉब गॅरंटी आणि प्लेसमेंटच्या नावाखाली बेरोजगार युवकांकडून हजारो ते लाखो रुपये उकळल्याचा आरोप आ. पवार यांनी 'बोल्ड विंग' या खासगी प्रशिक्षण संस्थेवर केला आहे.

उरण, पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील प्रकल्पग्रस्त युवकांना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप समोर आला आहे. प्रशिक्षणासाठी मोठी रक्कम भरूनही नोकरी न मिळाल्याने युवकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यासंदर्भात उरण नगर परिषदेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्याकडे स्थानिक युवक जय मधुकर पाटील यांनी लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, विमानतळावर नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत संबंधित संस्थेने त्यांच्याकडून तब्बल ८८ हजार रुपये घेतले. मात्र, पैसे भरूनही कोणतीही नोकरी मिळाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

प्रकल्पग्रस्त युवकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, ''जमिनी आमच्या गेल्या, रोजगाराचे आश्वासन सरकारने दिले आणि आता नोकरीच्या नावाखाली आमचीच लूट सुरू झाली,'' अशी भावना व्यक्त केली.

आमदार रोहित पवार यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, विमानतळ प्रकल्पात स्थानिक आणि प्रकल्पग्रस्त युवकांना रोजगारात प्राधान्य मिळणे हा त्यांचा नैतिक आणि कायदेशीर हक्क आहे. मात्र, काही खासगी संस्था आणि दलाल बेरोजगारांच्या भावनांशी खेळत असल्याचे चित्र समोर येत असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा सुरू झाली असून, संबंधित संस्थेकडे अधिकृत परवानगी आहे का, युवकांकडून उकळलेले पैसे कुठे गेले आणि या प्रकाराला कोणाचे संरक्षण आहे का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याबाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे.

स्थानिक युवकांनी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. नोकरीच्या नावाखाली बेरोजगारांची स्वप्ने विकणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २४ ते ३० मे २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## भावनांना आवर घाला

**मेष :** हा सप्ताह मेष राशीधारकांना चांगली बातमी मिळणार आहे. आपल्याला अपेक्षित असणारी बातमी मिळू शकेल. एखादा जुना जिवलग मित्र-मैत्रिणीची गाठभेट होईल. खूप दिवसांपासून मनात असलेल्या गप्पांना बाहेर पडता येईल. मात्र, भावनेच्या भरात वाहात जाऊ नका, नाहीतर फसवणुकीला आपण अडवू शकणार नाहीत. दुसऱ्या बाजूला पती-पत्नीतील दुरावा संपून जाईल, दुराव्याची जागा प्रेम घेईल. वाहन खरेदीच्या बाजूने हालचाल करण्यास योग्य कालावधी आहे. एखाद्या पार्टीचे आमंत्रण येईल. स्वतःवर ताबा ठेवता येईल, अशाच पार्टीला जा, नाहीतर आपण हास्यापद होऊ शकाल. काळजी घेणे आपल्या हातात आहे. एका बाजूला मौजमज्जा आणि दुसऱ्या बाजूला आंगावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या यामुळे आपली मनःस्थिती द्विधा होण्याचा संभव आहे. कलाकारांना एकदा सन्मान मिळण्याच्या दृष्टीन हालचाल होईल. **महिलांना-** महिलावर्गाचे दिवस आनंदात जाणार आहेत, प्रेम प्रकरणापासून लांब राहावे. जागरणाचा त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक-** २४,२७.

## पैशाचे गणित लाभदायी

**वृषभ :** हा सप्ताह वृषभ राशीसाठी महत्त्वाकांक्षा वाढवणारा ठरणार आहे. व्यापारीवर्गाला व्यापाराचा नवा मार्ग सापडेल, त्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली होऊन आपले ध्येय गाठणे सोपे होईल. क्षितिजापर्यंत जाण्याचा मार्ग सापडेल. आपण घेतलेले निर्णय यशस्वी ठरतील. त्याचप्रमाणे आपण मनात असलेली गुंतवणूक त्या मार्गाने पावले उचलली जाणे यांचे समीकरण उत्तम जमेल. नोकरदारांना जास्तीचे काम करावे लागले, तरी त्याचा योग्य परतावा मिळेल. आपले अधिकारी आपल्यावर खुश होतील. आपण नोकरी धंद्यात नियमांचे योग्य पालन केल्यास कामावर पकड बसेल. पैशाचे गणित आपल्यासाठी लाभदायी ठरेल. अनेक कामकाजात आपला आवाज वरच्या पातळीवर राहू शकेल. आपण एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल. **महिलांना-** आपल्या नात्यातील सलोखा वाढता राहील. मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. आपल्यासोबत आजूबाजूच्या लोकांचा सहभाग आपल्याला प्रेरणादायी असेल. **शुभदिनांक-** २७,२८.

## जबाबदारी घेताना विचार करा

**मिथुन :** हा सप्ताह मिथुन राशीसाठी वेगळा ठरू शकतो. आपल्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्या वाढवत जाऊ नका, ग्रहांची पकड घट्ट राहील. कामात आलेल्या अडथळ्यांचे प्रमाण कमी होऊ लागेल. आगामी काळासाठी केलेला विचार योग्य ठरेल. अपेक्षित फलप्राप्ती वाढलेली असेल. उत्पन्नातील घटते प्रमाण कमी होईल. ग्राहकांची मने वळवण्यास अनुकूलता राहील. नोकरदार वर्गाने अंगलट येणाऱ्या गोष्टींपासून लांब राहावे. जास्तीची जबाबदारी घेताना विचार करा. नियोजनानुसार स्वरूप ठरवा. आपले योगदान राजकीयबाबतीत महत्त्वाचे ठरणार आहे. व्यसनी मित्रांच्या संगतीपासून लांब राहा. इतरांना सल्ला देताना बोलण्यातील जरब धारदार करू नका, नाहीतर समोरच्याचा गैरसमज होऊन आपले नुकसान होऊ शकते, त्यामुळे आपली भाषा गोड ठेवा. आरोग्याच्या बाबतीत अजूनही आपण रेड झोनमध्ये राहणार आहात, हे विसरू नका. **महिलांना-** महिलावर्गाने या कालवधीत आपल्या मनातील विचारांना पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने हालचाल केली तर आपणाला सहज यश मिळेल. **शुभदिनांक-** २६,२९.

## नोकरदारांनी संधी पाहून निर्णय घ्यावे

**कर्क :** हा सप्ताह कर्क राशीधारकाने आर्थिकदृष्ट्या जपून पावले टाकण्याची गरज आहे. राजकीय क्षेत्रातील आपले कर्तव्य बिनदिक्कत पार पाडा. तुमचे वक्तृत्व योग्य दिशा दाखवणारे असेल. सध्याच्या कालावधीत घाईगडबड व पळापळीने आपला दिनक्रम करू नका. हळुवारपणाने वाटचाल राहू द्या. पोलीस, मिलिटरी, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रांतील व्यक्तींना धाडसी पराक्रम करावे लागतील. जबाबदारीने उचललेले पाऊल यशस्वीरित्या पार पडेल. निर्माण झालेल्या प्रश्नातून मार्ग निघेल. नोकरदारवर्गाला परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागतील. ठरलेला दिनक्रम बदलत जाईल. अनपेक्षित मिळालेल्या लाभातून योग्य गुंतवणूक करा. राजकारणातील वातावरण भडक होऊ देऊ नका. सामंजस्याने तोडगा काढा. नात्यातील गैरसमजाची वाढलेली दरी कमी होईल. वैवाहिक जीवनातील प्रयत्नांना संथ गती मिळेल. **महिलांना-** कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. आपण वाहन चालवत असाल तर काळजी घेऊन ते चालवा. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड राहील. खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा. **शुभदिनांक-** २५,३०.

## महत्त्वाची कामे मार्गी लागतील

**सिंह :** हा सप्ताह सिंह राशीसाठी प्रगतीकारक आहे. अनुभवी लोकांच्या योग्य मार्गदर्शनाने महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण करू शकाल. जुनी येणी वसूल होऊ शकतील, त्या बाजूने प्रयत्न करा, यश मिळेल. कुटुंबिक जीवनात आनंदाचे क्षण अनुभवाल. षष्ठ व अष्टमस्थानातून होणारे चंद्राचे भ्रमण मनाची चंचलता वाढवणारी आहे. तेव्हा सर्वच अपेक्षेप्रमाणे व्हावे. तूर्तास तरी बाजूला ठेवा. व्यावसायिक स्तरावर मोठी कसरत करावी लागेल. सध्या फार मोठी गुंतवणूक करणे टाळा. हिशोबाची नोंद ठेवायला विसरू नका. नोकरीत आकस्मिक घडामोडी होतील. कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करा. अनेक विचार बाजूला ठेवून कार्यमग्न राहा. पूर्वी केलेल्या बचतीतून खर्चाचे तंत्र वाढवू नका. सामाजिक भान ठेवायला विसरू नका. माहीत नसलेल्या गोष्टींवर न बोलणे केव्हाही चांगले. प्रेम प्रकरणापासून लांब राहा. **महिलांना-** महिलावर्गाने कुटुंबातील सर्व सदस्यांना जपण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. **शुभदिनांक-** २४,२८.

## भूलथापांना बळी पडू नका

**कन्या :** हा सप्ताह कन्या राशीसाठी शत्रूची ताकद वाढवणारा आहे. विरोधक आपल्याला पाडण्यासाठी कोणत्याही पातळीवर जाऊ शकतात. आपण डोक्यात कोणताही राग न ठेवता आपले कार्य करा, आपल्यापाठी चांगल्या कार्याची पोचपावती उपयोगी पडणार आहे. या काळात न झेपणाऱ्या गोष्टींसाठी प्रयत्न करणे टाळा. कोर्ट प्रकरणात स्वतःहून गुंतागुंत करू नका. कला, साहित्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत स्पर्धा करणे टाळा. व्यवहार क्षेत्रात व्यवहाराच्या नोंदी सूक्ष्म स्वरूपात ठेवा. कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. ग्राहकांची फसवणूक होऊ देऊ नका. नोकरीत कामाव्यतिरिक्त भलताच प्रश्न उभा करू नका. आतापर्यंत पाठीशी असलेले लोक पाठ फिरवत नाहीत ना याचे निरीक्षण करा. मोठ्या खर्चावर वेळीच नियंत्रण आणा. सामाजिक गोष्टीतून नियोजनबद्ध आखणी करून मोठा विकास साधू शकाल. **महिलांना-** महिलावर्गाने संततीच्या आरोग्याची काळजी घ्या. जोडीदाराला सूचणाऱ्या कल्पना प्रगतीचे स्वप्न असेल. कौटुंबिक कार्यक्षमता वाढवा. दैव अनुकूल राहील. स्वतची तब्येत सांभाळून काम करा. मनात विचाराची गर्दी करू नका. शुभदिनांक- २५,२९ .

## संपत्तीविषयक प्रश्न हळूहळू सुटतील

**तुळ :** हा सप्ताह तुळ राशीसाठी समाधानकारक असणार आहे. संपत्तीविषयक प्रश्न आपल्या घरातून हळूहळू सुटू लागतील. घरातील विरोधकही आपल्याशी याबाबत बोलण्यास तयार होतील, त्यामुळे यावेळेचा सदुपयोग करा. आपली उधारी आता वसूल होणार आहे, त्याचे टेंशन घेऊ नका. पुरेसा पैसा हाती येईल. सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतःच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. वाढणाऱ्या कार्यशक्तीतून सहज मार्ग स्वीकारा. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य व अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री मिळेल. **महिलांना-** महिलावर्गाने पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तिगत स्वार्थ साधू नका. **शुभदिनांक-** २४,२७.

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**वृश्चिक :** हा सप्ताह वृश्चिक राशीसाठी प्रयत्न वाळूचे कण रंगडीता तेल ही गळे हे अनुभवण्यास मिळणार आहे. या आठवड्यात आपण यश खेचून आणू शकता, तुमच्यात ही जिगर आहे. पण, बोलण्यात घालवता, आपले तोंड बंद ठेवलेत तर बऱ्याच चांगल्या गोष्टी आपल्या हातातून जाणार नाहीत. सध्याच्या ग्रहस्थितीने संघर्षांतून सकारात्मक दृष्टी वाढवेल. व्यावसायिक क्षेत्रात ग्राहकांच्या असलेल्या मागण्या पूर्ण करण्यास वाव मिळेल. उत्पन्नवाढीचे परिणाम चांगले राहतील. उद्योगधंद्यातील आजवरचा असलेला अनुभव महत्त्वाचा ठरेल. नोकरीतील विशिष्ट पदासाठी तुमची निवड करण्यात येईल. अनेक प्रश्नांची मालिका उभी राहणार नाही याकडे लक्ष द्या. हातासरशी वाटणाऱ्या गोष्टी अवघड वाटू लागतील. आर्थिक प्रगती उत्तम राहील. सामाजिक क्षेत्रात थोरामोठ्यांच्या गाठी पडतील. मुलांच्या भविष्यासाठी केलेल्या तरतुदीचा फायदा होईल. एखाद्या मित्राची मोठी जबाबदारी घ्यावी लागेल. **महिलांना-** महिलावर्गाने भावंडांविषयी किंतु परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. तब्येतीत सुधारणा होईल. **शुभदिनांक-** २५,२६.

## व्यवसायात प्रगती साधू शकाल

**धनु :** हा सप्ताह धनु राशीसाठी अपेक्षा नसताना देणारा आहे. ज्यावेळी अपेक्षा नसताना मिळते, त्याचा आनंद गगनात मावत नाही. नवीन नोकरी, व्यवसाय याबाबत हालचाल करण्यास हरकत नाही. एखादी संधी आपल्याकडे चालत येणार आहे. अकल्पित वस्तू घेताना चुकीच्या गोष्टींना प्राधान्य देऊ नका. सध्याच्या ग्रहांची अवस्था कामातील खाचखळगे कमी करणारे असतील. इतरांच्या विचारापेक्षा स्वतःच्या बुद्धिकौशल्याचा वापर करा. बुद्धिमत्तेच्या जोरावर व्यवसाय प्रगती साधू शकता. सध्या फार मोठ्या नफ्याची अपेक्षा ठेवू नका. कमीत कमी तोटा सहन करावा लागणार नाही. किरकोळ गोष्टीतूनसुद्धा समाधान मिळण्याचे संकेत जास्त वाढू शकतात. संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात तुमचा हातखंडा मोठा असेल. नोकरीच्या समस्या कमी होतील. इतरांकडून घेतलेले हातउसने पैसे परत करून जबाबदारीतून बाहेर पडाल. व्यसनी लोकांपासून लांब राहा. **महिलांना-** महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नंतर संधी मिळणार आहे, फक्त थोडा संयम ठेवा. **शुभदिनांक -** २८,३०.

## आर्थिक साहाय्य लाभेल

**मकर :** हा सप्ताह मकर राशीसाठी संगतीचा परिणाम अधोगतीत तर होणार नाही ना, हे पाहणे गरजेचे ठरेल. आर्थिक व्यवहारात प्रत्येक पाऊल जपून टाकणे महत्त्वाचे ठरणार आहे. आपण खोटे बोलण्यापासून आणि खोटे बोलणाऱ्यांपासून लांब राहणे आपल्या भविष्यासाठी चांगले आहे. या कालावधीत कौटुंबिक कलह निर्माण करू नका. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचा क्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. **महिलांना-** स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. **शुभदिनांक-** २८,२९,

## पैशांची आवक वाढेल

**कुंभ :** या सप्ताहात आपल्याकडे येणाऱ्या पैशांची आवक वाढणार आहे, मात्र खर्चावर नियंत्रण ठेवणे भाग आहे. आपल्या मनाप्रमाणे कामे सुरळीत होणार आहेत. घरासाठी खर्च होईल. जागा, जमीन यांचा व्यवहार करत असाल तर फायदा होईल. मोठी पार्टी चालून येईल, थोडे कामाच्या पाठी लागा. यश मिळू शकेल. या ग्रहस्थितीमध्ये असणारा योग उत्तम राहील. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. व्यवसायाच्या दृष्टीने आगामी काळाचा अंदाज चांगला येईल. अनुकूलतेची चाहूल लागेल, पण ताटात वाढलेले पदार्थ प्रत्यक्षात तोंडात जाईपर्यंत काही होऊ शकते. नोकरदारांना मिळणारा थोरामोठ्यांचा विश्वास यातून चांगल्या गोष्टी घडवण्यासाठी सिद्ध व्हाल. मात्र, चारही बाजूंनी आवश्यक असणारी खबरदारी घेणे आवश्यक ठरेल. या सगळ्यातून वाढणारी जबाबदारी विसरू नका. कोठेही कायद्याचे उल्लंघन करू नका. **महिलांना-** आपल्या नियोजनात अचूकपणा असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. स्वतःचे आरोग्य तंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. **शुभदिनांक-** २६,२७.

## कष्ट वाढवा, फायदाही वाढेल

**मीन :** हा सप्ताह मीन राशीसाठी वेळ व धन या दोन्ही बाबी आपल्या समाधान योग्य नसणार आहेत. आपला वेळ कसा जाईल हे समजून येणार नाही. हातात त्या प्रमाणात योग्य पैसा पडणार नाही, त्यामुळे आपल्या नियोजनाला महत्त्व येणार आहे. घर, जागेच्या कामासंबंधी व्यवहार करू नका. उगाच कोर्टकचेरी होईल, हे व्यवहार पुढे ढकलणे फायद्याचे राहतील. या काळात वादविवादापासून लांब राहा. हा सप्ताह व्यापार-व्यवसायाच्या दृष्टीने अपेक्षित अशा क्षेत्रात जाण्यासाठी सोनेरी पायड्या टाकणारा ठरेल. कष्टाचे प्रमाण वाढवावे लागले तरच फायद्याचे प्रमाणही वाढलेले असेल. स्वत:च्या हिमतीवर महत्त्वाचे निर्णय घेऊ शकाल. नोकरदार व्यक्तीने वरिष्ठांशी असलेले संबंध ताणले जाणार नाहीत, याची काळजी घ्या. अतितिखट बोलणे टाळा. कोर्ट प्रकरणात शक्यतो कायदेशीर तडजोडीच्या मागे लागा. नियोजनबद्ध केलेल्या कामात हक्काचे यश मिळवता येईल. आर्थिक प्रकरणात सरशी होईल, मात्र खर्चावर निर्बंध ठेवा. **महिलांना -** मित्र-मैत्रणींसोबत किरकोळ कुरबुरीना मोठ्या स्वरूपात वाढवू नका. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. **शुभदिनांक -** २४,२५.

# भाताण ग्रामस्थांचा जमिनीच्या निर्णयाला विरोध

## • भविष्यात सार्वजनिक सुविधांसाठी जागा आवश्यक • शासनाकडे पुनर्विचाराची मागणी

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

तालुक्यातील भाताण गावात ॲमिटी विद्यापीठासाठी १५ एकर आकारीपड जमीन देण्याच्या शासन निर्णयाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर सरपंच तानाजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपसरपंच दीपक ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य अरुण पाटील, अस्मिता काठवले, अरुणा गाताडे, रसिका भोईर यांच्यासह माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ग्रामसभेत अनेक ग्रामस्थांनी संबंधित जमीन वर्षानुवर्षे स्थानिक शेतकरी कसत असून त्यावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच गावठाण विस्तार, वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील सार्वजनिक सुविधांसाठी ही जागा आवश्यक असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. ग्रामस्थांनी शासन आणि प्रशासनावर थेट आरोप करत भूमिपुत्रांच्या हक्काची जमीन खासगी संस्थांच्या घशात घालण्याचा प्रकार आम्ही कदापिही सहन करणार नाही, असा इशारा दिला. विशेष म्हणजे जरी सदर जमीन कागदोपत्री आकारीपड दाखवण्यात आली असली तरी अनेक शेतकरी वर्षानुवर्षे ती जमीन कसत असून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असल्याचा मुद्दा ग्रामसभेत जोरदारपणे मांडण्यात आला.

सन २०२३ पासून गावठाण विस्तारासाठी जागा राखीव ठेवण्याबाबत ग्रामपंचायतीमार्फत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

मात्र, ग्रामस्थांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून खासगी विद्यापीठाला जमीन देण्याचा निर्णय घेतल्याने नाराजी वाढल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामसभेत शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. तसेच पुढील पाठपुराव्यासाठी ग्रामस्थांच्या वतीने कोर कमिटी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही कमिटी संबंधित शासकीय विभाग, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला निवेदने देणार असल्याचे सांगण्यात आले.

### आंदोलनाचा इशारा

आठ दिवसांत शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल, असा इशाराही काही ग्रामस्थांनी यावेळी दिला. गावाच्या हक्काची जमीन वाचवा अशा घोषणांनी ग्रामसभा परिसर दणाणून गेला होता. भाताणमधील या विषयामुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून येत्या काळात हा प्रश्न अधिक गाजण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# वरंध गावात कृषीदूतांकडून माती परीक्षणाचे प्रात्यक्षिक



**महाड :** महाड तालुक्यातील वरंध गावात ग्रामीण कृषि जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषिदूतांनी शेतकऱ्यांना माती परीक्षण व मृदा नमुना संकलनाचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली संलग्न रायगड शैक्षणिक संकुल महाड संचलित कृषी महाविद्यालय मोहोप्रे-आचळोली येथील विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबविला.

यावेळी शेतकऱ्यांना योग्य पद्धतीने मातीचा नमुना कसा घ्यावा, माती परीक्षणाचे महत्त्व, खतांचा संतुलित वापर आणि उत्पादनवाढीसाठी माती परीक्षणाचा होणारा फायदा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच जमिनीतील अन्नद्रव्यांची कमतरता ओळखून योग्य व्यवस्थापन कसे करावे, याचे मार्गदर्शनही करण्यात आले. कृषीदूतांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन माती नमुना संकलनाची पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे दाखवून दिली. हे प्रशिक्षण शेतकऱ्यांसाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरले.

प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस.एस. रायकर व विषयतज्ज्ञ प्रा. एन.व्ही. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. कृषीदूतांमध्ये कौशल ठाकूर, रोहन निंबाळकर, स्वप्नील चव्हाण, गौरव काळे, हणमंत सुरवसे, प्रसाद केदार, अथर्व थोरवे आणि सार्थक पानसरे यांचा सहभाग होता.

# कर्जतमध्ये वनराइचे बंधारे पूर्ण

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायतीत वनराई बंधारे बांधून पाणी अडवण्याचे कार्य सुरु आहे. कर्जत पंचायत समितीच्या माध्यमातून तालुक्यातील ५५ ग्रामपंचायती मध्ये ७२ ठिकाणी आतापर्यंत वनराई बंधारे बांधले गेले आहेत. दरम्यान, गटविकास अधिकारी यांच्याकडून प्रत्येक वनराई बंधाऱ्यांची पाहणी केली जात असून आणखी वनराई बंधारे बांधण्यात यावेत अशी सूचना ग्रामपंचायतींना करीत आहेत.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत कर्जत तालुक्यातील प्रत्यके ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधण्याची योजना आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सूचनेने रायगड जिल्ह्यात असा आगळावेगळा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यात कर्जत तालुक्यात ५५ ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधले गेले आहेत. कोरड्या नद्या आणि नाले यांच्यातून वाहणारे पाणी अडवण्याचा प्रयत्न करून जमिनीतील भूजल पातळी वाढण्याचे कार्य ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरु आहे. या वनराई बंधारे क्षेत्रात वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची प्रत्येक्ष पाहणी व वनराई बंधारा बांधण्यासाठी पंचायत समिती स्तरावरून गट विकास अधिकारी सुशांत पाटील, सह्ायक गट विकास अधिकारी बापूसाहेब नंदाळे, कृषी अधिकारी संजय चव्हाण विस्तार अधिकारी उज्वला भालेराव विस्तार अधिकारी विजय राजपूत तसेच सर्व ग्रामपंचायतचे यांचा सहभाग होता. तर प्रत्येक ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व ग्रामस्थ महिला बचत गटातील महिला, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी उस्फुर्त प्रतिसाद नोंदविला.

# प्रवासा दरम्यान दागिन्यांची चोरी

**पनवेल :** एसटीने प्रवास करत असताना ५५ वर्षीय इसमाकडील सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. निवास दत्तात्रय कदम हे आझादपूर, कोरेगाव, सातारा येथे राहत असून आझादपूर, कोरेगाव, सातारा ते श्री गणेश सोसायटी नावडे फेस २ या दरम्यान एसटीने आणि रिक्षाने प्रवास करत असताना प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्याकडील सोन्याची गंठण, टॉप्स, सोन्याची फुले, चैन आणि रोख रक्कम असा एकूण सात लाख ६६ हजारांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# रसायनी परिसरातील विजेचा खेळ खंडोबा

**| रसायनी | प्रतिनिधी |**

एप्रिल महिना सुरू झाल्यापासून रसायनी विभागात रात्री बे रात्री विजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. मोहोपाडा व आसपासच्या परिसरातील विजपुरवठा वारंवार खंडीत झाल्याने दुकानदारांसह विज ग्राहकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे वीज ग्राहक संतप्त झाले आहेत. अचानक वीज पुरवठा खंडित होत असल्याने त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.



उन्हाळ्याचे दिवस असल्याने विजेची मागणी वाढली आहे त्यातच उष्णता देखील प्रचंड जाणवू लागली आहे. मात्र दिवसातून अनेकवेळा वीज पुरवठा खंडित होत आहे. तसेच रात्रीच्या वेळेस देखील वीज गायब होत आहे. दररोज वीजपुरवठा खंडित होत असल्याने वीज ग्राहक संतप्त झाले आहेत. रात्रीच्या वेळेस तरी अखंड विद्युत पुरवठा महावितरणाने द्यावा, अशी मागणी विज ग्राहकांसह, व्यापाऱ्यांकडून होत आहे.

यातच शुक्रवार सायंकाळी विजपुरवठा खंडीत झाला.त्यानंतर तासाभरातच मासळी बाजारासमोरील ट्रान्सफार्मा डिपी जळाली. डिपी जळताच राकेश खराडे यांनी रात्री १२:३० पर्यंत उपस्थित राहून महावितरणाशी संपर्क साधला. शनिवार दि २३ रोजी खराडे यांनी मोहोपाडा महावितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधून महावितरण कर्मचाऱ्यांनसोबत दुपारपर्यंत उपस्थित राहीले. दरम्यान शनिवारी खराडे यांनी मोहोपाडा परिसरातील विजपुरवठा कायमचा मार्गी लावावा, कमी व्होल्टेज समस्या आदीसाठी निवेदन दिले.

# कामोठेकरांचा पाण्यासाठी आक्रोश

## • दहा वर्षांच्या आंदोलनांनंतरही प्रश्न जैसे थे!

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

कामोठे शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर गेल्या दहा वर्षांत विविध सामाजिक संघटना, नागरिक मंच तसेच राजकीय पक्षांनी अनेक आंदोलने, मोर्चे आणि बैठका घेतल्या. मात्र अद्यापही शहरवासीयांच्या पदरी निराशाच पडली असून पाणी प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत चालल्याची खंत कामोठे कॉलनी फोरमचे अध्यक्ष मंगेश अढाव यांनी व्यक्त केली आहे.

कामोठे शहरातील नागरिकांसाठी पाणी प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा आणि ज्वलंत विषय बनला असून प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिका स्थापन होऊन आठ वर्षे उलटली तरीही पाणी प्रश्नावर कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे अढाव यांनी म्हटले आहे.

पाणी प्रश्नावर चर्चा झाली की, अमृत योजना आणि न्हावा-शेवा स्टेज-२ योजनेचा दाखला देत भविष्यात पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी आश्वसने दिली जातात. मात्र, ही योजना गेल्या सहा वर्षांपासून रखडलेली असून तिच्या अपयशाची जबाबदारी स्वीकारण्यास कोणीही पुढे येत नसल्याची टीका करण्यात आली आहे. जोपर्यंत न्हावा-शेवा योजना पूर्णत्वास येत नाही, तोपर्यंत वाढत्या लोकसंख्येचा विचार करून नवी मुंबई महानगरपालिकेकडून अतिरिक्त जलसाठा मंजूर करून घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. मात्र, यासाठी लोकप्रतिनिधींकडून अपेक्षित पाठपुरावा होत नसल्याचाही आरोप करण्यात आला.

पनवेल व नवी मुंबईतील आमदार, पनवेल आणि नवी मुंबई महानगरपालिकांचे आयुक्त तसेच सिडको चे व्यवस्थापकीय संचालक यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री अध्यक्षतेखाली संयुक्त बैठक आयोजित करून कामोठे शहरासाठी तात्पुरत्या स्वरूपात अतिरिक्त जलसाठा मंजूर करण्यासाठी तातडीने प्रयत्न व्हावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# साई मंदिर परिसरात अनधिकृत टपऱ्या

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर अतिक्रमणे तोडण्यात यावीत यासाठी कोल्हारे ग्रामपंचायत सदस्यांनी उपोषण केले.उपोषण सुरु असताना उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्या रस्त्याच्या बाजूचे अतिक्रमण तोडून टाकण्यास सुरुवात केली आणि पुढील १५ दिवसात नेरळ कळंब राजमार्ग रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे तोडण्यात येतील असे लेखी आश्वासन देण्यात आले आहे. मात्र, त्यानंतर देखील साई मंदिर परिसरात गणेश स्वीट समोर अतिक्रमण करून दुकाने थाटली जात आहेत.

नेरळ भागात रस्त्यांच्या आजूबाजूला अतिक्रमण हि मोठी समस्यां बनली आहे. कल्याण कर्जत राज्यमार्ग असो किंवा नेरळ कळंब राज्य मार्ग आणि नेरळ कशेळे भीमाशंकर राज्यमार्ग या सर्व रस्त्यांवर अतिक्रमण हि समस्यां बनली आहे. नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर अतिक्रमणे दूर करण्यात यावीत तसेच अन्य मागण्यांसाठी उपोषण केले होते. तरीदेखील नेरळ कळंब रस्त्यावर साई मंदिर परिसरात अतिकारण करून दुकाने थाटली गेली आहेत.त्यास्तही रस्त्याच्या बाजूला मातीचा भरावा टाकला जातो आणि दुकाने थाटली जातात, त्याचे काही सोयरसुतक नेरळ विकास प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम खात्याला नाही. अतिक्रमण दररोज होत असतील तर मात्र, उपोषणे करून देखील काही फायदा नाही असे म्हणण्याची वेळ आली आहे.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे. ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे. ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना + इन्सेटिव्ह. Contact- 9823585321
- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात.संपर्क: ९९२३७५०५४९ वेळ: सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
- दिशा पॅथॉलॉजी लॅब अलिबाग व चोंढी येथे कामासाठी मुले/मुली पाहिजे (अनुभवी/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९
- jai santoshi maa CNG Alibag wadgav 1) Filler-man 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही मौजे बोरघर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीच्या (सदर मिळकत), विद्यमान मालकांच्या मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, सदर मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत.

तरी ज्या इसमांचा सदर मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व विद्यमान मालकांचे सदर मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे गृहित धरुन आमचे अशिल नियोजीत खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**

मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील, गट नं. २०५/२, एकूण क्षेत्र ६ हे. ३४ आर, आकार ११ रूपये ४८ पैसे, पैकी रायोमंड केकी पटेल यांच्या मालकीचे क्षेत्र ४ हे. ४१.५५ आर, आकार ८ रूपये ०० पैसे ही मिळकत.

अलिबाग
तारीख : २४/५/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड ४०२ २०१



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या बिनशेतजमिन मिळकतीचे मालक श्री. धरमेश गोपाळभाई वडगामा, श्री. भरत प्रेमजी पटेल, श्री. भावेश भरत वडगामा, श्री.मधुर गिरधरलाल राजानी यांनी त्यांचे स्वकष्टार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील बिनशेती मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे-बोपेले, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड ४१०१०१ येथील बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

| नविन भूमापन क्रमांक व उपविभाग | जुना भूमापनक्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|---|
| ५६/४० | ३० हिस्सा नंबर २ब+४अ+३१/०+३२/१ पैकी प्लॉट नंबर ४० | ६.६२.०० आर.चौ.मी/ (६६२ चौ.मी) | ६६.२० |

तरी बिनशेती मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासहीत देण्यात यावे. वर दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख २४/०५/२०२६

सही /-
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०,पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ,आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
४१०१०१, मो.नं८३६९२१७३१३



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या बिनशेतजमिन मिळकतीचे मालक श्री.वैभव जयंतीलाल रत्नानी, श्री. नितेश रमणीकलाल गोहील, श्री.मुकेश बाबूभाई गोहील, श्री.दयालजी टपूभाई गोहील यांनी त्यांचे स्वकष्टार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील बिनशेती मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे-बोपेले, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०१०१ येथील बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

| नविन भूमापन क्रमांक व उपविभाग | जुना भूमापनक्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|---|
| ५६/३९ | ३० हिस्सा नंबर २ब+४अ+३१/०+३२/१ पैकी प्लॉट नंबर ३९ | ०.०३.०१ (आर.चौ.मी)/ (३०१ चौ.मी) | ३०.१० |

तरी बिनशेती मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासहीत देण्यात यावे. वर दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख २४/०५/२०२६

सही /
**ॲड. जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड ४१०१०१
मो. नं. ८३६९२१७३१३



### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे हमरापुर, ता. पेण जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. कल्पेश हरिश्चंद्र पाटील यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक मारूती शंकर सकपाळ व इतर यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| हमरापुर | ६९/५ | ०.२८.३० पो.ख.०.०४.३० एकूण क्षेत्र ०.३२.६० | ६.८७ |

वरील संपुर्ण क्षेत्रा पैकी ०.२४.०० हे.आर.इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही
ठिकाण: पेण
दि. २४/०५/२०२६
**ॲड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९



### जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. आणि उपविभाग २५५, क्षेत्र ०.४२.२० (हे.आर.), पो. ख. ०.००.०० (हे.आर.), एकूण क्षेत्र ०.४२.२० (हे.आर.), आकार ३.५० (रु.पैसे) ही मिळकत विद्यमान मालक श्रीमती.प्रगती प्रभाकर राऊत, श्री.वैभव प्रभाकर राऊत, रा.मुंबई यांजकडुन जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदती रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- २४/०५/२०२६.

**(ॲड.परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी.स्टँड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
९८५०४८१२३४



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात अपेक्षित प्राप्ती होईल. विद्यार्थ्यांच्या कलांना वाव मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **वृषभ** : अनपेक्षित घटना दिलासा देतील. घरगुती व्यवसायात प्रगती होईल. नव्या ओळखींचा लाभ घ्या.
- **मिथुन** : व्यवसायात बदल हितकर ठरेल. गुंतवणुकीला चालना मिळेल. विवाहाच्या प्रयत्नात यश मिळेल.
- **कर्क** : नोकरीत बढतीचे योग आहेत. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. नव्या विचारांना चालना मिळेल.
- **सिंह** : कारकिर्दीत चिंता वाढीस लागल. घरगुती प्रश्नात वेळीच तोडगा काढावा. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **कन्या** : व्यवसायात नव्या जबाबदाऱ्या येतील. भावंडांचं सहकार्य लाभेल. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- **तूळ** : मुलांची चिंता राहील. व्यवसायात अडचणी संभवतात. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यायला हवी.
- **वृश्चिक** : कामाचा उत्साह राहील. रखडलेली कामं मार्गी लागतील. गृहसजावटीच्या क्षेत्रात प्रगती होईल.
- **धनु** : अपेक्षित वार्ता कानी येईल. खर्च वाढला तरी प्राप्तीही तशीच राहील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **मकर** : आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं. मुलांच्या प्रश्नांचा ताण राहील. वाद-विवाद टाळायला हवेत.
- **कुंभ** : प्रयत्नातील सातत्य कायम ठेवा. प्रगतीचा मार्ग सुलभ होईल. अचानक धनलाभाचे योग आहेत.
- **मीन** : वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल. प्रवास लाभदायक ठरेल.

ब्युटी टॉक

## कमाल जिऱ्याच्या स्क्रबची

जिऱ्यातल्या बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मामुळे चेहऱ्यावरचे पिंपल्स घालवण्यासाठी जिऱ्याचा पॅक लावता येईल. चेहऱ्यावरची चमक टिकवून ठेवण्यासाठी जिऱ्याचं स्क्रब लावता येईल. सर्वसाधारणपणे अक्रोडापासून फेस स्क्रब बनवलं जातं. जिऱ्याचं स्क्रब बनवायची प्रक्रिया आपण समजून घेऊ या. यासाठी दोन मोठे चमचे जिरं, अर्धा कप साखर, एक मोठा चमचा मीठ, अर्धा कप बदामाचं तेल, टी ट्री ऑईलचे २० थेंब असं साहित्य घ्या. छोट्या बाउलमध्ये बदाम तेल, मध आणि टी ट्री ऑईल घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. आता यात जिरं आणि साखर घाला. सर्व मिश्रण एकजीव करून घ्या. हे मिश्रणातून तारा सुटू लागल्या की ते नीट मिसळलं आहे असं समजावं. हे मिश्रण एका बाटलीत भरून ती थंड जागी ठेवा. आता हे स्क्रब तुम्ही वापरू शकता. डोळ्यांलगतचा भाग सोडून चेहऱ्यावर स्क्रब लावता येईल. हातापायांच्या स्क्रबिंगसाठीही याचा वापर करता येईल. जिऱ्याने स्क्रब केल्यानंतर चेहऱ्याला छान चमक येईल. हे स्क्रब तुम्ही सहा महिन्यापर्यंत वापरू शकता. यात पाणी जाणार नाही याची काळजी घ्या. हे स्क्रब थेट चेहऱ्यावर लावण्याआधी कोपरावर लाऊन छोटी चाचणी करून घ्या.

## २४ मे

दिनविशेष

**२०१३** : आयपीएल स्पॉट फिक्सिंगप्रकरणी गुरुनाथ मय्यप्पन अटकेत.
**२०१५** : आयर्लंडमध्ये समलैंगिक विवाहाला संमती.
**२०१७** : राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर करण्यावर मद्रास उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली.
**२०१८** : रिझर्व्ह बँकेने ‘प्रॉम्प्ट करेक्टिव्ह ॲक्शन’ घेतलेल्या ११ सार्वजनिक बँकांना पुनरुज्जीवन आराखडा सादर करण्याच्या सूचना.

कौशल्य

## बिनधास्त बोला

मुलांनो, खूप लोकांसमोर किंवा सार्वजनिक ठिकाणी बोलायची आपल्याला खूप भीती वाटते. थोड्या प्रयत्नांनी तुम्ही ही भीती दूर करू शकता.

* स्टेजवर उभं राहून बोलण्याआधी तुमचा नेमका विषय समजून घ्या. फक्त पाठांतर करू नका. यामुळे तुम्ही खूप कमी चुका कराल.
* बोलायला उभं रहाण्याआधी दीर्घ श्वसनाचे व्यायाम करा.
* शक्य असेल तर स्पर्धेच्या आयोजनाच्या ठिकाणाला भेट द्या. तिथल्या सोयींबाबत जाणून घ्या. जमलं तर स्टेजवर उभं राहून बोलण्याचा सराव करा.
* बोलताना मध्येच काही आठवलं नाही तर घाबरून जाऊ नका. क्षणभर डोळे बंद करून दीर्घ श्वास घ्या. मिनिटभर थांबल्याने कोणीही तुम्हाला हसणार नाही.
* वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्याआधी भरपूर सराव करा. तुमच्या भाषणाचा व्हिडिओ बनवा. तो बघा. यामुळे तुम्ही चुका सुधारू शकाल.
* भाषण संपल्यानंतर स्वत:लाच शाबासकी द्या. प्रत्येकाच्या चुका होतात आणि या चुकांमधून आपल्याला शिकायचं असतं हे लक्षात ठेवा.

आरोग्यमंत्र

## आकडीकडे दुर्लक्ष नको

काहींना फेफरं किंवा आकडी येण्याचा त्रास असतो. वरकरणी याकडे दुर्लक्ष केलं जात असलं तरी ही एक गंभीर समस्या असल्याचे लक्षात घ्यायला हवे. ही एक अपघाताची शक्यता वाढवणारी व्याधी आहे. यामध्ये मेंदूतील यंत्रणेमध्ये असामान्य पद्धतीने इलेक्ट्रिकल डिस्चार्ज होत असल्यामुळे काही हिस्सा प्रभावित होतो. असं असताना या आजाराने पीडित असणाऱ्या महिलांनी गर्भधारणेचा निर्णय घ्यावा का, अशी शंका उपस्थित होऊ शकते. कारण फेफरं आल्यास गर्भातील बाळावरही दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच या महिलांनी न्यूरॉलॉजिस्टचा



सल्ला घेऊनच मातृत्त्व स्वीकारण्याचा निर्णय घ्यावा असं तज्ज्ञ सांगतात. गर्भधारणेच्या काळात महिलांच्या शरीरात संप्रेरकांमध्ये बदल घडत असतो. त्याचप्रमाणे या काळात त्यांना वेगवेगळी औषधं दिली जातात. लसीकरण केलं जातं. औषधोपचारातील बदल, शारीरिक आणि मानसिक तणाव यासारख्या कारणांमुळे गर्भारवस्थेत या महिलांना फिटस् येण्याची शक्यता अनेक पटीने वाढते. म्हणूनच हा धोका नियंत्रित ठेवण्यासाठी आणि बाळंतपण सुलभ होण्यासाठी तज्ज्ञ काही विशेष औषधांची मदत घेतात. ही दक्षता बाळगली नाही तर वेळेआधी प्रसुतीचा धोका वाढतो. डॉक्टर व्याधीग्रस्त महिलेची तपासणी करतात आणि व्याधी कोणत्या पातळीवर आहे याची नोंद ठेवतात. व्याधीने गंभीर पातळी गाठली असेल तर या अवस्थेतील गर्भधारणा धोकादायक ठरु शकते. म्हणूनच याचा विचार करावा. दिलेली औषधं वेळेत घ्यावीत.

## पंचांग

**रविवार, २४ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अधिक ज्येष्ठ शु. ९, चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : पू. फाल्गुनी, योग : हर्षण, सूर्योदय ६.०४, सूर्यास्त ७.०७

## फॉरवर्ड्स

**दरियां हो या हो पहाड़ टकराना चाहीये...**

**ज़ब तक़ साँस न टूटे जिये जाना चाहीये...!**

## करीअर

बारावीनंतर अनेकांना वैद्यकीय शाखेकडे वळायचं असतं. पण नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लाखोंमध्ये असताना जागा मात्र काही हजार असतात. अशा परिस्थितीत परदेशातून वैद्यकीय शिक्षण घेण्याचा एक पर्याय तुमच्याकडे आहे.

* परदेशातलं शिक्षण तुमच्या करीअरला वेगळं वळण देऊ शकतं. तिथले अनुभव तुम्हाला समृद्ध करत असतात. विकसित देशांमधून वैद्यकीय अभ्यासक्रम शिकून आलेल्या विद्यार्थ्यांना विविध विकारांचं चांगलं ज्ञान मिळू शकतं. अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी अवगत होता येतं. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## मोठी संधी आहे इथे

सध्या सप्लाय चेन इंडस्ट्रीने उलाढालीचा मोठा टप्पा गाठला आहे. सप्लाय चेन अँड मार्केट रिसर्च हा उद्योग भारताबरोबरच जगभरात वाढत आहे. साहजिकच या संबंधातील अभ्यासक्रम देशातील प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध आहेत. अशा अभ्यासक्रमांची संख्या मोठी असली तरी एमबीए विथ सप्लाय चेन मॅनेजमेंट असा अभ्यासक्रम करणाऱ्यांना चांगली मागणी आहे. मालाची निर्यात ही अत्यंत गुंतागुंतीची बाब असते.



परदेशात माल पाठवताना तिथल्या ग्राहकांपासून भारतातील त्या वस्तूंच्या उत्पादकांपर्यंत अनेक घटकांचा संबंध या प्रक्रियेदरम्यान येत असतो. त्यामध्ये उत्पादक, विक्रते, दलाल, वाहतूकदार, जहाजात माल चढवणारे कंत्राटदार, जहाज कंपनी, माल उतरवणाऱ्या कंपन्या, तिथून त्यांची वाहतूक करणाऱ्या कंपन्या आणि तिथला विक्रेता या सर्वांचा मेळ घालण्याचं काम सप्लाय चेन मॅनेजर करतात. एमबीएसाठी हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले गुण आणि कामाचा अनुभव असेल तर उत्तम वेतनाची नोकरी मिळू शकते. अनुभवी व्यक्तींना दरमहा लाखापर्यंतही वेतन मिळू शकतं. या पदवीधरांना निर्यात कंपन्या आणि जहाज कंपन्यांमध्येही नोकऱ्या मिळू शकतात.

खेचाखेची

## लांब केस

**गण्या :-** आई, गांधीजींच्या डोक्यावर केस का नव्हते ?

**आई :-** कारण ते फक्त खरं बोलत होते.

.
.
.

**गण्या :-** आता समजलं, की बायकांचे केस लांब का असतात!

## वेगळं काही

हिमाचल प्रदेशातल्या मंडीमध्ये डॉक्टरांनी ३५ वर्षीय इसमाच्या पोटातून ९ चमचे, २ टूथब्रश, २ स्क्रू ड्रायव्हर आणि एक चाकू शस्त्रक्रिया करून बाहेर काढले आहेत. या माणसाने एवढ्या वस्तू गिळल्या होत्या. या इसमाला रुग्णालयात आणलं तेव्हा त्याच्या पोटातून अर्धा चाकू बाहेर आला होता. त्याची अवस्था बरीच गंभीर होती. मात्र डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आणि त्याचे प्राण वाचवले. हा इसम मानसिक रुग्ण असल्याचं डॉक्टराचं म्हणणं आहे. मानसिक रुग्ण अशा वस्तू अगदी सहज गिळू शकतात. आपण काय खात आहोत याची त्यांना अजिबात जाणीव नसते. सर्वसामान्य माणूस अशा वस्तू गिळू शकत नाही.

ब्युटी टॉक

## घालवा स्ट्रेच मार्क्स

शरीरावर येणारे स्ट्रेच मार्क्स ही महिलांची मोठी समस्या असते. अशा स्ट्रेच मार्क्समुळे ट्रेंडी प्रावरणं परिधान करताना अडचण येऊ शकते. विशिष्ट पॅटर्नच्या प्रावरणांना तर हातही लावता येत नाही. मग महागडी क्रीम्स वापरुन हे मार्क्स घालवण्याचा प्रयत्न केला जातो. पण हे टाळायचं असेल तर काही घरगुती उपायही उपयुक्त ठरु शकतात. याविषयी...



* कोको बटर आणि कॉफी- एक चमचा कॉफीमध्ये एक चमचा कोको बटर मिसळून मार्क्सवर लावावं. दहा मिनिटांनी कोमट पाण्याने धुवून टाकावं. आठवड्यातून चार वेळा हा प्रयोग केल्यास फरक जाणवतो.
* बदाम पावडर, खोबरेल तेल आणि कॉफी- चमचाभर कॉफीत अर्धा चमचा बदाम पावडर आणि तीन चमचे खोबरेल तेल मिसळावं. ही पेस्ट दहा मिनिटं मार्क्सवर लावून ठेवावी. आठवड्यातून दोन वेळा असं केल्यास फरक जाणवू लागेल.
* एक चमचा कॉफी पावडर, एक चमचा ऑलिव्ह ऑईल, अर्धा चमचा लिंबाचा रस एकत्र करुन पेस्ट मार्क्सवर वीस मिनिटं लावून ठेवावी.

## सुडोकू १०८ [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ४ | २ | | | | ७ | |
| | | | | ६ | | २ | | |
| | | | ९ | | ७ | | ८ | |
| | | ६ | १ | ७ | | | | ८ |
| २ | ८ | | | | | | १ | ७ |
| १ | | | | ८ | २ | ४ | | |
| | २ | | ७ | | ३ | | | |
| | | ५ | | २ | | | | |
| | ६ | | | | ९ | ८ | ३ | २ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १०७चे उत्तर [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ८ | ९ | १ | ६ | ४ | ३ | ७ | २ |
| ३ | ७ | १ | ८ | ५ | २ | ९ | ४ | ६ |
| २ | ६ | ४ | ३ | ९ | ७ | ८ | १ | ५ |
| १ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | ५ | २ | ४ |
| ९ | २ | ५ | ६ | ४ | ३ | १ | ८ | ७ |
| ८ | ४ | ७ | ५ | २ | १ | ६ | ९ | ३ |
| ६ | ९ | ३ | ४ | ७ | ८ | २ | ५ | १ |
| ४ | १ | २ | ९ | ३ | ५ | ७ | ६ | ८ |
| ७ | ५ | ८ | २ | १ | ६ | ४ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १०८



**आडवे शब्द :-**
१) सांजवेळ
३) आळंदीस ज्ञानेश्वरांनी लावलेल्या फांदीपासून वाढलेला वृक्ष
८) दूध न देणारी गाय
१०) जमलेले लोक
११) जाणकार
१४) पळविणे, हडप करणे
१४) वस्तुंचा आकडा,पर्वत
१६) कणीदार
१७) एक कडवे द्विदल
१८) अडखळत बोलणारा
१९) मुरली
२०) पांढरा गोड पदार्थ
२२) पळून जाणे
२५) वेतन
२७) सुस्ती
२९) रडगाणे
३०) काडीमोड
३३) शरीर
३४) संपणे
३६) मुलींचा फ्रॉक
३८) सवाद्य आनंदाने
४१) खुंट,आंचोळ
४२) समुद्रतट
४५) सततची हालचाल
४७) चुलता
४९) चिखल
५०) मेद वाढविणारे पदार्थ
५२) लक्ष्मीचे एक नाव
५४) एक सुगंधी वनस्पती
५७) एक औषधी हळद
६०) प्रजा
६१) एक गोड व अनेक बियांचे फळ
६२) परमेश्वर
६३) चेहेऱ्यावरील तेज
६५) राक्षस
६६) पार्वतीचे एक नाव
६७) *** जावक
६८) नोकर
६९) प्रामाणिक
७१) पक्षांना जाळ्यात पकडून शिकार करणारे
७३) मोठी बहीण
७४) वस्ती करणे,राहणे
७६) खटला दाखल करणारा व ज्याच्यावर खटला दाखल केला आहे असा
८३) कुंतल
८४) ऐट,डामडौल
८५) लायसन्स (म)
८६) कथा,गोष्ट

**उभे शब्द :-**
१) शंका
२) कालहरण
३) कोणीतरी एक.काहीतरी
४) जास्त
५) डोळे
६) माफ
७) धर्माज्ञा
८) वजन
९) इंग्रजीत दुप्पट
१२) कैरीचा रंग
१३) शिल्लक राहिलेला कचरा
१७) प्रहार,घाव
१९) चबुतरा,कट्टा
२१) अफुचे बी
२२) पंख
२३) प्रेमाचे भांडण
२४) व्यापारी फायदा
२६) गाड्या उभ्या करण्याची जागा
२७) *** निर्यात
२८) शर्यत (इं.)
३१) मांडणी
३२) पोळ्या भाजण्याचे पसरट पात्र
३३) अंजन
३५) आवडता,प्रिय
३७) थंड
३९) निकट
४०) गावात तयार केलेले,ओबडधोबड
४२) सदविवेक बुद्धी,सर्व बाजूने केलेला विचार
४४) वस्त्राचा काठ,पट्टी
४६) शिव ! शिव!
४८) फणसाची एक जात
५१) रामचरित लिहिणारे हिंदी संत
५३) हार,सर
५४) मत देणाऱ्यांची सूची
५५) भोजनशाळा,माजघर
५६) स्वच्छता
५८) पुष्कळ
५९) सुगंध पसरणे
६४) हिमालयातील एक केसाळ प्राणी
६६) आराधना,पूजा
७०) अर्धांगवायू
७२) मासे पकडणारा कोळी ( सं.)
७५) हुक्की,लहर,कळ
७६) गंध,मुक्काम
७७) रिवाज,चाल,रुढी
७८) संरक्षक भिंत
७९) दिवा
८०) च्या शिवाय
८१) आजच्या आधीचा दिवस
८२) तुटलेले वा बारीक आकाराचे तांदूळ

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



**पश्चिम बंगालमध्ये झालेला सत्तापालट म्हणजे बंगालच्या अस्मितेची, संस्कृतीची आणि विकासाची पुनर्रचना करण्याची सुवर्णसंधी आहे. शुभेंदू अधिकारी यांच्याकडे संघटनात्मक कौशल्य आणि प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. केंद्र सरकारच्या 'डबल इंजिन' ताकदीचा वापर करून बंगालला हिंसाचारमुक्त आणि उद्योगस्नेही बनवण्यावरच त्यांच्या सरकारचे यश अवलंबून असेल.**

# नवी पहाट, पण आव्हानांचा डोंगर

महेश जोशी



पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात ९ मे २०२६ हा दिवस एका मोठ्या परिवर्तनाचा साक्षीदार ठरला. तृणमूल काँग्रेसची तब्बल दीड दशकाची सत्ता उलथवून लावत भारतीय जनता पक्षाचे शुभेंदू अधिकारी यांनी राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ब्रिगेड परेड ग्राउंडवरील भव्य सोहळ्यात झालेल्या या सत्तांतरामुळे बंगालमध्ये 'सोनार बांगला' आणि 'डबल इंजिन सरकार'च्या एका नव्या युगाची सुरुवात झाली. मात्र, विजयाचा हा गुलाल शांत होताच मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्यासमोर डाव्यांच्या आणि तृणमूलच्या काळात रखडलेल्या पश्चिम बंगालला पुन्हा प्रगतीच्या रुळावर आणण्याचे प्रचंड मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

सत्ता हाती घेताच मुख्यमंत्री अधिकारी यांनी आपल्या प्रशासकीय कार्यक्षमतेची आणि राजकीय इच्छाशक्तीची झलक दाखवून दिली. पहिल्याच कॅबिनेट बैठकीत त्यांनी घेतलेले निर्णय नवीन सरकार केवळ घोषणाबाजीवर नव्हे, तर थेट कृतीवर विश्वास ठेवणारे आहे, हे दर्शवतात. सीमा सुरक्षेला प्राधान्य देत, पहिल्याच कॅबिनेटने बांगलादेश सीमेवर कुंपण घालण्यासाठी पुढील ४५ दिवसांमध्ये सीमा सुरक्षा दलाला (बीएसएफ) जमीन हस्तांतरित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. मागील सरकारने राजकीय वैमनस्यातून रोखून धरलेली 'आयुष्मान भारत' ही आरोग्य योजना आणि 'प्रधानमंत्री फसल विमा योजना' राज्यात तातडीने लागू करण्याची घोषणा करण्यात आली. भारतीय न्याय संहितेची (बीएनएस) राज्यात तात्काळ अंमलबजावणी आणि जून २०२५ च्या प्रलंबित राष्ट्रीय जनगणनेच्या परिपत्रकाला मान्यता देण्यात आली. तसेच, सरकारी नोकरीच्या उमेदवारांसाठी वयोमर्यादेत पाच वर्षांची शिथिलता देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला गेला. प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी कोलकात्यामध्ये थेट जनतेच्या तक्रारी ऐकून घेणारा 'जनता दरबार' सुरू करण्यात आला आहे.

बंगालची विस्कटलेली घडी बसवणे शुभेंदू अधिकारी यांच्यासाठी सोपे नाही. त्यांच्यासमोर मुख्यतः चार आघाड्यांवर मोठी आव्हाने आहेत. त्यावर भाजप सरकारने आपली भूमिका स्पष्ट करत कारवाई सुरू केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बंगालमध्ये राजकीय हिंसाचार, निवडणुकोत्तर दंगली आणि खंडणी बहाद्दरांचे (तोलाबाजी) साम्राज्य असल्याचा आरोप सातत्याने होत आला आहे. ममता बॅनर्जी यांच्या सत्ताकाळात सामान्य जनतेमध्ये भीतीचे वातावरण होते. यावर उपाय म्हणून राज्यात कायदा सर्वांसाठी समान असेल आणि राजकीय सूडबुद्धीऐवजी कायद्याचे राज्य चालवले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. पोलिस प्रशासनाचे सशक्तीकरण करण्यासाठी आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांना केंद्रीय स्तरावर विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांवरील राजकीय दबाव दूर होऊन गुन्हेगारांवर कडक कारवाई करता येईल.

पश्चिम बंगाल आणि संपूर्ण देशाच्याच दृष्टीने महत्त्वाचा असलेला प्रश्न म्हणजे बांगलादेशी घुसखोरांचे वाढते प्रमाण आणि त्यामळे निर्माण होणारी कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या. पश्चिम बंगालमध्ये रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांचा बेकायदेशीर शिरकाव हा राज्याच्या लोकसंख्याशास्त्रीय बदलाचा आणि अंतर्गत सुरक्षेचा सर्वात संवेदनशील मुद्दा आहे. मागील सरकारने मतपेढीच्या राजकारणासाठी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप भाजपने केला होता. घुसखोरीच्या मुद्द्यावर अधिकारी सरकारने अत्यंत आक्रमक पावले उचलली आहेत. सीमेवरील कुंपणाचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यासाठी बीएसएफला जमीन दिली जात आहे. तसेच प्रलंबित जनगणनेच्या माध्यमातून बेकायदेशीर नागरिकांची ओळख पटवण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. आम्ही भारतीय मुसलमानांच्या विरोधात नाही, तर बेकायदेशीर घुसखोरांच्या विरोधात आहोत, ही भूमिका सरकारने स्पष्ट केली आहे.

टाटांच्या नॅनो प्रकल्पाच्या वेळी सिंगूर आणि नंदीग्राममध्ये झालेल्या आंदोलनांनंतर पश्चिम बंगालमधून मोठ्या उद्योगांनी काढता पाय घेतला होता. खंडणीखोरी आणि कामगार संघटनांच्या अतिरेकी दादागिरीमुळे नवीन उद्योग बंगालमध्ये येण्यास धजावत नव्हते. नवीन भाजप सरकारने उद्योगांना संपूर्ण सुरक्षेचे आश्वासन दिले आहे. 'सिंगल विंडो क्लिअरन्स'ची घोषणा आणि खंडणीखोरी पूर्णपणे नष्ट करून 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' वाढवण्यावर सरकारचा भर आहे. केंद्र सरकारच्या मदतीने पश्चिम बंगालला पुन्हा एकदा पूर्वेकडील देशांचे औद्योगिक केंद्र बनवण्याची रणनीती आखली जात आहे. पश्चिम बंगालमधील लाखो सुशिक्षित तरुण रोजगारासाठी मुंबई, दिल्ली आणि दक्षिण भारतात स्थलांतरित होत असतात. रखडलेल्या शिक्षक भरती आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे तरुणांमध्ये तीव्र असंतोष होता. नोकरभरतीमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी पारदर्शक परीक्षा पद्धती आणली जात आहे. अमित शहा यांनी निवडणूक प्रचारात दिलेल्या आश्वासनानुसार शालेय नोकरीच्या अर्जदारांसाठी वयोमर्यादेत पाच वर्षांची वाढ कॅबिनेटने मंजूर केली आहे. आयटी, मॅन्युफॅक्चरिंग आणि एमएसएमई क्षेत्राला चालना देऊन स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

तत्पूर्वी सलग तीन निवडणुकांमध्ये विक्रमी बहुमत मिळवणाऱ्या तृणमूल काँग्रेसचा पराभव करणे हे भाजपापुढील मोठे आव्हान होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची कुशल रणनिती यापुढे तृणमूल काँग्रेसचा निभाव लागला नाही. राज्यात भाजपाचे सरकार आले म्हणून ऑटो रिक्षावाल्यापासून व्यापारी, विद्यार्थी, युवक, महिला या सर्वांना आनंद झाला. तृणमूल काँग्रेसच्या दहशतवादापासून सुटका होणार म्हणून नव्या सरकारकडून अपेक्षा उंचावल्या आहेत. शुभेंदू अधिकारी यांच्या ब्रिगेड परेड ग्राउंडवरील शपथविधी समारंभाला पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री शहा स्वतः उपस्थित होते. भाजपाची सत्ता असलेल्या राज्यांचे मुख्यमंत्री तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे एनडीएचे वीस मुख्यमंत्री तसेच देशपातळीवरील अनेक नेते या ऐतिहासिक शपथविधी सोहळ्यास उपस्थित होते. पश्चिम बंगालमधील नव्या सरकारच्या पाठिशी केंद्र सरकार, भाजपा, एनडीए सर्व ताकदीनिशी उभे आहेत, हाच संदेश या सर्वांच्या उपस्थितीतून दिला गेला.

महिलांची सुरक्षितता, वाढलेली प्रचंड बेरोजगारी, तरूणांमधील असंतोष, भांडवल गुंतवणूक होत नसल्याने जाणवणारी नव्या उद्योग व्यवसायांची कमतरता, अल्पसंख्याकांचे लांगुलचालन आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बांगलादेशमधून रोज येणाऱ्या घुसखोरांना राज्यात दिले जाणारे संरक्षण या समस्यांशी भाजप सरकारला डोळ्यात तेल घालून लढावे लागणार आहे. आसाममध्ये घुसखोरी रोखण्यात तेथील भाजपा सरकारने यश मिळवले तसेच बंगालमध्ये कठोर उपाय योजून घुसखोरांचा प्रवेशच रोखला पाहिजे. शुभेंदू अधिकारी विद्यार्थी दशेपासून काँग्रेसमध्ये होते. त्यांचे शिक्षण एमए पर्यंत झाले आहे. त्यांचे वडील काँग्रेसचे खासदार आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमधे मंत्री होते. ममता बॅनर्जींना तृणमूल काँग्रेसच्या सुरूवातीपासून ते साथ देत होते. तृणमूल काँग्रेसच्या आंदोलनात ते आघाडीवर असायचे. बंगालमधील सलग ३४ वर्षे सत्तेवर राहिलेले डाव्या आघाडीचे सरकार ममता यांनी उलथवले. त्यात शुभेंदू यांचा सिंहाचा वाटा होता. ममता यांचे निकटवर्तीय म्हणून ते बंगालमध्ये परिचित होते. पण राज्यात तृणमूल काँग्रेसचे साम्राज्य वाढत गेले, तसे ममता यांचा भाचा अभिषेक बॅनर्जी यांचे महत्त्व पक्षात वाढत गेले. तिथूनच शुभेंदू अधिकारी नाराज झाले. त्यावेळी तृणमूल काँग्रेसचा राजीनामा देऊन भाजपमध्ये सामील झालेल्या शुभेंदू अधिकारी यांना अमित शहा यांनी विश्वास दिला आणि पश्चिम बंगालमधील २०२१ च्या निवडणुकीची धुरा त्यांच्यावर सोपवली. त्या निवडणुकीत भाजपाचे ७७ आमदार निवडून आले. या आश्चर्यकारक यशाने भाजपचा आत्मविश्वास वाढला. आपण ममता यांचा पराभव करू शकतो, २०२६ च्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला सत्तेवरून हटवू शकतो हे ओळखत भाजपाने हुशारीने रणनीती आखली. या रणनीतीबरहुकूम विजय मिळवला; पण राज्याच्या विकासाच्या मार्गात आव्हानांचा डोंगर उभा आहे. शुभेंदू सरकार या आव्हानांचा सामना कसे करते, यावरच त्यांचे आणि भाजपचे पश्चिम बंगालमधील भवितव्य अवलंबून आहे. **

# 'लाट' 'कोळम्या' आणि 'फाफाळा'

धनंजय शेटये

कोकणच्या मातीचा तो ओला सुगंध आणि वाड्या-वस्त्यांवर डोलणाऱ्या नारळी-पोफळीच्या बागांचे सौंदर्य म्हणजे निसर्गाचे एक अनोखे लेणे आहे. पण या हिरवाईच्या मुळाशी एकेकाळी 'लाट' आणि 'कोळम्या' या जोडगोळीचे अफाट कष्ट दडलेले होते. आज यांत्रिकीकरणाच्या वेगाने आणि इलेक्ट्रिक पंपांच्या घरघराट आवाजाखाली ही पारंपारिक साधने इतिहासात जमा झाली असली, तरी एकेकाळी याच लाटीने कोकणच्या बागायती खऱ्या अर्थाने रसाळ आणि समृद्ध केल्या होत्या. आजच्या पिढीला 'विहीर' कदाचित ठाऊक असेल, पण 'आड' या शब्दाची ओळख मात्र पुसली जात आहे. 'इकडे आड तिकडे विहीर' ही म्हण आपण केवळ संकटाच्या प्रसंगी वापरतो, पण वास्तवात 'आड' म्हणजे मानवनिर्मित पाण्याचा एक छोटा, खोल आणि नितळ डोह. विहीर व्यासाने विस्तीर्ण असते आणि तिला पायऱ्यांचे वैभव लाभलेले असते; मात्र आड हा आकाराने मर्यादित असूनही तिथले पाणी अमृतासारखे गोड आणि नैसर्गिकरित्या थंडगार असते. आधुनिकतेच्या प्रवासात आपण जुने जलस्त्रोत विसरत चाललो आहोत, पण याच विहिरी आणि आडांनी पिढ्यानपिढ्यांची तहान भागवली आहे.

खऱ्या अर्थाने जीवनातील संघर्षाची पहिली ओळख करून दिली ती 'फाफाळ्याने'. बालपणी जेव्हा तिसरी-चौथीत असताना अर्धा किलोमीटरवरून पिण्याचे पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागे, तेव्हापासून या फाफाळ्याशी गहिरे नाते जडले. विहिरीवर आरपार बसवलेला तो भलामोठा लाकडी वासा,सोबत जोडलेले आणखी एकदोन वासे... जोडलेली 'फाफाळी' म्हणजे केवळ पाय टेकण्याचे साधन नव्हते, तर ते एक सुरक्षेचे कवच होते. विशिष्ट झाडांच्या लाकडापासून बनवलेला हा 'फाफाळा' पाण्यात कितीही काळ राहिला तरी कधी कुजत नसे. डोंबाऱ्याच्या खेळाप्रमाणे या फाफाळ्यावर उभे राहून, एका हाताने लाटीचे कोळमं पाण्यात बुडवण्यासाठी प्रचंड दाब देऊन उडी घेणे, हे एखाद्या थरारापेक्षा कमी नसे. विहिरीच्या त्या भयावह खोलीसमोर उभे राहून हा फाफाळा केवळ आधार देत नसे, तर तो जीवनातील सुख-दुःखाचा समतोल राखण्याची आणि संकटात हिंमत न हारण्याची ताकद देऊन जाई.

नव्वदीच्या दशकापर्यंत जेव्हा विजेचा प्रकाश गावोगावी पोहोचला नव्हता, तेव्हा विहीर किंवा आडातील पाणी उपसण्यासाठी मानवी बुद्धिमत्तेचा आणि भौतिकशास्त्राचा एक सुंदर मिलाफ पाहायला मिळे, तो म्हणजे 'लाट'. विहिरीच्या काठावर इंग्रजी आकाराची मजबूत लाकडी 'मेडकी' आणि त्यावर संतुलित केलेली 'वासोळी' हे त्या काळातील इंजिनिअरिंगच होते. लाटीच्या एका टोकाला निसर्गाचाच भार असलेला भव्य, वजनदार दगड आणि दुसऱ्या टोकाला पत्र्यापासून बनवलेले मजबूत 'कोळमं' लटकलेले असे. अतिवापराने या कोळमंला छिद्र पडले, तर त्यावर डांबर लावून ते पुन्हा वर्षानुवर्षे टिकवले जाईही काटकसर म्हणजे कोकणी माणसाच्या जगण्याचे सूत्र होते. जेव्हा लाट झुकवली जाई, तेव्हा कोळमं पाण्यात डुबकी घेई आणि दुसऱ्या बाजूच्या दगडाच्या प्रतिबलाने ते पाणी सहज वर खेचले जाई. लाटीने पाणी उपसणे हे तसे पुरुषी कष्टाचे काम, पण कोकणच्या कणखर स्त्रियांनी कधीच हार मानली नाही. साठ वर्षांची आजी जेव्हा फाफाळ्यावर एका उडीत चढून, काही सेकंदात कोळम्यातून पाणी भरून झपाझप बागेला पाणी द्यायची, तेव्हा ते दृश्य काळजाचा ठोका चुकवणारे आणि अभिमानास्पद असे. हा केवळ जलसिंचनाचा प्रकार नव्हता, तर तो एक तालबद्ध आविष्कार होता. लाटीवरून पाणी काढताना होणारा तो नैसर्गिक व्यायाम आणि अंगातून वाहणाऱ्या घामाच्या धारा यामुळे व्याधी आणि आजार कोकणच्या माणसापासून कोसो मैल दूर राहायचे. त्या काळात जिम नव्हती, पण प्रत्येकाचे शरीर लोखंडासारखे काटक होते. संध्याकाळच्या सोनेरी उन्हात लाटीने बागायतीला पाणी देण्याचा तो अनुभव आजही डोळ्यांसमोर जुना सुवर्णकाळ उभा करतो.

आज विहिरींवर मोटर्स बसल्या आहेत, एका बटणावर पाण्याची धार लागते; पण त्या लाटीचा तो लयबद्ध 'कर्रर' आवाज, कोळम्यातून पाटात सांडणाऱ्या पाण्याचा मधुर खळखळाट आणि कष्टातून मिळणारा तो निखळ आनंद आता हरवला आहे. आधुनिकतेच्या नावाखाली आपण निसर्गाचे औदार्य नाकारले, जुनाट वनराई बंधारे नष्ट केले आणि परिणामी आज विहिरी व आड कोरडे ठण्ण झाले आहेत. माणसाचा निष्काळजीपणा आज निसर्गाच्या मुळावर उठला आहे. लाट, कोळम्या आणि फाफाळा ही केवळ लाकूड आणि पत्र्याची साधने नव्हती, तर ती कोकणच्या स्वावलंबनाची, कष्टाळू संस्कृतीची आणि निसर्गाशी असलेल्या अतूट नात्याची जिवंत प्रतीके होती. काळाच्या ओघात ही साधने लोप पावली असली, तरी कोकणच्या प्रत्येक जुन्या वाडीच्या मातीत आजही या लाटीच्या कष्टाचा सुगंध दरवळत आहे. **



# 'सुसंस्कारित विद्यार्थी घडविण्याची गुरुकिल्ली'

सुनील गवळी

दयाभाव, क्षमाभाव आणि अपराधभाव या तीन मानवी भावना जीवनाला केवळ दिशा देत नाहीत, तर त्याला अंतर्मुख अर्थही प्रदान करतात. आजच्या स्पर्धात्मक, वेगवान आणि अनेकदा स्वार्थी होत चाललेल्या जगात या त्रिसूत्रीचे महत्त्व अधिकच वाढलेले आहे. माणूस म्हणून आपण केवळ बुद्धीने नाही, तर भावनांनीही घडतो; आणि या भावनांमध्ये ही तीन मूल्ये आपल्या व्यक्तिमत्त्वाचा कणा बनतात.

दयाभाव म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाशी मनाने जोडले जाणे. ही भावना माणसाला संवेदनशील बनवते. ज्या हृदयात दया असते, तेथे कठोरता, अहंकार आणि निर्दयता टिकू शकत नाही. तात्विकदृष्ट्या पाहिले, तर दया म्हणजे ''स्व'' च्या पलीकडे जाऊन ''पर'' ची जाणीव होणे. गौतम बुद्ध यांचे जीवन अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी सर्व जीवांवर करुणा दाखवली आणि अहिंसा, प्रेम व सहानुभूतीचा संदेश दिला. दयाभावामुळेच माणूस माणसाशी जोडला जातो आणि समाजात सुसंवाद निर्माण होतो.



क्षमाभाव ही दुसरी महत्त्वाची भावना आहे. क्षमा म्हणजे केवळ दुसऱ्याला माफ करणे नव्हे, तर स्वतःच्या मनातील राग, द्वेष आणि सूडभावना सोडून देणे होय. क्षमा ही दुर्बलतेचे नव्हे, तर सामर्थ्याचे प्रतीक आहे. जो माणूस क्षमा करतो. तोच खऱ्या अर्थाने अंतर्मुख आणि शांत असतो. येशू ख्रिस्त यांचे जीवन पाहिले, तर त्यांनी अत्यंत वेदनादायक परिस्थितीतही आपल्या विरोधकांना माफ केले. हा क्षमाभाव आपल्याला शिकवतो की द्वेषाने द्वेष संपत नाही; प्रेम आणि क्षमेनेच तो नष्ट होतो. क्षमा केल्याने मन हलके होते आणि जीवन अधिक शांत, समाधानकारक बनते.

अपराधभाव ही तिसरी आणि तितकीच महत्त्वाची भावना आहे. आपल्या चुकीची जाणीव होणे आणि त्याबद्दल मनात खंत निर्माण होणे म्हणजे अपराधभाव. ही भावना माणसाला योग्य मार्गावर परत आणण्याचे कार्य करते. मात्र, हा भाव नकारात्मक न ठरता तो आत्मशुद्धीचा मार्ग बनला पाहिजे. सम्राट अशोक यांचे उदाहरण येथे अत्यंत महत्त्वाचे आहे. कलिंग युद्ध नंतर झालेल्या रक्तपातामुळे त्यांच्या मनात तीव्र अपराधभाव निर्माण झाला आणि त्यातूनच त्यांनी अहिंसा या धर्माचा मार्ग स्वीकारला. यावरून स्पष्ट होते की योग्य प्रकारे अनुभवलेला अपराधभाव माणसाला अधिक सजग, संवेदनशील आणि श्रेष्ठ बनवतो.

या तिन्ही भावना एकत्र आल्या की जीवनाचा खरा समतोल साधला जातो. दयाभाव आपल्याला इतरांशी जोडतो, क्षमाभाव आपल्याला अंतःशांती देतो आणि अपराधभाव आपल्याला स्वतःची सुधारणा करण्याची प्रेरणा देतो. या त्रिसूत्रीमुळे माणूस केवळ बाह्य यश मिळवणारा न राहता अंतःकरणानेही समृद्ध होतो.

शेवटी असे म्हणता येईल की, जीवनाचे खरे सौंदर्य या भावनांमध्येच दडलेले आहे. दयाभावाने हृदय विशाल होते, क्षमाभावाने मन शांत होते आणि अपराधभावाने आत्मा शुद्ध होतो. या तिन्हींचा समतोल राखणारा माणूसच खऱ्या अर्थाने समाधानी, आनंदी आणि यशस्वी जीवन जगू शकतो.पर्यायी सुदंर व्यक्तिमत्त्वाचा विद्यार्थी निश्चितच घडू शकतो. **

# गोवंश जगला पाहिजे!

जगन घाणेकर

गोवंशाचे जतन, संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी तसेच गोतस्करी, गोवंशाची अवैध वाहतूक आणि बेकायदेशीर कत्तलखान्यांवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने नवीन मार्गदर्शक सूचना जरी केल्या असून सर्व नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांना त्यांच्या क्षेत्रातील अवैध कत्तलखाने शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संघटीतपणाने वारंवार गोतस्करी करणाऱ्या टोळ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे पोलिसांना देण्यात आले असून परिवहन विभागालाही गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी वाहनांची नियमित तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर हे आदेश देण्यात आले असले तरी याची अमलबजावणी कितपत होईल हे मात्र देवच जाणे. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू करून ११ वर्षे उलटली. २०२४ मध्ये राज्य सरकारने गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला. तरीही राज्यातील गोवंश हत्या कमी झालेल्या नाहीत. बकरी ईदच्या निमित्ताने राज्यात मोठ्या प्रमाणात गोवंश कापला जातो हे सत्य कुणीही नाकारू शकत नाही.

गोवंशाने भरलेलया गाड्या पोलिसांकडून किंवा गोरक्षकांकडून पकडल्या गेल्याच्या बातम्या हल्ली प्रतिदिन कोणत्या ना कोणत्या वृत्तपत्रात वाचायला मिळतात. ज्या पद्धतीने या गाड्यांमध्ये गोवंश भरलेले असतात ते पाहिल्यावर कोणत्याही हिंदूंच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. गाड्यांमध्ये अत्यंत निर्दयपणे कोंबून भरलेल्या गोवंशांपैकी काही गोवंश तर प्रवासातच मृत पावतात. हे सर्व पाहिल्यावर राज्यात खरोखर गोवंश हत्याबंदी कायदा आहे का, असा प्रश्न पडतो. जर कायदा अस्तित्वात आहे तर गुन्हेगारांना त्याचे भय का वाटत नाही? हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय. गोहत्या बंदी कायदा राष्ट्रीय स्तरावर करण्याची आणि गाईला राष्ट्रीय पशू म्हणून घोषित करण्याची मागणी वारंवार केली जात आहे. भारतात बहुसंख्य असलेल्या हिंदूंना गाय ही अत्यंत पूजनीय आहे. कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते. गायीच्या दुधाचे महत्व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. गाईच्या दुधापासून अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते ज्यातून गोपालन करणाऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळते. देशी गाईचे तूप हे अनेक आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते. गाय ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे त्यामुळे ती उपयुक्त आणि श्रद्धेय का आहे याचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांत आढळतो. वसिष्ठ ऋषींनी गोमातेवर संशोधन करू गाईच्या अनेक प्रजाती निर्माण केल्या. गोपालनाचे महत्व साक्षात भगवान श्रीकृष्णाने स्वतः गोपालन करून दर्शवले आहे, दत्तगुरुंनीही गोमातेची महती वर्णिली आहे. छत्रपती शिवरायांनी गोहत्येसाठी सरसावणारे कसायाचे हात जागेवर कलम करून गोरक्षणाचे महत्व रयतेवर बिंबवले होते. महाराजांनी हिंदवी स्वराज्यात गोपालनाला विशेष महत्व दिले. त्यामुळेच महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटले जाते. पंजाब केसरी महाराजा रणजीत सिंह यांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यात गोहत्या करणाऱ्याला मृत्युदंडाच्या शिक्षेचे प्रावधान केले होते. रामचंद्र बीर यांनी गोहत्या थांबवण्यासाठी ७० दिवस उपवास केला होता. हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि अध्यात्मिक संप्रदाय यांनी केलेल्या अथक पाठपुराव्यानंतर राज्यातगोवंशहत्याबंदीविधेयकआणण्यात आले; मात्र आजमितीला त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमालीची ढिलाई दिसून येत आहे.

भारत हा पूर्वीपासून कृषीप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत घट होऊ लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात प्रचंड उकाडा वाढला आहे. उन्हाळ्यात राज्याच्या अनेक भागांत दुष्काळी परिस्थितीमुळे फार मोठे संकट ओढवते . शेतकऱ्यांचा आणि त्याच्या कुटुंबीयांचा रोजच्या अन्न पाण्याचा प्रश्न निर्माण होतो तिथे घरच्या गोधनाला चारा कुठून देणार ? पुरेसा चारा मिळत नसल्याने गाई दूध देत नाहीत. ग्रामीण भागातील गोशाळांमध्ये अशा प्रकारे सोडलेल्या गाईंमध्ये अनेक गाई या भाकड असतात. त्यामुळे गोशाळांना दूध अथवा दुग्धजन्य उत्पादनातून तितकेसे उत्पन्नही मिळत नाही.

गोशाळांतील वाढते गोधन आणि मिळणाऱ्या मर्यादित देणग्या यांमुळे गोशाळा चालवणाऱ्या अनेक गोपालकांवर दरवर्षी आर्थिक संकट ओढवते. कसायांकडून अशा गोशाळांना संपर्क करून गोवंशाची मागणी केली जाते; मात्र आज काही असेही गोपालक आहेत ज्यांनी गोशाळा चालवण्यासाठी स्वतःचे घरदार विकले आहे; मात्र एकही गोवंश कसायापर्यंत जाऊ दिलेला नाही. गोशाळेतील गोवंश जगवायचे असतील, तर केवळ सरकारवर अवलंबून राहणे चालणार नाही. त्यासाठी समाजातील सधन मंडळींनी पुढे यायला हवे. आपल्या ऐपतीनुसार गोवंशाच्या काही दिवसांचा खर्च भागेल असे अर्पण द्यायला हवे. कसायाच्या तावडीतून केवळ गोधन वाचवून चालणार नाही तर ते वाचवलेले गोधन जगवायची जबाबदारीही आपलीच आहे हे जाणून गोशाळांना शक्य तितके अर्थसाहाय्य प्रत्येकाने करायला हवे ! **

# नकारातून मान्यतेकडे : कॅनडा आणि खलिस्तानी धोका

**निजीश एन**



कॅनेडियन सुरक्षा गुप्तचर सेवा (सीएसआयएस) चा सार्वजनिक अहवाल २०२५ जो १ मे २०२६ रोजी प्रसिद्ध झाला, ओटावाच्या धोका मूल्यांकनाच्या चौकटीत महत्त्वपूर्ण बदल दर्शवतो. विशेषतः कॅनडास्थित खलिस्तानी अतिरेकी (सीबीकेई) संदर्भात. या अहवालात अशा क्रियाकलापांना राजकीय हेतूप्रेरित हिंसक अतिरेकीवाद (पीएमव्हीई) अंतर्गत वर्गीकृत करण्यात आले असून स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, ''कॅनडास्थित खलिस्तानी अतिरेक्यांकडून सुरू असलेला हिंसक अतिरेकी कारवायांमधील सहभाग हा कॅनडाच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि हितसंबंधांसाठी धोका आहे.''

अहवालानुसार, काही व्यक्तींचा एक मर्यादित गट कॅनडाचा वापर हिंसाचाराला प्रोत्साहन देण्यासाठी, निधी उभारणीसाठी किंवा नियोजनासाठी आधारस्थान म्हणून करतो. तसेच काही कॅनडास्थित खलिस्तानी अतिरेकी (सीबीकेई) कॅनडातील संस्थांचा आणि अनभिज्ञ समुदाय सदस्यांचा वापर करून निधी हिंसक अतिरेकी कारवायांकडे वळवत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

अहवालात १९८५ मधील एअर इंडिया फ्लाइट १८२ बॉम्बस्फोटाचा थेट उल्लेख करण्यात आला आहे. हा हल्ला कॅनडाच्या इतिहासातील सर्वात भीषण दहशतवादी हल्ला मानला जातो. यात ३२९ जणांचा मृत्यू झाला होता, त्यापैकी बहुसंख्य कॅनेडियन नागरिक होते. या घटनेचा उल्लेख करून कॅनेडियन सुरक्षा गुप्तचर सेवा (सीएसआयएस) ने स्पष्ट केले आहे की कॅनडास्थित खलिस्तानी अतिरेकी-संबंधित हिंसा यापूर्वी कॅनडाच्या भूमीवर घडलेली आहे, त्यामुळे हा धोका केवळ बाह्य स्वरूपाचा मानता येणार नाही.

तथापि, अहवालात खलिस्तानसाठी शांततामय समर्थन आणि हिंसक अतिरेकीवाद यांच्यात स्पष्ट फरक करण्यात आला आहे. कॅनडाच्या कायद्यांतर्गत कायदेशीर आंदोलन, मतभेद किंवा राजकीय समर्थन संरक्षित असल्याचे नमूद करताना, केवळ तेच घटक अतिरेकी म्हणून गणले जातील जे कॅनडाचा वापर हिंसा, निधी उभारणी किंवा नियोजनासाठी मुख्यतः भारतात करतात.

जून २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या वार्षिक अहवाल २०२४ मध्ये प्रथमच स्पष्टपणे मान्य करण्यात आले होते की खलिस्तानी अतिरेकी कॅनडाची भूमी हिंसा आणि निधी उभारणीसाठी वापरत आहेत. हा बदल महत्त्वाचा मानला जातो, कारण २०१८ च्या दहशतवादी धोक्यावरील सार्वजनिक अहवालातून ''खलिस्तानवादी अतिरेकीवाद'' हा उल्लेख हटवण्यात आला होता. हा बदल कॅनडाच्या २०२५ च्या धनशोधन आणि दहशतवादी वित्तपुरवठा धोका अहवालाने अधिक ठळक केला. या अहवालात बंदी घातलेल्या बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) आणि आंतरराष्ट्रीय शीख युवा महासंघ (आयएसवायएफ) या संघटनांना कॅनडातून निधी मिळत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर द्वेषविरोधी कायदा विधेयक (बिल सी-९) ला २५ मार्च २०२६ रोजी कनिष्ठ सभागृहाने मंजुरी दिली. या कायद्यांतर्गत दहशतवादी संघटनांच्या चिन्हांचे सार्वजनिक प्रदर्शन, जेव्हा ते द्वेष पसरवण्यासाठी वापरले जाते, ते गुन्हा ठरवण्यात आले आहे.

४ मे २०२६ रोजी सरे येथील न्यूटन परिसरात भारतीय वंशाचे सिमरनजीत सिंग उर्फ सॅम कॅनडा यांची लक्ष्यित गोळीबारात हत्या झाली. तपास यंत्रणांनी या प्रकरणात संभाव्य खलिस्तान-संबंधित कोन तपासात असल्याचे सूचित केले आहे. त्यानंतर रोहित गोदारा यांनी सामाजिक माध्यमांवर या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली.

तसेच ३ मार्च २०२६ रोजी ऑन्टारियो प्रांतातील ला-साल येथे पंजाबी वंशाच्या सामाजिक माध्यम प्रभावक नॅन्सी ग्रेवाल यांची चाकूने हत्या करण्यात आली. त्या खलिस्तानी अतिरेकीवादाच्या उघड टीकाकार होत्या. तपास यंत्रणा संभाव्य खलिस्तान-संबंधित हेतूंची चौकशी करत आहेत.

खलिस्तान अतिरेकी निरीक्षण मंच (केईएम) च्या माहितीनुसार, २०२६ च्या पहिल्या चार महिन्यांत कॅनडामध्ये भारतीय वंशाच्या तीन व्यक्तींच्या लक्ष्यित हत्या झाल्या आहेत. २०२५ मध्ये अशाच सहा घटना नोंदल्या गेल्या होत्या.

या वाढत्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर २९ सप्टेंबर २०२५ रोजी कॅनडा सरकारने लॉरेन्स बिश्नोई टोळीला फौजदारी संहितेअंतर्गत दहशतवादी घटक म्हणून घोषित केले.

भारताने दीर्घकाळापासून कॅनडावर खलिस्तानी नेटवर्कना सुरक्षित आश्रय देत असल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) नुसार, २०२३ मध्ये ओळखल्या गेलेल्या २८ मोस्ट-वॉंटेड गुन्हेगार-दहशतवाद्यांपैकी ९ जण कॅनडात कार्यरत होते. तसेच जून २०२५ पर्यंत २६ प्रत्यार्पण विनंत्या प्रलंबित होत्या.

दुसरीकडे, कॅनेडियन सुरक्षा गुप्तचर सेवा (सीएसआयएस) अहवाल भारतावरही सीमापार दडपशाही आणि परकीय हस्तक्षेपचे आरोप करतो. भारतासह चीन, रशिया, इराण आणि पाकिस्तान यांचा या संदर्भात उल्लेख करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, नवीन अहवालात हरदीप सिंग निज्जर प्रकरणाचा थेट उल्लेख नाही. २०२३ मध्ये त्यांच्या हत्येनंतर तत्कालीन पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी भारतीय एजंट्सच्या संभाव्य सहभागाचा आरोप केला होता, ज्यामुळे भारत-कॅनडा संबंधांमध्ये तीव्र तणाव निर्माण झाला.

एकूणच, सार्वजनिक अहवाल २०२५ हा खलिस्तानी प्रश्नाबाबत अधिक वास्तववादी आणि संतुलित दृष्टिकोन स्वीकारल्याचे संकेत देतो. या अहवालाचे खरे महत्त्व असे की, अनेक वर्षे भारत-कॅनडा संबंधांच्या चौकटीत पाहिला जाणारा हा मुद्दा आता कॅनडाच्या देशांतर्गत राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न म्हणून मांडला जात आहे.

आता मुख्य प्रश्न असा आहे की मार्क कार्नी यांच्या नेतृत्वाखालील कॅनडा सरकार या निष्कर्षांच्या आधारे ठोस कारवाई करण्याची राजकीय इच्छाशक्ती दाखवेल का आणि भारताशी संबंध सुधारताना या गुंतागुंतीच्या प्रश्नाला कितपत प्रभावीपणे हाताळेल. **

## उज्ज्वल यशाचा मार्ग..

# मी एक स्वप्न पाहिलं!

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

''मी एक स्वप्न पाहिलं!'' हे डॉ. राजेंद्र कमलाबाई भारुड यांचे पुस्तक, जळगावच्या दीपस्तंभ प्रकाशनने प्रकाशित केले आहे. सुरुवातीला दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन यांचे 'मनोगत' आहे. त्यांनी स्पष्ट केले आहे की, ''सुसंस्कृतता, गुणवत्ता, यश ही काही मोठ्या शहरातल्या इंग्रजी शाळांची आणि सुखसोयींनी युक्त असलेल्या श्रीमंतांच्या मुलांची मक्तेदारी नसते, तर ज्या हृदयात जिद्द, कष्ट, चिकाटी, धैर्य, आत्मविश्वास, स्वतःवर व निसर्गशक्तीवर अपार 'श्रद्धा' यांची ज्योत पेटते, तिथे सर्व स्वप्नांची पूर्ती होते. तुम्ही कोणाच्या पोटी जन्माला येता; तुमचे आई वडील गरीब आहेत की श्रीमंत, तुम्ही खेड्यात आहात की शहरात, मराठी मीडिअमला आहात की सेमी इंग्रजी, सीबीएससीला आहात, याचा आणि तुमच्या यश-अपयशाचा काहीही संबंध नसतो. तुमचे विचार, स्वभाव व बेभान होऊन मेहनत घेण्याची वृत्ती यावरच तुमचे भवितव्य अवलंबून असते... याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे राजेंद्रचा जीवन प्रवास आहे. या पुस्तकाला विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत. एकूण अठरा प्रकरणांतून राजेंद्र यांची उत्तुंग यशोगाथा उलगडते. रंगीत आणि आगळे मुखपृष्ठ अमोल महाजन, जळगाव यांचे आहे.




सुरुवातीला राजेंद्र यांनी आपल्या जन्मापूर्वीची, आई-वडिलांची माहिती दिली आहे. आईचा जन्म सामोड्याहून पंधरा कोस दूर असलेल्या जामन्यापाडा या छोट्याशा, वीस, पंचवीस घरांच्या पाड्यात झाला. आईचे नाव कमलाबाई, पण धाकलीबाई म्हणूनच ती ओळखली जाई. कमलाबाई आणि बंडू भारुड यांचा विवाह झाल्यानंतर अल्पावधीतच त्यांचे वडील, आईच्या गावातच राहायला आले. वडिलांच्या मृत्यूनंतर राजेंद्रचा जन्म झाला. आई, मोठी भावंडे आणि छोट्या राजेंद्रला मावशीच्या घरामध्ये आसरा, प्रेम आणि आधार मिळाला. भिल्ल कुटुंबातील, राजेंद्र यांचे दारिद्र्यातील जीवन कसे होते, याची जाणीव त्यांच्या कथनातून वाचकाला होते. शाळा : एक प्रकाशवाट, मध्ये राजेंद्र यांनी आपल्या शालेय जीवनाविषयी सविस्तरपणे सांगितले आहे. त्यांच्या भिल्ल कुटुंबातील राजेंद्र हाच एकमेव उच्च शिक्षण घेऊ शकला. त्यांचे शिक्षक, खऱ्या अर्थाने दीपस्तंभ कसे होते, हे राजेंद्र यांनी सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. राजेंद्र यांच्या हुशारीमुळे, १९९८ मध्ये अक्कलकुव्याच्या नवोदय विद्यालयात, राजेंद्र यांना प्रवेश मिळाला. त्या वेळचे वर्णन आणि तेथील सातपुडा हाऊसच्या विविध आठवणी विलक्षण हृद्य आहेत. नवोदय विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना एक वर्ष अन्य राज्यातील शाळेमध्ये शिकण्याची संधी मिळते. त्यामुळे अन्य राज्यातील संस्कृती, भाषा, समाजव्यवस्था यांची नवोदय विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती मिळते. आपल्या प्रांताबाहेरच्या, देशवासियांविषयी आपलेपणा निर्माण होतो. राजेंद्र यांना राजस्थानमध्ये नवोदय विद्यालयात एक वर्ष शिकण्याची संधी मिळाली. तेथील विविध अनुभव विलक्षण स्वरूपाचे आणि वाचकांना अंतर्मुख करणारे आहेत. राजेंद्र यांच्या आईने त्यांच्या शिक्षणासाठी अतोनात कष्ट घेतले. त्यांचा भाऊही त्यावेळी शिकत होता. मजुरीवर जाणे, दारू विकणे यासोबतच गावातील मुकादम म्हणूनही त्यांच्या आईने काम पाहिले होते. त्यांच्या कुटुंबाला मावशीची प्रेमळ साथ होती.

मोठ्या भावासाठी पुढील शिक्षण खर्च करणे आईला शक्य नसल्याने, त्याने डी. एड.साठी प्रवेश घेतला आणि आईला मुकादमीच्या कामात मदत करू लागला. उत्तम गुण मिळाल्यामुळे बारावीनंतर इंजिनियर व्हावे की डॉक्टर, असा प्रश्न राजेंद्र यांच्यासमोर होता. देवरे सरांनी डॉक्टर होण्याचा योग्य सल्ला दिला आणि डॉक्टर झाल्यानंतर लोकसेवा आयोगाच्या परीक्षाही सहज उत्तीर्ण होता येतील, असेही त्यांनी सुचविले होते. त्यामुळे आईचे स्वप्नही साकार होणार होते. हरीश पाटील सरांच्या सांगण्यानुसार राजेंद्र यांनी जळगावला एका खाजगी क्लासमध्ये परीक्षेची तयारी करण्यासाठी प्रवेश घेतला. उत्तम, उच्च गुणांमुळे राहण्याजेवण्याची व्यवस्था मोफत केली गेली. नवोदयमधील अन्य विद्यार्थीही तेथे आले होते. ४० ते ५० विद्यार्थी या परीक्षेला बसणार होते. उत्तम गुणांनी सीईटी पास होणे, हे राजेंद्र यांचे ध्येय होते. सीईटी परीक्षेमध्ये राजेंद्र यांना १९४ गुण मिळाले. एस.टी. कॅटेगरीतून राज्यात पहिला, तर जनरलमधून त्यांचा क्रमांक पाचवा होता. या गुणांमुळे महाराष्ट्रातल्या कोणत्याही सर्वोत्तम वैद्यकीय महाविद्यालयात राजेंद्र यांना सहज प्रवेश मिळणार होता. मुंबईच्या जी.एस.मेडिकल कॉलेजमध्ये एम.बी.बी.एस.साठी राजेंद्र यांनी प्रवेश घेतला. प्रवेश घेताना आलेल्या कटू अनुभवातून, ''आरक्षणाचे वास्तव आणि मानसिकता'' याविषयी राजेंद्र यांनी महत्त्वाचे भाष्य केले आहे. राजेंद्र यांना आपले इंग्रजी कच्चे असल्याचे आणि वर्गात नीट बोलता येत नसल्याने, त्यांना काहीसा न्यूनगंड आला होता. त्यांचा न्यूनगंड त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांनी दूर केला. त्यामुळे नंतर राजेंद्र यांची हुशारी सर्वांना समजली . अभ्यासेतर कार्यक्रमांमध्येही राजेंद्र यांनी सहभाग घेतला. प्रेमाच्या गावाला जायचेच नाही, असा सहलीच्या वेळच्या अनुभवावर आधारलेला, निष्कर्ष राजेंद्र यांनी नोंदविला आहे. अंतिम परीक्षा झाल्यानंतर राजेंद्र यांनी यूपीएससी परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली. यूपीएससीची परीक्षा दोन वेळा दिल्यानंतर, राजेंद्र यांची आय.ए.एस. साठी निवड झाली. ''भिल्लाचा पोर कलेक्टर झालं.'' असे शेवटी राजेंद्र यांनी नोंदविले आहे. ''मी एक स्वप्न पाहिलं!'' हा डॉ.राजेंद्र भारूड यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास वाचकाला अंतर्मुख करतो. बालपणातील प्रचंड गरिबी, मात्र शिक्षणाची तीव्र इच्छा, कष्ट घेण्याची जिद्द यामुळे हे आत्मकथन सर्वानाच प्रेरक ठरणारे आहे. यजुर्वेंद्र महाजन यांचे शालेय विद्यार्थ्यांसाठी, स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन, शेवटच्या प्रकरणात वाचावयास मिळते. विविध कृष्णधवल छायाचित्रांमुळे डॉ. राजेंद्र भारुड, आयएएस यांचे आत्मकथन विलक्षण प्रभावी झाले आहे. त्यामधील विविध प्रसंग वाचकांच्या मनावर कोरले जातात. पुस्तकाचे शेवटी दीपस्तंभ संचलित विविध योजनांची माहिती सविस्तरपणे देण्यात आली आहे. **

**पुस्तकाचे नावः मी एक स्वप्न पाहिलं!**
**लेखक : डॉ.राजेंद्र भारुड, आयएएस**
**प्रकाशक : दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव**
**पुस्तकासाठी संपर्क : ९१५८३२३६६०**
**आवृत्ती : सप्टेंबर २०१३**
**पृष्ठे : १६६, किंमर रुपये : रू. १३०/-**

# सामान्यांना हवामानबदलाचा फटका

**एप्रिल २०२६ मध्ये जगाने एकाच वेळी अनेक आपत्तींचा सामना केला. अरब देशांमध्ये अचानक आलेल्या पुरांनी अनेकांचे जीव घेतले, तर दक्षिण आफ्रिका भीषण दुष्काळाने होरपळत राहिली. तेव्हाच आर्क्टिकमधील बर्फ झपाट्याने आकुंचन पावत गेला. बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका बसत असल्याने सामान्य आणि शेतकरी दुष्काळाने त्रस्त आहेत, शहरे पुरात बुडत आहेत आणि लाखो लोक असह्य उष्णतेत जगत आहेत.**

**मिलिंद बेंडाळे**



एप्रिल २०२६ मधील आकडेवारीने स्पष्ट केले आहे, की हवामान बदलाचे संकट प्रत्येक वर्षागणिक गडद होत चालले आहे. युरोपियन हवामान संस्था 'कोपिर्निकस क्लायमेंट सर्व्हिसेस' (सीसीएस)ने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२६ हा जागतिक स्तरावर नोंदवला गेलेला तिसरा सर्वाधिक उष्ण महिना ठरला. या कालावधीमध्ये पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान १४.८९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे १९९१ ते २०२० या कालखंडातील सरासरीपेक्षा ०.५२ अंश अधिक होते. औद्योगिक क्रांतीपूर्व काळाशी (१८५०-१९००) तुलना केली असता हे तापमान तब्बल १.४३ अंश सेल्सिअसने जास्त होते. यापूर्वी एप्रिल २०२० मध्येही अशीच नोंद झाली होती. पॅरिस करारांतर्गत जगाने तापमानवाढ दीड अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले होते; मात्र सध्याच्या वेगाने वाढणारे तापमान पाहता ही 'लक्ष्मणरेषा' लवकरच ओलांडली जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे. विश्लेषणानुसार, आजवरचा सर्वाधिक उष्ण एप्रिल २०२४ मध्ये नोंदवला गेला होता. तेव्हा तापमान औद्योगिकपूर्व पातळीपेक्षा १.५८ अंशांनी अधिक होते. दुसऱ्या क्रमांकाचा उष्ण एप्रिल २०२५ मध्ये नोंदला गेला, तेव्हा तापमान १.५१ अंशांनी जास्त होते. ही केवळ वाढत्या तापमानाची आकडेवारी नाही, तर या उष्णतेच्या आणि टोकाच्या हवामान घटनांच्या फटक्याने उद्ध्वस्त होत चाललेल्या कोट्यवधी जीवनांची कहाणी आहे. वैज्ञानिकांच्या मते, हे फक्त हवामानबदलाचे संकेत नाहीत, तर मानवी जीवन, अन्न, पाणी आणि भवितव्यावर थेट परिणाम करणाऱ्या जागतिक हवामान आपत्कालीन स्थितीचे इशारे आहेत.

याच सुमारास महासागरांची स्थितीही चिंताजनक बनली आहे. एप्रिल २०२६ मध्ये समुद्रपृष्ठाचे सरासरी तापमान २१ अंश सेल्सिअसवर पोहोचले. ते एप्रिल महिन्यासाठीचे दुसऱ्या क्रमांकाचे उच्चांकी तापमान आहे. वैज्ञानिकांच्या मते, येत्या काही महिन्यांमध्ये 'अल निनो'ची परिस्थिती निर्माण होऊ शकते. प्रशांत महासागरात त्याचे संकेत आधीच दिसू लागले आहेत. मध्य प्रशांत महासागरापासून अमेरिका आणि मेक्सिकोच्या पश्चिम किनाऱ्यांपर्यंत समुद्री उष्णतेच्या लाटा तीव्र होत असून, समुद्राचे तापमान विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. तापणारे महासागर ही केवळ आकड्यांची बाब नाही. त्याचा परिणाम मत्स्यसंपत्ती, सागरी परिसंस्था, चक्रीवादळे आणि जागतिक हवामानपद्धतींवर होत आहे. भविष्यात याच उष्ण समुद्रांमधून अधिक तीव्र चक्रीवादळे, मुसळधार पाऊस आणि दीर्घकालीन दुष्काळ निर्माण होण्याचा धोका आहे. युरोपमध्ये एप्रिल २०२६ हा विरोधाभासांनी भरलेला महिना ठरला. एकीकडे सरासरी तापमान नेहमीपेक्षा ०.५ अंशांनी जास्त होते. स्पेनने इतिहासातील सर्वाधिक उष्ण एप्रिल अनुभवला, तर दुसरीकडे पूर्व युरोपमध्ये हवामान तुलनेने थंड राहिले. पर्जन्यमानातही मोठी विषमता दिसून आली. पश्चिम आणि मध्य युरोप दुष्काळाच्या छायेत होते, तर ब्रिटन, आयर्लंड, आइसलँड, इटली, स्पेनचे काही भाग आणि पूर्व युरोपमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. दरम्यान, जगभरात टोकाच्या हवामान घटनांचे संकट कायम राहिले. अरब द्वीपकल्पातील अचानक आलेल्या पुरांनी मोठी हानी केली. इराण, अफगाणिस्तान, सौदी अरेबिया, सीरियात मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि पुरामुळे अनेकांचे प्राण गेले.

याच सुमारास दक्षिण आफ्रिका तीव्र दुष्काळाशी झुंज देत राहिली. अमेरिका, कॅनडा, उत्तर मेक्सिको, चीन, जपान आणि न्यूझीलंडच्या अनेक भागांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यवृष्टी झाली, तर ऑस्ट्रेलिया, मध्य आशिया आणि दक्षिण अमेरिकेतील काही प्रदेश अधिक कोरडे राहिले. पृथ्वीच्या उत्तर ध्रुवीय प्रदेशातही चिंताजनक बदल दिसून येत आहेत. एप्रिलमध्ये आर्क्टिकमधील समुद्री बर्फाचे क्षेत्रफळ सरासरीपेक्षा सुमारे पाच टक्के कमी होते. गेल्या ४८ वर्षांमधील एप्रिल महिन्यातील हा दुसऱ्या क्रमांकाचा नीचांक आहे. आकडेवारीनुसार, एप्रिल २०२६ मध्ये आर्क्टिकमधील समुद्री बर्फाचे क्षेत्रफळ १.३६ कोटी चौरस किलोमीटरवर घसरले, जे सामान्य पातळीपेक्षा सुमारे सात लाख चौरस किलोमीटरने कमी आहे. नोव्हेंबर २०२५ पासून सलग प्रत्येक महिन्यात आर्क्टिकमधील बर्फाची पातळी विक्रमी नीचांकी तीन स्तरांमध्ये राहिली आहे. वैज्ञानिकांच्या मते, हे झपाट्याने बदलणाऱ्या हवामानाचे स्पष्ट संकेत आहेत. अंटार्क्टिकामध्येही बर्फाचे प्रमाण सरासरीपेक्षा जवळपास दहा टक्क्यांनी घटले आहे. वैज्ञानिकांच्या मते, यापुढील काळात दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि उष्णतेच्या लाटा अधिक विनाशकारी स्वरूप धारण करू शकतात. सी३एसच्या उपसंचालक समंथा बर्गेस म्हणतात, पृथ्वी सातत्याने तापत आहे, हे एप्रिल २०२६ ने स्पष्टपणे दाखवून दिले आहे. समुद्री उष्णतेच्या लाटा वाढत आहेत, आर्क्टिकमधील बर्फ झपाट्याने वितळत आहे आणि युरोपमध्ये तापमान व पर्जन्यमानात तीव्र तफावत दिसत आहे. हे सर्व एका अधिकाधिक टोकाच्या हवामानाकडे झुकणाऱ्या पृथ्वीचे संकेत आहेत. खरे पाहता, पृथ्वीचा हा वाढता 'ताप' आता केवळ वैज्ञानिक अहवालांपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो कोरड्या पडणाऱ्या शेतांचा प्रश्न आहे. पुरात उद्ध्वस्त होणाऱ्या घरांचा आक्रोश आहे आणि बदलत्या हवामानाच्या अनिश्चिततेत अडकलेल्या कोट्यवधी लोकांच्या भवितव्याचा गंभीर इशारा आहे. पृथ्वीचा ताप आता केवळ हवामान खात्यांच्या अहवालांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर थेट मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी येऊन पोहोचला आहे. जगभरात वाढणाऱ्या उष्णतेच्या लाटा, असामान्य पाऊस, दीर्घकालीन दुष्काळ, वितळणारे हिमनग आणि उष्ण होत चाललेले महासागर ही सगळी चिन्हे एका मोठ्या हवामानसंकटाची नांदी ठरत आहेत. त्यातच आता पुन्हा एकदा 'अल-निनो'ची चाहूल लागल्याने चिंता अधिक गडद झाली आहे. 'अल-निनो' ही केवळ महासागरातील तापमानवाढ नाही, तर संपूर्ण जगाच्या हवामानचक्राला प्रभावित करणारी प्रक्रिया आहे. प्रशांत महासागरातील पाण्याचे तापमान वाढल्याचा परिणाम पर्जन्यमान, वारे, समुद्री परिसंस्था आणि जागतिक तापमानावर होतो. अनेकदा 'अल-निनो'च्या काळात जगातील अनेक भागांमध्ये तीव्र उष्णता, कमी पाऊस, दुष्काळ आणि अन्नसंकट निर्माण होताना दिसते.

आजची भीती यासाठी अधिक गंभीर आहे, की 'अल-निनो' आता हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर सक्रिय होत आहे. म्हणजेच पृथ्वी आधीच तापलेली असताना त्यावर 'अल-निनो'चा परिणाम अधिक तीव्र ठरण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक तापमानाने विक्रमी उच्चांक गाठले. अनेक देशांनी इतिहासातील सर्वाधिक उष्ण वर्षे अनुभवली. आता त्यात 'अल-निनो'ची भर पडल्यास उष्णतेच्या लाटा अधिक प्राणघातक ठरू शकतात. या वाढत्या उष्णतेचा सर्वाधिक फटका सामान्य माणसाला बसत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी बदलत्या पावसामुळे हवालदिल झाले आहेत.

कधी अवकाळी पाऊस तर कधी पावसाचा पूर्ण अभाव यामुळे शेतीचे गणितच विस्कळीत झाले आहे. उष्णतेमुळे जमिनीतील आर्द्रता कमी होत आहे. पाणीसाठे आटत आहेत आणि उत्पादनखर्च वाढत आहे. परिणामी अन्नधान्याच्या किमती वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. शहरी भागातही परिस्थिती वेगळी नाही. काँक्रीटच्या जंगलांमध्ये उष्णतेचा अधिक तीव्र परिणाम जाणवत आहे. उष्माघात, निर्जलीकरण, श्वसनाचे विकार आणि हृदयविकाराच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. गरीब वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांकडे ना पुरेसे पाणी आहे, ना थंड वातावरणाची साधने आहेत. त्यामुळे हवामानबदलाचा सामाजिक अन्याय अधिक स्पष्टपणे दिसून येतो. **

# रायगड क्रिकेटसाठी आरडीसीएचा टॅलेंट हंट

## || जिल्हाभरातील क्रिकेटपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद || २५० युवा खेळाडूंची चाचणी



| अलिबाग | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)तर्फे पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर शनिवारी (दि.२३) मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील मुलांच्या टॅलेंट हंट उपक्रमाला जिल्हाभरातील युवा क्रिकेटपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रायगड क्रिकेटच्या भविष्यातील संघ बांधणीसाठी गुणवंत खेळाडूंचा शोध घेण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात सुमारे २५० खेळाडूंनी नोंदणी करून सहभाग घेतला.

रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दडलेल्या क्रिकेट प्रतिभेला शोधून त्यांना जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय क्रिकेटच्या प्रवाहात आणण्याचा आरडीसीएचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला. आगामी काळात जिल्हा संघ अधिक मजबूत आणि स्पर्धात्मक बनविण्यासाठी लहान वयापासूनच खेळाडूंची निवड, प्रशिक्षण आणि घडण यावर भर देण्यात येत आहे. टॅलेंट हंट हा त्या दिशेने उचललेला महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.या निवड प्रक्रियेत खेळाडूंच्या फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण कौशल्याचे बारकाईने परीक्षण करण्यात आले. प्रत्येक विभागातील गुणवंत खेळाडूंची निवड त्यांच्या प्रत्यक्ष कामगिरीच्या आधारे तज्ज्ञ निवड समितीमार्फत करण्यात येणार आहे. यासाठी माजी इंडिया एफ खेळाडू तथा महाराष्ट्र रणजी संघाच्या निवड समितीचे अध्यक्ष अक्षय दरेकर, माजी रणजीपटू पुष्कराज चव्हाण, योगेश पवार, माल्कम मॉंटेरो, रायगड संघाचे मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी तसेच एमसीए पंच व राज्यस्तरीय खेळाडू सागर मुळे यांनी प्रमुख निवडकर्ते म्हणून जबाबदारी सांभाळली.

### गुणवत्ता सिद्ध करण्याचे व्यासपीठ

आरडीसीएच्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याचे व्यासपीठ मिळाले असून, याच खेळाडूंमधून भविष्यात रायगड क्रिकेटचे नवे शिलेदार घडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

निवड झालेल्या खेळाडूंसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि अधिकाधिक सामने खेळण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. या माध्यमातून खेळाडूंच्या कौशल्याला योग्य दिशा देऊन भविष्यात रायगड जिल्हा संघासाठी सक्षम खेळाडू घडविण्याचा आरडीसीएचा मानस आहे.

टॅलेंट हंट उपक्रमात हृषिकेश राऊत, संदीप जोशी, सागर कांबळे, मिहीर भाटकर, अभिजित रोहंदिया, विनय पाटील, रोहित कार्ले आणि सुनील सरगर यांनी निवड प्रक्रियेसाठी सहकार्य केले. तसेच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सदस्य अरुण शिंदे, देवेंद्र पाटील, ॲड. पंकज पंडित, प्रदीप खलाटे, नरेंद्र मयेकर, भूषण मोरे आणि मनोहर अहिर यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू व पालक उपस्थित होते.

# ‘खेळाडूंविरुद्ध सूडबुद्धीने वागू नका’

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



नवी दिल्ली उच्च न्यायालयाने भारतीय कुस्ती संघटनेला खडे बोल सुनावले. विनेश फोगाट हिला देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळण्यास अपात्र ठरवणाच्या भारतीय कुस्ती संघटनेच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करताना एखाद्या खेळाडूविरुद्ध सूडबुद्धीने वागू नये, अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली. तसेच आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणीमध्ये विनेश फोगाट हिचा समावेश होऊ शकतो की नाही याबाबतचे आदेशही उच्च न्यायालयाकडून देण्यात येणार आहेत. विनेश फोगाटचा आशियाई स्पधेसाठीच्या निवड चाचणीसाठी फेरविचारा करावा असे या वेळी सांगण्यात आले आहे. मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस करिया यांच्या खंडपीठाने म्हटले की, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना पूर्वी दिली जाणारी सवलत आता न देणे हे अनेक प्रश्न निर्माण करणारे आहे. केंद्र सरकारला विनेश फोगाटला आगामी आशियाई क्रीडा स्पर्धांच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची संधी द्यावी, असेही सांगण्यात आले. उच्च न्यायालयाकडून स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले की, भारतात मातृत्वाचा सन्मान केला जातो. त्यामुळे एखाद्या खेळाडूविरुद्ध सूडबुद्धीने वागू नये.

सरकारच्या वकिलांनी सांगितले की, साईच्या नियमांमध्ये काही परिस्थितींमध्ये पात्रतेच्या निकषांमध्ये सवलत देण्याची तरतूद आहे. त्यानंतर उच्च न्यायालयाने तज्ज्ञ समिती स्थापन करून विनेशच्या पुनरागमनाची क्षमता तपासण्यास सांगितले. उच्च न्यायालयाने सरकारला म्हटले की, तज्ज्ञांकडून तिचे मूल्यमापन करून घ्या आणि ती निवड चाचण्यांमध्ये सहभागी होईल याची खात्री करा. ही सुनावणी विनेश फोगाटने दाखल केलेल्या याचिकेवर होती.१८ मे रोजी न्यायाधीशांनी तिला तत्काळ दिलासा देण्यास नकार दिला होता. विनेश फोगाटने ३०-३१ मे रोजी होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी मागितली आहे. विनेश फोगाटच्या वकिलांनी सांगितले की, ९ मे रोजी तिला पाठवलेली कारणे दाखवा नोटीस ही तिला स्पर्धेबाहेर ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते. तरीही विनेश फोगाटने गोंडा येथे झालेल्या राष्ट्रीय ओपन रँकिंग स्पर्धेत सहभाग घेतला.

# ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी संघ जाहीर



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी वन डे मालिकेसाठी पाकिस्तानने १६ सदस्यीय संघ जाहीर केला. बाबर आझम, शादाब खान, नसीम शाह, हरिस रौफ तसेच बांगलादेशविरुद्ध वन डे सामने न खेळलेला सुफियान मोकीम यांचा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या संघात समावेश आहे. पाकिस्तानचा वन डे संघ: शाहीन शाह आफ्रिदी (कर्णधार), सलमान अली आगा (उप कर्णधार), अब्दुल समद, अबरार अहमद, अहमद दानियाल, अराफत मिन्हास, बाबर आझम, हारिस रौफ, माझ सदाकत, मुहम्मद गाझी घोरी, रोहेल नझीर, नसीम शाह, साहिबजादा फरहान, शादम हुसैन, शादम खान, शादम खान, मुहम्मद गाझी घोरी यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.

# राष्ट्रीय रोइंग स्पर्धेत श्रेयसला सुवर्णपदक

| पुणे | वृत्तसंस्था |



सटाणा येथील रहिवासी व नाशिक येथील केटीएचएम महाविद्यालयाचा विद्यार्थी श्रेयस भामरे याने राष्ट्रीय रोइंग स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. उत्कृष्ट कौशल्य, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर श्रेयसने राष्ट्रीय स्तरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. स्पर्धेत श्रेयस भामरेने आपल्या गटात प्रभावी प्रदर्शन करत सुवर्णपदकावर नाव कोरले. कठोर मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांच्या पाठबळामुळे ही उंच भरारी घेतली. राष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या या सुवर्ण यशामुळे आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीही त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. श्रेयसने राष्ट्रीय स्तरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. स्पर्धेत श्रेयस भामरेने आपल्या गटात प्रभावी प्रदर्शन करत सुवर्णपदकावर नाव कोरले.कठोर मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांच्या पाठबळामुळे ही उंच भरारी घेतली. राष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या या सुवर्ण यशामुळे आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीही त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. श्रेयस हा पिंपळकोठे (ता.बागलाण) येथील शिक्षक दीपक व कल्पणा भामरे यांचा श्रेयस मुलगा आहे. श्रेयसच्या यशाबद्दल खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार दिलीप बोरसे, माजी आमदार दीपिका व संजय चव्हाण, बागलाण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी चित्रा देवरे, सटाणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे यांनी अभिनंदन केले.

# सनरायझर्स हैदराबादचा दणदणीत विजय

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



यंदाच्या हंगामातील आपल्या शेवटच्या लीग सामन्यात सनरायझर्स हैदराबादने रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू विरुद्ध ५५ धावांनी शानदार विजय नोंदवला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने निर्धारित २० षटकांत २५५ धावांचा डोंगर उभा केला होता. प्रत्युत्तरात आरसीबीचा संघ २० षटकांत ४ बाद २०० धावांपर्यंतच मजल मारू शकला. प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या सनरायझर्स हैदराबादची सुरुवात वादळी झाली. सलामीवीर ईशानने अवघ्या ४६ चेंडूत ७९ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याला अभिषेकची उत्तम साथ मिळाली. त्याने अवघ्या २२ चेंडूत ५६ धावा कुटल्या. त्यानंतर नेहमीप्रमाणे क्लासनने २४ चेंडूत ५१ धावा करत संघाला ४ बाद २५५ या विशाल धावसंख्येपर्यंत पोहोचवले. आरसीबीकडून सलामने ४ षटकांत ५२ धावा देत २ बळी घेतले, तर कृणाल आणि सुयश यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. विशाल लक्षाचा पाठलाग करताना आरसीबीनेही सुरूवातीला कडवी टक्कर देण्याचा प्रयत्न केला. पाटीदारने ३९ चेंडूत ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. अय्यरने १९ चेंडूत ४४ धावा करत डावाला गती दिली. अखेरच्या टप्प्यात कृणालने ३१ चेंडूत ४१ धावांची नाबाद खेळी केली, परंतु हैदराबादच्या धावसंख्येचा डोंगर पार करणे आरसीबीला जमले नाही आणि त्यांचा डाव ४ बाद २०० धावांवर मर्यादित राहिला.

# वानखेडेवर रंगणार क्रिकेटचा जल्लोष



| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबई लीगच्या नवीन सिझनचे आणि पहिल्या वहिल्या टी-२० मुंबई महिला लीगचे काउंटडाऊन आता अधिकच उत्साहात होत आहे. यासाठी ट्रॉफी टूरचा शुभारंभ झाला. या टूरमुळे संपूर्ण शहरातील क्रिकेट चाहते उत्सुक असल्याचं पाहायला मिळालं. मुंबईतील प्रतिष्ठित रस्त्यांपासून ते गजबजलेल्या परिसरांपर्यंत, सर्वत्रच उत्साहाचे आणि उत्कंठेचे वातावरण होते. या चषकाचे स्वागत करण्यासाठी आणि शहरात रंगणाऱ्या या भव्य क्रिकेट महोत्सवाच्या पूर्वतयारीचा आनंद साजरा करण्यासाठी क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते.

टी-२० मुंबई लीगचा चौथा हंगाम आणि पहिल्या टी-२० मुंबई महिला लीगचे सामने १ ते १३ जून या कालावधीत वानखेडे स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत. चषक दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी, या चषकाने दक्षिण मुंबईतील वरळी सी-फेस, वरळी स्पोर्ट्स क्लब आणि लालबागच्या गरमखडा मैदान अशा अनेक प्रमुख ठिकाणांना भेटी दिल्या. या दौऱ्याने उत्साही क्रिकेटप्रेमींनी आकर्षित केलेच पण आगामी स्पर्धांविषयीची उत्सुकता अधिकच वाढवली. यावेळी चाहत्यांनी या चषकाचे जवळून दर्शन घेतले आणि तो अविस्मरणीय क्षण आपल्या कॅमेऱ्यात टिपण्यासाठी छायाचित्रे काढली.

दोन आठवडे चालणाऱ्या या चषक दौऱ्यामागची संकल्पना म्हणजे संपूर्ण शहराला सामावून घेणारा एक चाहते-संवाद उपक्रम. यामागील मुख्य उद्देश म्हणजे, लीगभोवती निर्माण झालेला उत्साह केवळ स्टेडियमपुरता मर्यादित न ठेवता, तो मुंबईच्या क्रिकेटप्रेमी समुदायांपर्यंत पोहोचवणं हा आहे. शुक्रवार ते रविवार या कालावधीत आयोजित करण्यात आलेला हा दौरा संपूर्ण मुंबई शहर, उपनगर आणि लगतच्या भागांमध्ये प्रवास करेल. यामध्ये दादर, वरळी, चर्चगेट, चेंबूर, वांद्रे, विरार, नवी मुंबई आणि ठाणे यांसारख्या विविध ठिकाणांचा समावेश असेल.हा चषक दाखवण्यासोबतच, या उपक्रमांतर्गत चाहत्यांना लीगशी जोडून घेण्याच्या उद्देशाने विविध प्रत्यक्ष सहभाग उपक्रम, लोकांशी संवाद संपर्क कार्यक्रम आयोजित केले जातील.

**मुंबई क्रिकेटची समृद्ध परंपरा जपण्याचे आवाहन** | **चर्चगेट सेंटरची विजेतेपदाकडे दमदार वाटचाल**

# अमोल मुझुमदारांनी दिला युवांना प्रेरणेचा मंत्र

| मुंबई | प्रतिनिधी |



फक्त ३०-४० धावा करून समाधानी राहू नका, दम असेल तर द्विशतक झळकवा दोन-तीन विकेट्स घेऊन थांबू नका, सात-आठ विकेट्स घेण्याची जिद्द ठेवा! अशा शब्दांत भारतीय महिला क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी युवा क्रिकेटपटूंना मोठी स्वप्नं पाहण्याचा आणि मैदानावर वर्चस्व गाजवण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. ३४ व्या एलआयसी कल्पेश गोविंद कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यावेळी उपस्थित राहून त्यांनी खेळाडूंशी संवाद साधताना क्रिकेटमधील उच्च दर्जा, मेहनत आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले.

अंतिम सामन्यात निलेश भोसले यांच्या हस्ते पार पडला. त्यानंतर मुझुमदार म्हणाले, मोठी स्वप्नं पाहा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि मैदानावर स्वतःचे उच्च निकष ठेवा. गर्दीतून वेगळे दिसायचे असेल तर मोठ्या कामगिरीची भूक कायम ठेवा. याच मैदानावर आपण क्रिकेटचे धडे घेतले, वाढलो आणि स्वप्नं पाहिली, अशी भावनिक आठवण सांगितली.

अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ठाणे सेंटरचा डाव अवघ्या ३५.१ षटकांत १३८ धावांत आटोपला. दिवसअखेर चर्चगेट सेंटरने ४० षटकांत ३ बाद १२४ धावा केल्या असून विजयासाठी त्यांना केवळ १५ धावांची आवश्यकता आहे. अंतिम सामन्यावर चर्चगेट सेंटरने मजबूत पकड मिळवली आहे.

> “स्पर्धेच्या माध्यमातून भविष्यात अनेक नवे रोहित शर्मा, पृथ्वी शॉ आणि यशस्वी जैस्वाल घडतील, असा विश्वास व्यक्त करताना मुझुमदार यांनी पालकांनाही मुलांना खेळासाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. स्पोर्ट्स मुलांना आयुष्यात वेगळं घडवतं. खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची ताकद निर्माण होते.
> -अमोल मुझुमदार, भारतीय महिला क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक”

## निवडक

### बोरिवलीत रंगणार कॅरमचा महासंग्राम



**मुंबई :** बोरिवली (पश्चिम) येथील मंडपेश्वर सिव्हिक फेडरेशनच्या वातानुकूलित हॉलमध्ये ११ वी एम.सी.एफ. राज्य मानांकन कॅरम स्पर्धा रंगत असून राज्यातील अव्वल कॅरमपटूंच्या उपस्थितीमुळे स्पर्धेचा थरार कमालीचा वाढला आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या मान्यतेने होणाऱ्या या स्पर्धेत पुरुष आणि महिला गटात मिळून तब्बल ३५८ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेतील पुरुष आणि महिला अशा दोन्ही गटांमध्ये ठाण्याच्या खेळाडूंनी अव्वल स्थान पटकावले आहे. पुरुष एकेरी गटात राज्य विजेता झैद अहमद फारुकी याला प्रथम मानांकन देण्यात आले असून महिला गटात राज्य विजेती समृद्धी घाडिगावकर हिला अव्वल मानांकन मिळाले आहे. अलीकडील राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील दमदार कामगिरीमुळे या दोघांवर सर्वांच्या नजरा खिळल्या आहेत. पुरुष एकेरी गटात तब्बल ३०२ खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. १) झैद अहमद फारुकी (ठाणे), २) अभिजित त्रिपनकर (पुणे), ३) संदीप दिवे (जळगाव), ४) सौरभ मते (मुंबई), ५) प्रशांत मोरे (मुंबई), ६) रहीम खान (पुणे), ७) सागर वाघमारे (पुणे), ८) महम्मद घुफ्रान (मुंबई) या दिग्गज खेळाडूंना मानांकन देण्यात आले आहे.

### प्रज्ञानानंद-लाग्रेव्ह यांचा सामना बरोबरीत

**नवी दिल्ली :** भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने सुपर चेस क्लासिकच्या आठव्या फेरीत विजय मिळवण्याच्या अनेक चांगल्या संधी गमावल्या आणि अखेरीस त्याला फ्रान्सच्या मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्हसोबत सामना बरोबरीत सोडवावा लागला. दिवसाच्या इतर सामन्यांमध्ये, अमेरिकेच्या फॅबियानो कारुआना आणि जर्मनीच्या व्हिन्सेंट केमर यांच्यात सामना बरोबरीत सुटला, तर विश्वविजेतपदाचा दावेदार असलेल्या उझबेकिस्तानच्या झवोखिर सिंदारोव्हनं नेदरलँड्सच्या जॉर्डन व्हॅन फोरेस्टवर आपला सलग दुसरा विजय नोंदवला. दुसरा डच खेळाडू अनिश गिरी, रोमानियाच्या डियाक बोगदान-डॅनियलकडून पराभूत झाला. फ्रान्सच्या अलीरेझा फिरौजानं माघार घेतल्यामुळं अमेरिकेच्या वेस्ली सोला वॉकओव्हर मिळाला. अंतिम फेरी बाकी असताना, पाच खेळाडू विजेतपदाच्या शर्यतीत आहेत. केमर आणि कारुआना सध्या प्रत्येकी पाच गुणांसह आघाडीवर आहेत. सिंदारोव्ह, वेस्ली आणि फॉर्स्ट प्रत्येकी ४.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर बरोबरीत आहेत, तर प्रज्ञानानंद, गिरी आणि वाशियर-लाग्रेव्ह प्रत्येकी चार गुणांसह सहाव्या स्थानावर बरोबरीत आहेत. डियाक बोगदान-डॅनियलनं ३.५ गुणांसह आपली मोहीम संपवली. त्याला अंतिम फेरीत वॉकओव्हर मिळेल, ज्यामुळं त्याचा स्कोअर ४.५ होईल. सिंदारोव्हवरील दुसऱ्या फेरीतील विजयानंतर, वाशियर-लाग्रेव्हविरुद्ध दुसऱ्या विजयासाठी प्रज्ञानानंदचा प्रवास जवळपास पूर्ण झाला होता. पांढऱ्या सोंगट्यांनी खेळताना, हा भारतीय खेळाडू विजयासाठी चांगल्या स्थितीत होता. त्याला काही चांगल्या संधी मिळाल्या, पण तो त्यांचा फायदा उठवू शकला नाही आणि अखेरीस स्पर्धेतील सर्वात लांब सामना १३९ चालींमध्ये संपला. प्रज्ञानानंद आपल्या अंतिम सामन्यात अनिश गिरीचा सामना करेल.



### नेमबाजी स्पर्धेत धनश्री,श्रीनिधीचे यश

**कोल्हापूर :** मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र एअर आणि फायर आर्म नेमबाजी स्पर्धेत धनश्री इंगळे, कौस्तुभ जाधव, श्रीनिधी कोगनोळे यांनी यश मिळवले.या स्पर्धेत धनश्रीने दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारात ४०० पैकी ३६४ गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला. कौस्तुभ जाधवने १० मीटर पीप साईट एअर रायफल प्रकारात ४०० पैकी ३७९ गुण मिळवत कनिष्ठ मुलांमध्ये दुसरा, तर इव्हेंटमध्ये वरिष्ठ गटात मुलींमध्ये श्रीनिधी कोगनोळे हिने ४०० पैकी ३८३ गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला. या तिघांचीही अखिल भारतीय जी. व्ही. मावळणकर राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. तिघांना ऑलिंपिक टार्गेटचे प्रशिक्षक विनय पाटील, सत्यम कदम, तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण यांचे मार्गदर्शन, तर जिल्हा रायफल असोसिएशनचे प्रोत्साहन लाभले.

### बोईसरमध्ये रंगला ‘साहेब चषक’

**मुंबई :** बोईसरच्या मातीवर रंगलेल्या साहेब चषक कबड्डी स्पर्धेत बारामती स्पोर्ट्स आणि कुर्लाई क्रीडा मंडळाने अक्षरशः वर्चस्व गाजवत विजेतेपदावर आपले नाव कोरले. शिवसेना व शिव मल्हार प्रतिष्ठान, बोईसर-सालवड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय स्पर्धेत कबड्डीप्रेमींनी उत्स्फूर्त गर्दीसह जल्लोष केला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त जिल्हाप्रमुख गिरीश राऊत यांनी उभा केलेला हा कबड्डीचा थाट अन् थरार पाहून मैदान अक्षरशः दणाणून गेले. पुरुषांच्या राज्यस्तरीय अंतिम सामन्यात पुण्याच्या बारामती स्पोर्ट्सने मुंबईच्या स्वस्तिक क्रीडा मंडळाचा ३७-२२ असा एकतर्फी फडशा पाडला. बारामतीच्या चढाया विजेच्या वेगाने धडकत होत्या, तर बचावफळीने स्वस्तिकच्या खेळाडूना अक्षरशः जखडून ठेवले. पहिल्याच सत्रापासून बारामतीने जेतेपदावर पकड घेतली आणि शेवटपर्यंत प्रतिस्पर्ध्यांना डोकेवर काढू दिले नाही. महिलांच्या जिल्हास्तरीय कबड्डीच्या अंतिम लढतीत सफाळयाच्या कुर्लाई क्रीडा मंडळाने नालासोपाऱ्याच्या जेएमडी संघाला ३५-१८ असे चारीमुंड्या चित करत जेतेपद पटकावले. कुर्लाईच्या खेळाडूंनी चढाया आणि सुपर टॅकल्सचा तुफानी मारा करत प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा माजी खा. विनायक राऊत, विलास पोतनीस, ज्योती ठाकरे यांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी विकास मोरे, अनुप राऊत, अजय ठाकूर, दीपक राऊत, प्रथमेश राऊत, राजेश कुटे, तानाजी काकडे, हरिश्चंद्र खुलात, जितेंद्र पामाळे, नचिकेत पाटील, संजय पाटील, प्रवीण कर्मोडा, भीमसिंग कुरहाडे, मनोज संखे, मोहन राणे, विश्वास फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. विश्वास वळवी, भूषण संखे तसेच शहर समन्वयक सुनील महेंद्रकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)